म. ग्रं. सं. ठाणें
विषय प्रवास
सं. क्र.
REFBK-0018124

# ध्रुवाचा प्रवासी



रमेश मंत्री

# क्षणाचा प्रवासी

( केदारनाथ व बद्रिनाथ या देवस्थानांच्या
यात्रेचे प्रवासवर्णन )

रमेश मंत्री

ग्रंथालय
९८९२८
REFBK-0018124
REFBK-0018124 ३९३

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुबआ ४

मूल्य पांच रुपये

आवृत्ति पहिली : अेप्रिल १९७०

© रमेश मंत्री

मुखपृष्ठ : चंद्रकांत विटणकर

प्रकाशक : विष्णु गजानन परचुरे, ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, गोरेगावकर चाळ क्रमांक २, गिरगांव मुंबअी ४.

मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव, पुणे ३०.

# क्षणाचा प्रवासी

[ केदारनाथ व बद्रिनाथ या देवस्थानांच्या यात्रेचे प्रवासवर्णन ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
९१९२८

# क्षणाचा प्रवासी

माणूस हा क्षणाचा प्रवासी आणि अनंत काळचा गृहस्थ असतो.

पण हें तत्त्व माझ्या मनावर पटण्यासाठी मला तीन हजार मैलांचा प्रवास करावा लागला. कित्येक मैल चालावें लागलें, अनेक मैल घोड्यावरून जावें लागलें. तोकड्या वस्तीच्या, अनेक गैरसोयींच्या लहान चट्टयांतील धर्मशाळांतून रहावें लागलें. हिमवर्षावांत झोडपून घ्यावें लागलें. बर्फाच्या नद्या पार कराव्या लागल्या. दुर्गम पर्वत चढावे आणि उतरावे लागले. नगाधिराज हिमालयाच्या शीतल कुशींत शिरावें लागलें. हिरव्या रंगाचीं अनंत रूपें दिसलीं. तीव्र दारिद्र्य आणि अपार निसर्गसौंदर्य यांचें साहचर्य पाहिलें. या सर्वांचा अर्क म्हणजे हें लहानसें तत्त्व. माणूस हा क्षणाचा प्रवासी आणि अनंत काळचा गृहस्थ असतो.

परम पवित्र गंगा नदीचें पहिलें दर्शन मला झालें, तेव्हां सर्वप्रथम जर कोणतें तत्त्व माझ्या मनावर ठसलें असेल, तर तें हें, कीं नदी अखंड चालते आहे. पाणी म्हणजे जीवन, तसेंच जीवन म्हणजे गति. ही गति खुंटली कीं जीवन सांकळतें. जो चालतो त्याचें भाग्यहि चालतें, अशा अर्थाचें संस्कृत वचन आहे, त्याचेंहि मर्म हेंच.

हिमालयांत जावें, त्या नगाधिराजाचें विविध दर्शन घ्यावें, त्याच्या शीतलतेंत जीवनांतील सर्वश्रेष्ठ शांतरसाचा आस्वाद घ्यावा असें मला फार पूर्वीपासून वाटत होतें. जवळ जवळ प्रत्येक हिंदुधर्मीयाला ही आकांक्षा असतेच. हिमालय हेंच आपल्या धर्माचें उगमस्थान आहे. व्यास महर्षींनीं येथेंच महाभारत रचलें. आद्य शंकराचार्यांनीं हिंदुधर्माचा पुनरुद्धार करणारी 'प्रस्थानत्रयी' हिमालयांतच लिहिली. याच मार्गानें पांडव स्वर्गाला गेले. स्वामी विवेकानंद,

रामतीर्थ यांनीं याच नगाधिराजाच्या कुशींत दिव्य चिंतन केलें. परम पवित्र गंगेला धरेवर आणण्यासाठीं भगीरथ–प्रयत्न येथेंच झाले. महात्मा गांधींनीं गीतेचा अनुवाद हिमालयांत पूर्ण केला. गुरु गोविंदसिंग यांनीं येथें तपश्चर्या केली. निसर्गसौंदर्याचें माहेर म्हणजे हिमालय. आपल्या पवित्र नद्यांचें उगमस्थान म्हणजे हिमालय. गंगोत्री, यमुनोत्री, केदारनाथ, बदरी-नारायण, उत्तर काशी, ज्योतिर्मठ, तुंगनाथ, पंचप्रयाग इत्यादि अनेक तीर्थें याच भागांत आहेत. संसारी काय किंवा ऋषिमुनी काय सर्वांची अंतिम ओढ एकच–हिमालय.

सर्वांना ही ओढ असणें हें साहजिकच आहे. आर्यांचे आगमनच या हिमालयाच्या मार्गानें झालें आहे. गंगेचें स्नान आणि हिमालयाचें दर्शन झालें नाहीं, तर जीवन अपूर्ण राहिलें असें कोट्यवधि हिंदूंना वाटतें. त्या दुर्दम इच्छेंतहि गेल्या हजारों वर्षांची ही धार्मिक परंपरा आहे. आणि देवधर्म न मानणारे जे कांही असतील, त्यांनाहि संस्कृति तरी मान्य आहेच ना ? मग आपली संस्कृति तर सारी याच भागांत घडली आहे. हिमालयांतून केवळ गंगा आणि यमुना या नद्याच वहात नाहींत. आपली हजारों वर्षांची संस्कृतीच या नगाधिराजांतून खालीं येऊन कोट्यवधि भारतीयांचा उद्धार करते आहे. आपली संस्कृति आर्यांची आहे. आर्य म्हणजे कुलीन, श्रेष्ठ, सज्जन.

लोकमान्य टिळकांच्या मतानुसार ख्रिस्तपूर्व हजार वर्षांपूर्वी आर्य उत्तर ध्रुव प्रदेशांत रहात होते. पण हिमयुगामुळें त्यांनीं तो अतिशीत प्रदेश सोडला. या विधानाला एक पुरावा म्हणून लोकमान्यांनीं ऋग्वेदांतील उषासूक्त उद्धृत केलें आहे. उषासूक्त हें जगांतील सर्वांत प्रतिभासंपन्न काव्य असून, अशा प्रकारचा उषःकाल आर्यांना उत्तर ध्रुव प्रदेशांतच दिसला असला पाहिजे, असें लोकमान्यांनीं साधार विवेचन केलें आहे.

हे ज्ञानी व तेजःपुंज आर्य हिमालयाच्या मार्गानें भारतांत आले आणि गंगा व यमुना या नद्यांच्या तीरांवर त्यांनीं तपस्या, काव्यरचना व ज्ञानसाधना केली. आपला धर्म वेदांपासून निर्माण झाला म्हणून त्याला वैदिक धर्म म्हणतात. वेद हे भारतीयांचे अत्यंत पवित्र असे धर्मग्रंथ असून जगांतील सर्वांत प्राचीन साहित्य आहेत. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद असे चार वेद आहेत. वेदांचा क्रम असा लावतां येईल : संहिता ( ऋचा), ब्राह्मणें, आरण्यकें,

उपनिषदें हा केवळ कालानुक्रम नसून, विचारांच्या उत्क्रांतीचाहि क्रम आहे. वेदांचा अंतिम भाग म्हणजे उपनिषदें. म्हणून त्यांना वेदान्त म्हणतात. संसारांतील अज्ञानाचा नाश करणारीं तीं उपनिषदें असा एक अर्थ आहे. गुरूजवळ खालीं बसून शिष्यांनीं आत्मसात करण्याची विद्या तीं उपनिषदें, हाहि अर्थ विद्वानांना योग्य वाटतो. नव्या व जुन्या मिळून उपनिषदांची संख्या एकशें आठ असून त्यांपैकी सोळा विशेष महत्त्वाचीं आहेत. आद्य शंकराचार्यांनीं ज्या अकरा उपनिषदांवर भाष्यें लिहिलीं तीं अशीं—ईश, केन, कठ, प्रश्न, मुंडक, मांडूक्य, तैत्तिरीय, ऐतरेय, छांदोग्य, बृहदारण्यक आणि श्वेताश्वतर.

संहिता आणि ब्राह्मणग्रंथ यांना ‘ कर्मकांड ’ म्हणतात आणि उपनिषदांना ज्ञानकांड म्हणतात. ज्यांना ज्ञानज्योति मिळाली नाहीं, त्यांनीं कर्मकांडास अनुसरून धर्माचरण करावें; पण ज्ञान हेंच धर्माचें व जीवनाचें अंतिम उद्दिष्ट आहे हें आपल्या धर्माचें एक मुख्य सूत्र आहे. म्हणून ज्ञानाचा प्रकाश देणारीं उपनिषदें हीं ‘ वेदान्त ’ किंवा वेदांच्या पुढील पायरी मानण्यांत येते. संहिता, ब्राह्मणें, आरण्यकें व उपनिषदें यांचें अध्ययन ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास या चार आश्रमांत करावें अशी आपली धार्मिक परंपरा आहे. कर्मापेक्षां ज्ञान श्रेष्ठ आहे, ज्ञान हें शुष्क झालेल्या झाडासहि पालवी फोडील. थकलेल्या मनास ज्ञान हीच संजीवनी. असे अनेक उल्लेख उपनिषदांत आहेत. ‘तेजस्विनावधीतमस्तु’ म्हणजे गुरु व शिष्य या आपणां दोघांचें ज्ञान तेजस्वी असो अशी प्रार्थना उपनिषदांनीं गाइली आहे. शॉपेन हॉवर या जगप्रसिद्ध जर्मन तत्त्ववेत्त्यानें म्हटलें आहे, कीं ‘ उपनिषदासारखें उच्च, उदात्त आणि विशाल वाङ्मय सबंध जगाच्या इतिहासांत नाहीं. अखेरच्या क्षणीं मला उपनिषदें हाच एक दिलासा आहे. ’ विश्वाच्या या अवाढव्य पसाऱ्यांत ‘ सत्–चित्–आनंद ’ हें नित्य तत्त्व आहे. हें तत्त्व म्हणजे मनुष्याच्या ‘ मी ’ या जाणिवेचें शुद्ध स्वरूप आहे. ही जाणीव म्हणजेच आत्मा. तो सर्व विश्वाला पुरून उरतो. या मूळ तत्त्वालाच ब्रह्म म्हटलें आहे. हें उपनिषदांचें अगदीं थोडक्यांत सार आहे.

ही थोडीशी तत्त्वचर्चा येथें केली, याचें कारण असें, कीं हिमालयासारख्या जीवनांतील सर्वांत मोठ्या यात्रेला निघायचें, तर केवळ गाडीमार्ग पाहून

चालणार नाहीं. आपण कोण, कोठून आलों, आपला धर्म काय, त्याचें उद्दिष्ट काय आणि या साऱ्यांचा अंत काय याबद्दलची आपली बैठक निश्चित झाली पाहिजे. धर्म हा एका माणसापासून सुरू होत नाहीं, अंतहि पावत नाहीं. त्याला शेंकडों, हजारों वर्षांची परंपरा आहे. हें समजून-उमजून या यात्रिकांच्या अनंत रांगेंत सामील झालें पाहिजे.

मला मनापासून असें वाटतें, कीं हिमालयांत जायचें, तें व्यापारांत, व्यवहारांत अपयश आल्यानें वैतागून किंवा जीवनांतला सारा रस संपला म्हणून वैतागून जाण्यापेक्षां जेव्हां सुस्थिति आहे, कसला विषाद किंवा चिंता नाहीं अशा परिस्थितींत आणि हातींपायीं धडधाकट असतांना जाण्यांत अधिक आनंद आहे. हिमालय हा धर्मप्रवृत्तींचा नगाधिराज आहे, तसाच तो सौंदर्याचा उत्तुंग मानदंड आहे. त्याचें लक्ष-अंगांचें सौंदर्य ग्रहण करायचें, तर मन आणि शरीर ताजें पाहिजे. त्या थंड हवेंत चालण्यांतला आनंद भोगला पाहिजे, पहाड चढण्यांतली मौज चाखली पाहिजे, घोड्यावरून रपेट करण्याचा कणखर उत्साह अनुभवला पाहिजे, जवळ झरा असला तर त्याच्या शीतल पाण्यांत पाय सोडून हिमालयाचा गारवा शोषून घेतला पाहिजे, एकीकडे उंच पहाड आणि दुसरीकडे खोल दऱ्या, यांमधून जाणाऱ्या हातभर रुंदीच्या पायवाटेनें सुखरूप जातांना आपल्या कौशल्याचा अभिमान वाटला पाहिजे, हिमगिरीच्या आसमंतांतल्या एकेरी गुलाबाच्या धुंद सुवासानें मन भरून आलें पाहिजे, आपलें सांस्कृतिक जीवन समृद्ध करणाऱ्या महापुरुषांच्या स्मृतींनीं मन विशाल होण्याइतकें तें तरुण नि लवचिक असलें पाहिजे. कुणीतरी दंडी-कंडींतून उचलून न्यायचें नि मग सगळ्या निसर्गसौंदर्याच्या समृद्धीकडे डोळेझांक करून देवाच्या पायरीवर डोकें ठेवून परत यायचें यांत हिमालयाच्या प्रवासाची रंगत नाहीं. याच विचारानें मी, सर्वसाधारणपणें ज्या वयांत हिमालय यात्रा केली जाते, त्या वयापेक्षां खूपच लवकर निघालों. पुन्हा पुन्हा अशी अवघड यात्रा कुठें होते, अशा विचारानें मी पत्नीलाहि बरोबर घेतलें.

पुणें येथील ‘ दत्त दिगंबर यात्रा कंपनी ’ च्या अनुभवी पथकांतून मी यात्रेला निघालों. संन्याशाच्या लग्नाला—नव्हे यात्रेला—शेंडीपासून तयारी तशी आमची अवस्था होती. थंडीचे स्वेटर, हातमोजे यांपासून बॅटरी—होल्ड-

ऑलच्या खरेदीपर्यंतची तयारी अगदीं थोड्याच दिवसांत करावी लागली. १ मे रोजीं या कंपनीचा खास यात्रेचा डबा पुण्याहून निघणार होता. तो संध्याकाळीं मुंबईस येऊन दुसऱ्या दिवशीं सकाळीं काशी एक्स्प्रेसनें दिल्लीकडे जाणार होता. सकाळीं धांवपळ नको म्हणून आम्हीं रात्रींच बोरीबंदरवर जाऊन डब्यांत झोंपायचें ठरवलें. त्याप्रमाणें १ मे रोजीं मी व माझी पत्नी सौ. रजनी रात्रीं सात साडेसातला घरुन निघालों. रात्रीं दहा साडेदहाला बोरीबंदरला जाऊन डबा शोधून काढला. आम्ही आंत शिरलों, तेव्हां पुण्याहून आलेली मंडळी निळ्या दिव्याच्या अंधुक प्रकाशांत झोंपली होती. आम्हीही जागा मिळेल तिथें पथाऱ्या पसरल्या. झोंप कांहीं नीटशी लागलीच नाहीं. गाड्यांच्या आवाजानें आणि स्टेशनवरच्या गडबडीमुळें अर्धवट आणि चांचपडलेली अशी थोडीफार विश्रांति मिळाली, एवढेंच.

तरी पण सकाळीं पांचसाडेपांचला जाग आली, तेव्हां खूपच हुषारी वाटली. नव्या प्रवासाच्या अपेक्षेचा तो उत्साह असावा. दिवस उन्हाळ्याचे असल्यानें अंधुक उजेड पडला होता. स्टेशनवरचा गरम गरम चहा आम्ही घेतला. कंपनीचाहि चहा तोंवर तयार झालाच होता. मुंबईचे यात्रेकरू येत होते आणि आमच्या डब्यांतली आपली जागा शोधून बसत होते. या खास डब्याचे दोन भाग होते. प्रत्येक भागांत वीस उतारू होते. मध्यें दोन कंपार्टमेंटमध्यें स्वयंपाकाची जागा आणि सहा माणसांचा वेगळा भाग होता. आम्ही सकाळीं उठल्यावर सहज म्हणून आमचे सहप्रवासी निरखून घेतले. अधिकृत ओळखी अशा झाल्याच नाहींत. त्यांची आवश्यकताहि नव्हती. 'तुम्ही कुठें जाणार ?' असा पहिलाच प्रश्न प्रवासी एकमेकांना विचारतात. पण इथें तो प्रश्न उपस्थितच होत नव्हता. सारे एकाच ठिकाणीं जाणार होते. आमच्या डब्यांतील बहुतेकजण ५५ वर्षांच्या पुढचे होते. देवधर्म हाच त्यांचा उद्देश होता हें उघड होतें. आपल्या आईबरोबर आलेला एखाद दुसरा चाळिशीच्या आंतला होता. थोडीफार ओळख झाल्यावर कांहींजणांनीं मला विचारलें, "तुम्ही लेखक आहांत ना ?" मीं म्हटलें, "लिहितों कधीं कधीं." त्यावर ते म्हणत, "तरीच; तुम्हांला यात्रेवर लिहायचें असेल, म्हणून आलांत तुम्ही." मीं म्हटलें, "छेः छेः तसें कांहीं नाहीं. या विषयावर पूर्वीं मोठमोठ्या लेखकांनीं उत्तम लिहिलें आहे. लिहावें म्हणून कांहीं मी

आलों नाहीं. हा प्रवास करावा या इच्छेनें आलों. लिहिण्यासारखें कांहीं पाहिलें, तर लिहीनहि. पण लिहिणें हा मुख्य उद्देश नाहीं. लेखक करतो ती प्रत्येक गोष्ट तो लिहिण्यासाठीं करतो ही समजूत बरोबर नव्हे. एखाद्या साहित्यिकानें लग्न केल्यावरहि कोणी म्हणतील, ' हां, तुम्हांला ' लग्न ' या विषयावर लिहायचं असेल, म्हणून तुम्ही लग्न केलंत ना ? ' म्हणजे इतर चारचौघांसारखंच लेखकाचंहि जीवन असतं हें नजरेआड होऊं नये. " पण असें मीं सांगितलें तरी तें सर्वांना पटलेंच असेल असें नाहीं.

मुंबईहून २ मे रोजीं काशी एक्स्प्रेसनें सकाळीं आमचा डबा निघाला. वाटेंत दादर आणि कल्याणला आमच्या डब्यांत कांहीं पूर्वनियोजित यात्रेकरू चढले. कल्याणच्या पुढें गाडीनें चांगला वेग घेतला. डब्यांतल्या उतारूंतहि पहिला औपचारिकपणा जाऊन अधिक मोकळ्या गप्पा सुरू झाल्या. पण बहुतेक मंडळीं पन्नाशीच्या पुढची असल्यानें त्यांच्या गप्पांत वारंवार येणारा विषय म्हणजे पूर्वीची स्वस्ताई आणि आतांची महागाई हा होता. आपलीं मुलेंबाळें कोण कुठें आहेत, याची माहिती मुक्त हस्तानें दिली जात होती. कोणी आपल्या नातवंडांच्याहि आठवणी सांगत होते.

गाडी दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं दिल्लीला पोहोंचली, तोंपर्यंत विशेष लिहिण्यासारखें कांहींच घडलें नव्हतें. उकाडा, रुक्ष प्रवास यांतून आम्ही दिल्लीला पोहोंचलों. तिथें पांच सहा तास गाडी थांबणार होती. रात्रीं दहा वाजतां डेहराडूनकडे जाणाऱ्या गाडीला आमचा डबा जोडला जाणार होता. दोन दिवस गाडींतच बसून राहिल्यामुळें कंटाळा आला होता. म्हणून बहुतेक यात्री पाय मोकळे करायला म्हणून बाहेर पडले. मी व सौ. नव्या दिल्लीला जाऊन बिर्ला मंदिर पहायचें ठरवलें. पण आमच्याबरोबर इतक्या दूरवर कोणी यायला तयार नव्हतें. थोड्या लोकांची नातेवाईक किंवा मित्रमंडळी दिल्लीला होती. हे लोक त्यांच्याबरोबर गांवांत गेले होते. संध्याकाळच्या वेळीं अनोळखी गांवांत टॅक्सीनें जाणें आम्हांला धोक्याचें वाटलें. म्हणून आम्ही टांगा केला. पण टांगेवाल्यानें कोपऱ्याकोपऱ्यावर उभें राहून लहान लहान अंतरावर इतर ' स्वाऱ्या ' घ्यायला सुरुवात केली. त्याचे हे सारे सोपस्कार होईपर्यंत बराच वेळ जाऊं लागला. आम्ही विचारतां तो म्हणाला, ' दिल्लींत हें असेंच असतें. ' बिर्ला मंदिराला पोंचेपर्यंत रात्र झाली. तरी आम्ही तेथें अर्धा

पाऊण तास निवांतपणें काढला.

वेळ रात्रीची होती आणि मंदिरांत अजिबात गर्दी नव्हती. हें मंदिर भव्य आणि अतिशय स्वच्छ आहे. गजबजाटापासून तें दूर असल्यानें शांतहि असतें. पांढऱ्या शुभ्र संगमरवरी दगडांचाच उपयोग बहुतेक ठिकाणीं केला असल्यानें त्या मंदिराला बर्फाची झळाळी लाभली आहे. रचना उत्तर हिंदुस्थानी–जयपुरी पद्धतीची आहे. आंत लक्ष्मी-नारायणाच्या मुख्य मूर्ति अतिशय सुबक, सुंदर आहेत. त्यांच्यावर जरतारी कपडे आणि दागिने यांचा थाटमाट असतो. पायांशीं फुलांच्या राशी पडलेल्या असतात. मुख्य देवळानजीक इतर लहान देवालयें आहेत. विस्तृत बाग आहे. वातावरण प्रसन्न वाटलें. आपल्या दैनंदिन व्यवहाराची रुक्ष कांचणी अशा ठिकाणीं विसरली जाते आणि मन उदात्त विचारांनीं भरून जातें.

लक्ष्मीनारायणाच्या मंदिरांत रामायण, महाभारत व इतर धर्मग्रंथ यांतील ठळक दृश्यें संगमरवरी दगडांत विविध रंगानें कोरण्यांत व चितारण्यांत आलीं आहेत. त्यामुळें मंदिराला अगदीं योग्य असें वातावरण निर्माण होतें. गीता व इतर ग्रंथांतील अनेक वचनेंहि या मंदिराच्या भिंतीवर लिहिण्यांत आलीं आहेत. पुढें हृषिकेश, हरिद्वार इत्यादि भागांतील अनेक देवालयांतहि अशीं चित्रें व वचनें दिसलीं.

बिर्ला मंदिराला वास्तविक देवाचें म्हणजे लक्ष्मी-नारायणाचें नांव पडण्या-ऐवजी तें मंदिर बांधणाऱ्या धनिकाचें पडावें हें कांहीं माझ्या मनाला बरें वाटलें नाहीं. आपण पंढरपूरच्या विठोबाचें देऊळ म्हणतों, कोल्हापूरच्या अंबाबाईचें देऊळ म्हणतों. मंदिर बांधणारा नैमित्तिक असतो. ज्या परमेश्वराचें चिंतन व मूर्तिरूप दर्शन व्हावें अशी योजना असते, तो परमेश्वर त्याचें आदिकारण असतो. म्हणून हें मंदिर लक्ष्मी-नारायण मंदिर या नावानें ओळखलें जाईल तर बरें. व्यापार–उद्योगधंद्यांत धनिकांचे देव्हारे माजविले जातात, ते खूप आहेत. पुनः परमार्थांत त्यांचेंच नांव कां घ्यावें लागावें ? मंदिर बांधल्याबद्दल त्यांना जेवढे धन्यवाद मिळावयाचे, ते मिळावेत, पण मंदिर देवाच्या नांवानें ओळखलें न जातां देणगीदाराच्या नांवें ओळखलें जाऊं नये. या थोड्याशा विषण्ण विचारानेंच मी दिल्ली स्टेशनकडे परत आलों.

दिल्लीहून रात्रीं साडेदहाला गाडी निघाली. दुसऱ्या दिवशीं पहांटे चारच्या

सुमारालाच मला जाग आली. खिडकींतून बाहेर पहातों, तों उजेड पडण्यास सुरुवातहि झाली होती. त्या भागांत लवकर उजाडतें आणि त्यांतूनहि तो उन्हाळा असल्यानें लवकर संधि-प्रकाश दिसतो. खिडकी उघडली आणि हिमालयांतून थेट आलेल्या थंड वाऱ्याची पहिली सुखद बोचरी झुळुक तोंडावर आली. बाहेर दूरवर पर्वतांची हिरवीगार रांग पसरली होती. ऐन उन्हाळ्यांतहि सारी जमीन हिरवी दिसत होती. जवळपास नदी असावी आणि या भागाला पाण्याचा भरपूर पुरवठा होत असावा, हें उघड होतें. आसपास एखादें गांव किंवा वस्ती अजून दिसत नव्हती. पण पहांटेच्या अंधुक प्रकाशांत तो सारा भाग प्रसन्न दिसत होता. सारा भूभागच एखाद्या ताज्या टवटवीत फुलासारखा दिसत होता.

आगगाडी अगदीं मंदगतीनें जात होती. जणू कांहीं नागर जीवनांतील गडबड, धांवपळ ही दिल्लीलाच संपली आणि आतां सारा प्रवास संथपणें, निवांतपणें आणि रुचीनें-चवीनें करायचा आहे. हा विचार माझ्या मनांत येतो न येतो, इतक्यांत कुठलें तरी लहानसें स्टेशन आलें. त्याला स्टेशन म्हणायचें कारण एकच कीं, तेथें एक पाटी लावली होती. एरवीं स्टेशनच्या इतर कसल्याच खुणा नव्हत्या. तिथें प्लॅटफॉर्म नव्हता, विक्रेते नव्हते आणि गर्दीहि नव्हती. रुळांच्या दोन ओळींवर गाडी उभी होती आणि फार तर दोन-तीन उतारू चढले–उतरले असतील. अशा सुंदर सकाळीं गरम चहा घ्यायची बरीच तल्लफ आली. पण चहाचा मागमूसहि कोठें दिसत नव्हता. भोंवतीं सारें जंगल होतें. तेथें लांकडें तोडण्याचा व्यवसाय प्रामुख्यानें चालत असावा. कारण झाडें तोडून त्यांच्या ओंडक्यांच्या चौकोनी आकाराच्या व्यवस्थितपणें रचून ठेवलेल्या राशी अधूनमधून दिसत होत्या. त्या जंगलांत चुकूनहि कोठें माणसांची हालचाल त्यावेळीं दिसली नाहीं. शें-दोनशें फुटांवरून एक अशक्त झालेला ओहळ अंग चोरून वहात होता. त्याच्या पात्रांत गोल गोटे झालेल्या दगडांचा खच पडलेला दिसत होता. सारें कसें स्तब्ध, चित्रां-तल्यासारखें दिसत होतें. त्या थंडीच्या पहांटे पक्षीसुद्धां आळसानें अजून उठले नव्हते. त्यांचा चिवचिवाट नसल्यानें कांहींतरी चुकल्यासारखें दिसत होतें.

इतक्यांत गाडी कांहीं पूर्वसूचना न देतांच हलली. धीमे धीमे जाऊं लागली. साधारण तासाभरांत आजूबाजूला अधिक हालचाल भासूं लागली. उशीर झाला या जाणिवेनें कीं काय, पक्षी लगबगीनें घिरट्या घालूं लागले. आणि त्यांच्या

चिवचिवाटानें शाळा सुरू होण्यापूर्वी लहान मुलांची बडबड गडबड ऐकूं येते, तसा भास होऊं लागला. कांहीं वेळानें एका लष्करी ठाण्याचे तंबू जंगलाच्या हिरव्या रंगांतून आपल्या काळसर पांढऱ्या रंगाने उठून दिसूं लागले. कांहीं सैनिक दृष्टिपथांत आले आणि मग जरा बऱ्याशा फलाटाच्या एका स्टेशनवर गाडी थांबली. इथें मात्र मातीच्या लहानशा भांड्यांतून चहा मिळाला. तोंपर्यंत आमच्या डब्यांतले बरेच जण जागे झाले होते. आम्ही दोघे तिघेजण खालीं उतरलों. फलाटावर चार सहा लोक धुनी पेटवून शेकत होते. आम्हीहि त्याचा थोडा उबारा घेतला. चहाचीं मडकीं घेतलीं. चहा घेऊन 'घटस्फोट' करीपर्यंत गाडीची शिटी झाली आणि आम्ही धांवत आमच्या डब्याची दांडी पकडली.

साडेपांचच्या सुमाराला हरद्वार स्टेशन आलें. स्टेशन खूपच मोठें आणि अतिशय स्वच्छ होतें. सहासात फलाट होते. त्यांवर अधूनमधून सुंदर पिंपळ–वड थंडगार पानांचीं पागोटीं बांधून उभे होते. स्टेशनवर फारशी गर्दी नव्हती. समोरच किंचित् डाव्या बाजूस एक हिरवीगार उंच टेकडी होती आणि तिच्यावर पांढरें शुभ्र मंदिर दिसत होतें. आमच्या प्रवासांत लागलेलें हें पहिलें तीर्थस्थान. म्हणून आम्ही विशेष उत्सुकतेनें आजूबाजूला पहात होतों. आमच्यासारखेच यात्रेकरूंचे खास असे कांहीं डबे स्टेशनवर उभे होते. त्यांत मद्रासकडील 'कुंडुकंपनी'चाहि डबा होता. आमचा व या कंपनीचा प्रवासाचा कार्यक्रम जवळजवळ सारखाच असल्यानें, पुढें हिमालयांत जाऊन परत येई-पर्यंत या डब्यांतील प्रवासी आम्हांला वाटेंत सतत भेटत राहिले.

हरद्वारपासून आमची हिमालयाची खरी यात्रा सुरू व्हावयाची होती. त्यामुळें हिमालयाची प्राथमिक व मूलभूत माहिती घेण्याचा हाच समय होता. हिमालयाचा विस्तार पूर्व–पश्चिम दीड हजार मैल आहे. या प्रचंड विस्तारांत २९,००० फूट उंचीचें गौरीशंकर जगप्रसिद्ध आहे. पण लहानमोठीं अशीं इतर कित्येक शिखरें या दीड हजार मैलांत येतात. या शिखरांत नंदादेवी, नंगापर्वत, त्रिशूल, नंदाकोट, कांचनगंगा, पंचचुल्ही, धवलगिरी, गोसईस्थान हीं इतर कांहीं प्रमुख शिखरें आहेत. हिमालयाची विभागणी पांच भागांत केली जाते. हे पांच भाग म्हणजे काश्मीर, जालंधर, गढवाल ( यालाच उत्तरा खंड म्हणतात. ) कुमाऊ किंवा कूर्मांचल आणि नेपाळ. या पांच भागांपैकीं उत्तरा

खंडांत हिंदूंचीं परमपवित्र धर्मस्थानें आहेत. त्यांत गंगोत्री, जम्नोत्री, पाच प्रयागें, पंच केदारनाथ, उत्तरकाशी, ज्योतिर्मठ, केदारनाथ, तुंगनाथ, बद्रीनारायण, इत्यादि येतात. हरिद्वारास हरद्वार किंवा गंगाद्वार असेंहि म्हणतात. शंकराला हर म्हणतात आणि त्याचें वसतिस्थान म्हणजे हिमालय. त्याच्या पायथ्याच्या दारांतून किंवा खिडींतून येथें गंगा बाहेर पडते म्हणून याला हरद्वार म्हणतात. हिमालयाच्या डोंगरांतून येथें गंगा सपाट प्रदेशांत येते म्हणून गंगाद्वार असेंहि याला नांव आहे. पण हल्लीं हें नांव मागें पडलें आहे.

महान् पितृभक्त भगीरथ राजानें भस्म झालेल्या आपल्या पितरांचा उद्धार गंगाजलानें व्हावा म्हणून अतिशय खडतर तपश्चर्या करून स्वर्गातच वास करणाऱ्या गंगेला प्रसन्न केलें. ती पृथ्वीवर येण्यास तयार झाली. पण ती इतकी शक्तिमान् होती, कीं ती स्वर्गातून सरळ पृथ्वीवर आली, तर पृथ्वी दुभंग होईल म्हणून तिचा आघात सहन करण्याची व्यवस्था करणें भगीरथाला भाग पडलें. हें काम शंकराशिवाय कोणाच्यानें होणार नाहीं, म्हणून भगीरथानें महान् तप करून शंकराला प्रसन्न केलें. त्याप्रमाणें गंगा स्वर्गातून आली, पण शंकराचा जटाभार इतका विपुल, कीं गंगा त्यांतच दिसेनाशी झाली. म्हणून प्रयत्नशील भगीरथ राजानें पुनः शंकराची आराधना केली, तेव्हां गंगा शंकराच्या जटेंतून सप्तधारांनीं बाहेर पडली. या सात धारा म्हणजे गंगा, यमुना, सिंधू, सरस्वती, शरयू, गंडकी आणि ब्रह्मपुत्रा. भगीरथानें अपार कष्ट करून आणलेली ही गंगा त्याच्या नांवावरून 'भागीरथी' म्हणूनही ओळखली जाते. हरद्वारला भागीरथी जेथून डोंगराबाहेर पडते, तेथें एका बाजूला मनसादेवी व दुसऱ्या बाजूला चंडीदेवी अशा दोन टेकड्या आहेत.

हरद्वारचें तें प्रसन्न वातावरण पाहून कधीं एकदां गंगातीरीं जातों, असें आम्हांला झालें. आम्हीं घाईघाईनें चहापाणी उरकलें आणि गंगास्नानास निघालों. स्टेशनबाहेर पन्नास साठ पंडे उभे होते. ते प्रत्येकाची चौकशी करीत. कोण, कोठून आलांत, कांहीं मदत हवी का, असें ते अदबीनें विचारीत. पण आमची सारी व्यवस्था असल्यानें पंड्यांचें सहाय्य आम्हांला घ्यावें लागलें नाहीं. स्टेशनपासून गंगाकांठ मैलभर असेल. स्टेशनजवळच शिवाचा सुंदर पुतळा आहे. दोन हातांनीं कमंडलूतून आपल्या शिरावर शिव पाणी घेत

असल्याचें हें कारंजा व पुतळा यांचा समन्वय असलेलें सुंदर शिल्प आहे. या दोन कमंडलूंतून सतत पाणी वहात असतें.

गांव चांगलें वाटलें. शांत, सरळ, विमल. रस्ते स्वच्छ आणि डांबरी आहेत. गंगेच्या घाटावर जाईपर्यंत दुतर्फा मोठीं दुकानें दिसतात. हिमालयाच्या प्रवासास उपयोगी पडेल असें सामान विकण्याचीं बरींच दुकानें आहेत. या दुकानांतून गरम कपडे, काळे चष्मे, बर्फांत किंवा डोंगरावर जातांना लागणाऱ्या अणकुचीदार लोखंडी टोपण बसविलेल्या काठ्या, स्वेटर्स, गरम माकडटोप्या इत्यादि माल मिळतो. त्यामुळें आपण गिर्यारोहकांच्या प्रांतांत आलों आहोंत असें आपसूकच वाटूं लागतें. या दुकानांच्या गर्दीतून थोडें पुढें जावें, तों उपाहारगृहें, प्रसाद, माळा वगैरेंचीं दुकानें इत्यादि दिसूं लागतात. इथें मात्र गर्दी वाटते. या गर्दीतून थोडा मार्ग काढला, कीं 'हरीच्या पायरी'चें भव्य दृश्य दिसतें.

'हरीची पायरी' हा गंगेच्या कांठीं बांधलेला प्रचंड घाट आहे. या घाटावर उतरण्यापूर्वींच गुलाब व इतर फुलांचीं दुकानें लागतात. फुलांच्या राशीच्या राशी पाहून मन अतिशय प्रसन्न होतें. हीं फुलें बरींच स्वस्तहि असतात. पंधरा वर्षांपूर्वीं हरद्वारला गेलेल्या यात्रेकरूनें तेव्हां आपण एक रुपयास गुलाबाचीं एक हजार फुलें घेतल्याचें म्हटलें आहे. तितकी स्वस्ताई आतां नसली, तरी पांच दहा पैशाला दोन तीन ओंजळी भरतील इतकीं फुलें पानांच्या द्रोणांतून सहज मिळूं शकतात. या फुलांचे द्रोण देवाला किंवा गंगेला वहाण्यासाठीं घेऊन आम्ही हरीच्या पायरीच्या पायऱ्या उतरूं लागलों. घाट अगदीं अद्ययावत् सिमेंट कॉंक्रीटचा बांधला आहे. तो अतिशय स्वच्छ ठेवण्यांत येतो. गंगेच्या एका प्रवाहावरून पलीकडे जाण्यासाठीं प्रशस्त पूल आहे. त्या बाजूला आम्ही दहा पंधराजण गेलों. तेथें कांहीं ब्राह्मणांनीं आम्हांला गांठलें आणि धर्मकृत्यें करण्याची सूचना केली. आम्हीहि तीं करण्यास उत्सुक होतोंच. मग आम्ही आंघोळीची तयारी केली. मी व पत्नीनें त्या रमणीय घाटाच्या पायऱ्यांवर उभे राहून प्रथम गंगामाईची पूजा केली. फुलें वगैरे अर्पण केलीं आणि मग स्नानासाठीं म्हणून पाण्यांत उतरलों.

पण उतरल्याबरोबर बाहेर आलों. कारण पाणी इतकें थंड होतें कीं बर्फाच्या लादीवर आपण उभे आहोंत असें वाटलें. वरून तळपणाऱ्या कडक उन्हाची क्षिती न करतां पाणी अतिशय थंडच होतें. बर्फ वितळूनच आलेलें गंगाजल

असल्यानें तें अतिशीत असावें हें साहजिकच होतें व इतक्या थंड पाण्याची संवय नसल्यानें गंगेच्या पहिल्या स्पर्शानें आम्ही बिचकून जावें हेंहि नैसर्गिक होतें. पण थोडा धीर करून पुन्हा दोन पायऱ्या उतरलों आणि मग परिचया-मुळें त्या पाण्याचा थंडपणा खुपेनासा झाला. मघाशी चावणारें पाणी आतां मायेनें अंग चाटूं लागलें. हळू हळू पुढें जाऊन ' हर गंगे भागीरथी ' म्हणत बुडी मारली. कानावर पाण्याची मोठी सळसळ क्षणभर आली आणि थंड डोक्यानें मी पुन्हा प्रवाहावर आलों. त्यावेळीं ओल्या अंगावर कांटा उभारला होता आणि तरीहि अतिशय उत्साह वाटत होता. जन्माला येऊन एकदां तरी गंगास्नान घडावें, अशी जवळ जवळ प्रत्येक हिंदुधर्मीयाची तीव्र इच्छा असते. गंगा नदी पुढें काशी-बनारसकडे माणसांच्या अतिसान्निध्यामुळें हरद्वारइतकी स्वच्छ असत नाहीं. गंगेंत स्नान करतांनाच मला एका योगायोगाची आठवण झाली. माझ्या दत्तक आईचें नांव यमुना, मावशीचें नांव गंगा आणि जनक आईचें नांव काशी आहे.

हरद्वारला गंगेंत मोठमोठे म्हणजे चांगले दीड दोन फूट लांबीचे मासे अगदीं पायरीजवळ येतात. त्यांचे पुंजकेच्या पुंजके या पायऱ्यांजवळ घोटाळत असतात. यात्रिक त्यांना कणकेचे गोळे टाकतात. हे लहान लहान सागर-गोट्याएवढे कणकेचे गोळे विकणारे अनेक लोक, गोळ्यांच्या थाळ्या आणि कागदांचे लहान तुकडे घेऊन ' माशांचे गोळे ' असा साद घालीत घाटावर हिंडत असतात. माशांना हें अन्न घालतांना मुलांना विशेष मौज वाटते. असे तासच्या तास गंगाकांठीं काढायला मोठ्यांनाहि अतिशय आनंद वाटतो.

गंगास्नानाला अक्षरशः हजारों लोक आलेले होते. स्त्रियांच्यासाठीं थोडा आडपडदा असलेली अशी वेगळी स्नानाची जागा आहे. पण पतीबरोबरच्या अनेक सौभाग्यवती जोडीनेंच स्नान करतात. समोरच्या कांठावर गंगामाईचें आणि त्या अनुषंगानें अनेक इतर लहानमोठीं देवालयें आहेत. पण त्या देवाल्यात जाण्यापूर्वीच गंगाकांठचें पावित्र्य मनावर ठसतें. कारण या पाण्याकडे नजर टाकली, तर तें इतकें स्फटिकवत् स्वच्छ दिसतें, कीं नदीचा तळ चटकन् दृष्टि-पथांत येतो. पाण्यांत हजारों यात्रिक स्नान करतात, पण पाणी वहातें आहे, प्रचंड ओढीनें वहातें आहे, त्यामुळें अतिशय निर्मळ दिसतें. गंगा नदीचें धार्मिक महत्त्व तर श्रेष्ठ आहेच. या नदीचा कांठ ही एक तपोभूमि आहे.

अनादि कालापासून लक्षावधि ज्येष्ठ ऋषि–मुनींनीं या नदीकांठीं तप करून आपलें सामर्थ्य तिला दिलें आणि तिचें ओज स्वतः घेतलें. रामदास, ज्ञानदेव, एकनाथ, नामदेव इत्यादि मराठी संत गंगादर्शनासाठीं कित्येक मैलांचा खडतर प्रवास करून गेले. पंडितराज जगन्नाथ यांचें जीवन गंगेशीं एकरूप झालें आहे. आणि कविश्रेष्ठ कालिदास तर अस्सल गंगा-भक्त. महाभारत तर गंगाकिनारींच घडलें. पंतप्रधान नेहरूंनींही आपल्या मृत्युपत्रांत अखेरची इच्छा हीच व्यक्त केली होती, कीं आपली थोडी रक्षा गंगेंत पडावी आणि भारताच्या थोर संस्कृतीला वंदन करण्याची आपल्याला अशी अखेरची संधी मिळावी.

हरी की पायरीवर ब्रह्मकुंड हें प्रमुख स्नानकुंड आहे. श्वेतराजानें या स्थळीं ब्रह्मदेवाची आराधना करून त्याला प्रसन्न करून घेतलें म्हणून या कुंडाला ब्रह्मकुंड असें म्हणतात. भर्तृहरीनें या जागीं तपश्चर्या केली म्हणून ‘ हरी की पायरी ’ असें नांव पडल्याचाहि एक उल्लेख आहे. ब्रह्मकुंडांत व जवळपास गंगामाता, मनसा देवी, गंगाधर महादेव, श्रीहरी पादुका अशीं पन्नासांवर लहानमोठीं देवालयें असून शृंगेरी मठाधिपतींचेंही एक देवालय आहे. राजा मानसिंह यांची छत्रीहि ‘ हरी की पायरी ’ वर आहे. या पवित्र भागीरथी नदीच्या ब्रह्मकुंडांत संथपणें आणि भरपूर वेळ स्नान करून आम्ही देवदर्शनाला गेलों. तेथें गंगा, श्रीकृष्ण, श्रीराम, इत्यादि अनेक देव-देवतांचें विधिपूर्वक दर्शन घेतलें. सारा आसमंत माणसांनीं फुलला होता. देवळांतील घंटा आणि ब्राह्मणांचे मंत्रोच्चार यांनीं त्याला अधिकच पवित्र केलें होतें. फुलांचीं दुकानें या माणसांच्या गर्दींत बागेंतल्या हिरवळींतील झुपक्यां-सारखीं एकदम उठून दिसत. लहान लहान भांड्यांतून गंगाजल नेणारे अनेक लोक या भांड्यांना बंद करून डाक लावणाऱ्या दुकानदारांच्या पुढें कोंडाळीं करून बसले होते. आम्हांलाहि घरीं गंगाजल नेण्याची आठवण झाली आमच्यासाठीं आणि मित्रांच्यासाठीं आम्हीं लहानलहान सहा भांडीं घेतलीं आणि गंगाजलानें तीं भरून त्यांना डाक लावून घेतली.

हरद्वारला मोठ्या घाटावरच कुशावर्त घाट आहे. तेथें पितरांना पिंडदान करणें मोठ्या पुण्याईचें असतें. या घाटाला कुशावर्त नांव पडण्याचें कारण पुराणांतरीं असलेल्या एका कथेंत सांपडतें. याच जागीं दत्तात्रेय तप करीत होते. तपासाठीं त्यांनीं आणलेलें कुशासन गंगेच्या पाण्यानें तरंगू लागलें व

पुढें जाऊं लागलें. दत्तात्रेयांनीं हें पाहिल्याबरोबर आपल्या तपोबलानें गंगेचा प्रवाह थांबविला. त्यामुळें कुशासन पुढें न जातां एकाच जागीं फिरत राहिलें. म्हणून या घाटास कुशावर्त घाट म्हणतात.

पौराणिक कथांप्रमाणें वास्तविक गंगा ही सुरसरिता म्हणजे देवांची नदी. तिचें वास्तव्य स्वर्गातच होतें. पण एकदां हिच्याकडून नकळत प्रमाद घडला म्हणून ब्रह्मदेवाच्या शापामुळें तिला पृथ्वीवर यावें लागलें. महाभारतांत ही कथा अशी आहे कीं, महाभिष नांवाच्या राजानें पृथ्वीवर अपार पुण्य-कर्म केल्यानें त्याला स्वर्गलोक मिळाला. एकदां ब्रह्मदेवाच्या दरबारांत महाभिष बसला असतांना अत्यंत लावण्यवती गंगा तेथें आली. वस्त्र वर ओढून घेतांना तिचा पदर ढळला. तेव्हां त्या दरबारांतील सर्व देव, ऋषि, राजे वगैरेंनीं गंगा ही मातेसमान असल्यानें डोळे झांकून घेतले. पण महाभिष राजानें मात्र डोळे उघडे ठेवून तिचें लावण्य नेत्रांनीं उपभोगलें. गंगेचीहि नजर त्याच्याकडे गेली. हें पाहून ब्रह्मदेव संतप्त झाले आणि म्हणाले, " हे महाभिषा, तूं स्वर्गांत आलास पण पृथ्वीवरील पापी दृष्टि घेऊन येथें आलास. पवित्र अशा गंगेचेंहि चित्त ढळलें. म्हणून तुम्ही दोघेंहि पृथ्वीवर जन्म घ्याल असा मी तुम्हांला शाप देतों. "

स्वर्गांत रहाणारा महाभिष या शापामुळें पृथ्वीवर शंतनु म्हणून जन्मला. आणि गंगेवर मोहित होऊन त्यानें तिच्याशीं गांधर्व विवाह केला. पण गंगेनें त्यावेळीं अट घातली कीं, " मी जें करीन त्याला तूं हरकत घेतां कामा नये. तूं जर माझ्या इच्छेविरुद्ध वागलास, तर मी तुला सोडून जाईन." शंतनूपासून गंगेला आठ पुत्र झाले. ते अष्टवसू होते व त्यांना पूर्वीच्या शापामुळें नदींत बुडविणें गंगेला भाग होतें. सात पुत्रांना गंगेनें असें मारून टाकल्यावर आठव्या पुत्राच्या वेळीं मात्र शंतनु राजानें तिला पुत्रप्रेमामुळें विरोध केला. म्हणून गंगा त्याला सोडून गेली. हा आठवा पुत्र म्हणजेच देवव्रत. पुढें शंतनु राजा मत्स्य-गंधेच्या प्रेमांत पडला. पण तिच्या बापानें अट घातली कीं, " माझ्या मुलीच्या मुलाला राज्य मिळणार असेल, तरच मी माझी मुलगी देईन. " शंतनूचें देवव्रतावर अतिशय प्रेम होतें. त्यानें मत्स्यगंधेच्या बापास सांगितलें कीं, "तुझ्या मुलीला मी पट्टराणी करीन, पण तिच्या मुलाला राज्य देणार नाहीं. " मत्स्य-गंधेच्या वडिलांना ही अट मान्य झाली नाहीं.

शंतनु राजा अतिशय कष्टी झाला. त्याच्या दुःखाचें कारण समजतांच देवव्रत स्वतः मत्स्यगंधेच्या वडिलांकडे गेला. मत्स्यगंधेच्या मुलाला राज्य देण्यास आपली संमति आहे असें त्याला त्यानें सांगितलें. त्यावर तो म्हणाला, " देवव्रता, पण तुझ्या मुलाबाळांचें काय ? तूं एक वेळ राज्यावरचा हक्क सोडशील. पण तुझ्या मुलांनीं माझ्या नातवंडांबरोबर तंटा केला तर ? त्याची मला हमी मिळाली, तरच मी मत्स्यगंधा शंतनूला देईन." त्यावर देवव्रतानें प्रतिज्ञा केली, " पंचमहाभूतें, देव, ऋषि, माता, पितर या सर्वांना स्मरून मी आज अशी प्रतिज्ञा करतों कीं, मी आजन्म अविवाहित राहीन आणि ब्रह्मचर्याचें पालन करीन." देवव्रतानें ही 'भीष्म' म्हणजे भीषण किंवा पालन करण्यास अतिशय कठीण अशी प्रतिज्ञा केली म्हणून 'हा भीष्म आहे' अशी देववाणी झाली. तेव्हांपासून देवव्रताला भीष्म हें नांव पडलें. भीष्म हा गंगेचा मुलगा म्हणून 'गंगापुत्र' असाहि त्याचा उल्लेख करण्यांत येतो. श्रीधर कवींनीं गंगेचें अतिशय काव्यमय वर्णन केलें आहें. 'सकल सरितांची स्वामिनी । गंगा भगवती स्त्रीरूपिणी । अंबर चंद्रबिंबवर्णी ।' शंतनु राजाला गंगेचें पहिलें दर्शन झालें, तें श्रीधर कवींनीं वर्णिलें आहे, 'प्रवाहां-तून अकस्मात । गंगा निघाली मूर्तिमंत । दिव्याभरणीं भूषित । श्वेतवसना गौरांगी ॥ १ ॥ गंगा आनंदवल्लीचें सुमन । कीं लावण्यभूमीचें निधान । कीं शुभ्र सुमनमाळा पूर्ण । अपर्णावरमस्तकींची ॥ २ ॥ कीं शृंगारनभींची चपला । कीं साक्षात् दुसरी कमला । आनंदवनींची वेल्हाळा । कुरंगिणी चमकत ॥ ३ ॥

भारतांतील असंख्य कवींना गंगानदीनें अशी अतुल काव्यस्फूर्ती दिली आहे.

गंगेचे भौतिक फायदेंहि फार मोठे आहेत. समुद्रसपाटीपासून तेरा हजार फुटांवर उगम पावलेली ही नदी प्रथम पश्चिमेकडे वहाते. मग हिमालयाच्या दक्षिणेकडील टेकड्यांच्या रांगांतून वहात जाऊन ती आग्नेय दिशेकडे वळते. अलाहाबादजवळ ती पूर्वेस वळते. अशी चारशें मैल गेल्यानंतर ती दक्षिणेकडे वळते व अनेक मुखांनीं बंगालच्या उपसागरास मिळते. गंगा नदीची लांबी १५५७ मैल आहे. तिच्या पूर्वेच्या फाट्याला पद्मा असें म्हणतात व कलकत्याजवळून गेलेल्या फाट्याला हुगळी म्हणतात. पावसाळ्यांत पावसानें आणि उन्हाळ्यांत हिमालयांतील बर्फ वितळल्यानें असे दोन पूर गंगेला

येतात. यमुना, गोमती, रामगंगा, घोग्रा, इत्यादि अनेक नद्या गंगेल, मिळतात. गंगेचें पाणी पांढरें शुभ्र असून तिच्या कांठचा भाग अतीव सुपीक आहे. गंगेला अनेक कालवे काढलेले आहेत. गंगा व तिचे कालवे यांमुळें लक्षावधि एकर जमीन सफल झाली आहे. जलवाहतुकीसाठींहि गंगेचा उपयोग चांगला केला जातो. ऋग्वेदांत चौथ्या व दहाव्या मंडलांत तिचा उल्लेख आहे. वैदिक काळांत लोक पूर्वेकडे गंगेच्या खोऱ्यांत पसरत चालले तेव्हां गंगा व यमुना यांमधील भूभागास बरेंच महत्त्व प्राप्त झालें. गंगेच्या कांठींचा मिथिला, पांचाल, मगध वगैरे देश प्राचीनकालीं होते. भारताचा इतिहास घडविणारें कुरुक्षेत्र गंगेच्याच आसमंतांत असून याच रणभूमीवर श्रीकृष्णानें अर्जुनास गीता सांगितली होती.

जन्हु राजा यज्ञ करीत असतां गंगेच्या प्रवाहानें त्याच्या यज्ञांत अडथळा आला. म्हणून त्यानें संतप्त होऊन गंगा पिऊन टाकली, पण मग लोकांच्यासाठीं कानावाटे सोडून दिली, म्हणून गंगेला जान्हवी असेंहि नांव आहे. मोक्षाप्रत गमयति म्हणजे नेते, ती गंगा अशी या शब्दाची व्युत्पत्ति आहे. काशी खंडांत गंगासहस्रनामावली आहे. तींत विष्णुपदी, जन्हुतनया, त्रिपथगामिनी, तीर्थराज, हेमवती, हरशेखरा, सुधा, नंदिनी, समुद्रसुभगा, वियद्गंगा, भीष्म-जननी, त्रिस्रोता अशीं श्रुतिमनोहर नांवें आहेत. या नांवांना इतिहासहि आहे, तो त्या नांवांवरून बहुधा लगेचच लक्षांत येतो. स्वर्ग, पृथ्वी आणि पाताळ या तिन्ही लोकांत गंगेची धार जाईल असें पुराणवचन असल्यानें तिला त्रिपथ-गामिनी म्हणतात. ब्रह्मांडांत गेल्यावर ती स्वर्गाच्या मस्तकावर असते व त्यालाच विष्णुपद असें नांव असल्यानें गंगेला विष्णुपदी म्हणतात. तिला भगवत्पदाचा स्पर्श झाला म्हणून गंगेला भगवत्पदीहि म्हणतात.

अशा या परमपवित्र नदीचें जल अखेरच्या क्षणीं आपल्या मुखांत पडावें अशी प्रत्येक हिंदूची आकांक्षा असते. आपल्या मुलीला विवाहांत जांवयाला देतांना कन्यादानाचें जें उदक सोडतात, तें गंगाजलाचें असावें असेंहि भाविक पित्याला वाटत असतें. गंगाजलाची देव्हाऱ्यांत पूजा करतात आणि राज्या-भिषेकासाठीं गंगेचें मंगल जल आणीत असत हें सर्वश्रुतच आहे.

हरद्वार हें कुंभमेळ्याचें एक क्षेत्र आहे. भारतांत चार ठिकाणीं कुंभमेळा भरतो. हरद्वार, प्रयाग, नाशिक आणि उज्जैन हीं तीं चार क्षेत्रें होत. कुंभ-

मेळ्याची कथा अशी, कीं देवदानवांनीं समुद्रमंथन केलें, तेव्हां त्यांतून अनेक रत्नें व इतर वस्तू बाहेर आल्या. पण मंथन मुख्यतः केलें गेलें तें अमृतासाठीं. अखेर समुद्रमंथनांतून अमृत आलें. अमृताचा कुंभ घेऊन धन्वंतरी समुद्रांतून आले. इंद्राचा मुलगा जयंत यानें या कुंभावर झडप घातली आणि तो पळून जाऊं लागला. कारण असुरांच्या हातीं अमृत लागलें, तर त्यांचा निःपात करणें देवांना शक्य नव्हतें. असुरांचे गुरु शुक्राचार्य यांनीं असुरांना अमृताचा कुंभ मिळविण्याची आज्ञा केली, तेव्हां ते जयंतामागें लागले. त्यावेळीं अमृतकुंभाचें रक्षण करणारे देव आणि त्याचा ताबा घेऊं पहाणारे दानव यांच्यांत लढाई झाली. ती बारा दिवस व बारा रात्रीं चालली होती. या लढाईत अमृतकुंभ दांडगाईनें हस्तगत करण्याच्या भरांत तो कुंभ चार ठिकाणीं पडला व त्यांतील अमृताचे थेंब सांडले. हीं चार ठिकाणें म्हणजे हरिद्वार, प्रयाग, नाशिक आणि उज्जैन हीं होत. दानवांनीं अमृतकुंभ हस्तगत केला, पण त्यांच्यांतच अमृत आधीं कोणी प्यावें याबद्दल झगडा लागला. तेव्हां विष्णूनें मोहिनीचें रूप घेतलें आणि सर्व दैत्यांना सारखें अमृत वाटण्याच्या मिषानें त्यानें तो कुंभ पळवून नेऊन देवांना अमृत पाजलें. देवदानवांनीं अमृतासाठीं बारा दिवस लढाई केली, त्यावेळीं चंद्रानें अमृत सांडूं दिलें नाहीं, सूर्यानें कुंभ फुटूं दिला नाहीं, कुंभ दानवांच्याकडे होता तेव्हां बृहस्पतीनें त्याचें रक्षण केलें आणि तो देवांच्याकडे होता, तेव्हां शनीनें त्याचें रक्षण केलें म्हणून ज्या ज्या ठिकाणीं कुंभ पडला त्या त्या स्थानीं जेव्हां सूर्य, चंद्र आणि बृहस्पती एका रेषेंत येतात तेव्हां त्याला कुंभयोग म्हणतात. गुरु आणि सूर्य मकर राशींत असतील आणि रविवारीं जर पूर्णिमा आली, तर हरिद्वार येथें कुंभमेळा भरतो. गुरु आणि सूर्य सिंह राशींत आले आणि गुरुवारीं पूर्णिमा आली, तर नाशिकला कुंभमेळा भरतो.

गंगाकाठीं आमचे तीन चार तास केव्हां गेले हें कळलंसुद्धां नाहीं. हातांत छोटीं छोटीं भांडीं आणि डोक्यावर ओले टॉवेल टाकून आम्ही 'हरी की पायरी' वरून निघालों. घाटाच्या पायऱ्या चढल्यावर डाव्या हातालाच मोठा बाजार आहे. त्याच्या टोकाशीं उपाहारगृहांची रांगच रांग आहे. आम्हांला चरचरून भूक लागली होती आणि समोर तळल्या जाणाऱ्या पांढऱ्या शुभ्र, भल्या मोठ्या खमंग पुऱ्या आणि बटाट्याच्या भाजीच्या राशी ही भूक

अधिकच प्रज्वलित करीत होत्या. आम्हीं एका दुकानांत पुरी भाजी घेतली. इथें या मालाचा दर आकारायचा वेगळाच प्रकार दिसला. म्हणजे असें, कीं पुरीचे चार आणे नि भाजीचे चार आणे असा दर न आकारतां पुरीचे आठ आणे आणि भाजी फुकट असा दर धरला जातो. अर्थात् दोन्हींचा अर्थ एकच, पण आपल्या पदरांत कांहींतरी फुकट पडतें ही कल्पना गिऱ्हाइकाला मोठाच संतोष देत असावी. आम्ही गरम पुरी भाजी खाऊन त्यावर उत्तम लस्सी घेतली आणि उगीच तोंड उघडें टाकून बाजारांत हिंडत राहिलों. तेथें भांडींकुंडीं, खेळणीं, कापडचोपड, काठ्या, कांबळीं अशा अनेक मालाचीं शेंसव्वाशें दुकानें होतीं. पुढच्या प्रवासांत उपयोगी पडावेत म्हणून अनेकांनीं तेथें कॅन्व्हसचे बूट घेतले. पण स्त्रियांना बूट घालून फिरण्याची संवय नसल्यानें त्यांनीं बूट घालतांना नाकें शक्य तेवढीं मुरडून ‘ कसेंतरीच वाटतें ’ असा अभिप्राय दिला.

स्टेशनवर येईपर्यंत डोकीवरचे टॉवेल वाळले होते. स्टेशनांत शिरलों, तों माकडांची रांगच रांग सज्ज असलेली दिसली. उतारूंच्या हातांत कांहीं खाद्यपदार्थांची पुडी दिसली, तर हीं माकडें सरळ त्याच्या हातांतून पुडी हिसकावून घेत आणि सूंबाल्या करीत. त्यामुळें हें माहीत असलेले उतारू पुड्या झांकून दडवून नेत. पण एखाद्या बेसावध उतारूंची पुरी भाजी किंवा भजीं माकडांच्या हल्ल्याला बळी पडे. उतारूनें प्रतिकार केला, तर हीं माकडें सरळ थप्पड मारून खाऊ नेतात असें कळलें. त्याचा पडताळा घेण्याचा प्रयत्न मात्र सहसा कोणी करीत नाहीं. स्टेशनवर आमचा प्रवासी-डबा एका सायडिंगला टाकला होता. आम्ही त्यांत चढलों आणि थोडी विश्रांति घेऊन जेवण केलें. दुपारीं जवळचें कनखल तीर्थ पहायचें होतें. साडेतीन चार वाजतां टांगे ठरवले आणि कनखलला गेलों.

हरिद्वारपासून अडीचतीन मैलांवर कनखल आहे. हरिद्वारावर रेल्वे स्टेशनमुळें शहरी छाप पडत आहे, पण कनखलचें गावरान सौंदर्य अजून टिकून आहे. ब्रह्मदेवाचा पुत्र दक्षप्रजापति याची ही राजधानी होती. जेथील जलाच्या कणानेंहि खलांचासुद्धां उद्धार होतो, तें कनखल अशी एक व्युत्पत्ति आहे. दक्षाची मुलगी सती ही अत्यंत लावण्यवती व गुणवती होती. मातापित्यांच्यावर तिचें नितांत प्रेम होतें, पण त्यांच्या इच्छेविरुद्ध तिनें भगवान्

शंकराबरोबर विवाह केला. दक्षाच्या मतें शंकर म्हणजे रानावनांत रहाणारा गोसावी. त्याला राजानें आपली मुलगी देणें कमीपणाचें आहे. पण लाडक्या कन्येनें आपण होऊन महादेवाला माळ घातल्यामुळें दक्ष रागावला. जांवयाचा अपमान करण्याच्या जिद्दीनें त्यानें महायज्ञ सुरू केला. भृगुऋषींनीं या यज्ञाचें नेतृत्व केलें. दक्षप्रजापतीनें सर्व देवदेवतांना यज्ञांत मानानें निमंत्रण दिलें, पण शिवाला बोलाविलें नाहीं. आपल्या कन्येलाहि त्यानें निमंत्रण पाठविलें नाहीं. पण सतीला स्त्रीसुलभ सरळपणानें वाटलें, कीं नजरचुकीनें आपल्याला निमंत्रण पाठवावयाचें राहून गेलें असेल; पण आपल्या माहेरीं एवढा सोहळा चालला असतांना आपण होऊन जायला काय हरकत आहे ?

शिवानें तिला या विचारापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण माहेरीं जायला निघालेल्या स्त्रीचा हट्ट सतीच्या अंगीं होताच. ती एकटीच कनखल-मध्यें आली. पण दक्ष राजाची मुलगी असूनहि तिचें कोणीं स्वागत केलें नाहीं. ती वडिलांच्याकडे गेली, पण त्यानें तिला प्रेमळ शब्दांनीं ‘ ये ’ म्हटलें नाहीं. उलट तिची व तिच्या नवऱ्याची दक्षानें निंदाच आरंभिली. शिवाला या यज्ञांत आसन कां नाहीं असें विचारतां दक्षानें सांगितलें कीं, “ स्मशानांत वास करणाऱ्या गोसावड्यांना महायज्ञांत प्रवेश मिळणार नाहीं. ” या वेळीं सतीच्या डोळ्यांतून अश्रू ओघळूं लागले. ती म्हणाली, “ मी तुमचीच कन्या आहें. तुम्ही मला हवें तें बोला. पण माझ्या पतीचा अनादर करूं नका. मीं आपण होऊन त्यांच्याशीं विवाह केला आणि येथें जी मी आलें तीहि आपुलकीच्या भावनेनें; यांत त्यांचा कांहींच दोष नाहीं. ” पण दक्ष प्रजापतीनें जांवयाला धडा शिकविण्यासाठींच महायज्ञ केला असल्यानें त्यानें बेफामपणें शंकराची निंदा चालूच ठेवली. पतीची निंदा असह्य होऊन सतीनें त्याच यज्ञाच्या कुंडांत उडी टाकली.

शंकराच्या गणांनीं ही वार्ता त्याच्या कानीं घातली, तेव्हां त्यानें यज्ञाचा विध्वंस करण्याची आज्ञा दिली. त्याचा पुत्र वीरभद्र यानें सबंध यज्ञ उद्ध्वस्त केला आणि दक्षाचा शिरच्छेद केला. स्वतः शंकर त्या ठिकाणीं येऊन त्यानें अर्धवट जळालेल्या सतीचें शव जवळ घेऊन शोक करण्यास प्रारंभ केला. पण यज्ञाच्या अग्नींत जळालेल्या सतीला जिवंत करण्याचें सामर्थ्य कोणालाच नव्हतें. शंकराच्या पुढून तें विरूप शव हलवावें म्हणून विष्णूनें त्याच्यावर

सुदर्शन सोडलें. तेव्हां सतीच्या शवाचे एकावन्न तुकडे झाले आणि सबंध भारतांत पसरले. हींच एकावन्न शक्तिपीठें झालीं. त्या प्रत्येक शक्तिपीठांत सतीबरोबरच शिवाचाहि अंश आहे.

शंकराचा पहिला क्रोध आणि नंतरचा शोक पाहून यज्ञास जमलेले सर्वजण भयभीत व कष्टी झाले. त्यांनीं शंकराचें सांत्वन केलें आणि त्याला प्रसन्न केलें. दक्षाची पत्नी प्रसूति हिनें विनवणी केल्यावरून शंकरांनीं दक्षाच्या धडास बकऱ्याचें शिर लावून त्याला जिवंत केलें. दक्षानेंहि नम्रपणें शिवास नमन केलें व विनंति केली कीं, " जन्मजन्मांतरीं आपली सेवा माझ्या हातून घडावी असा मला वर द्यावा. " शंकरांनीं 'तथास्तु' म्हटलें. त्यामुळें बकऱ्याचें शिर असलेल्या दक्ष प्रजापतीचें चित्र किंवा शिल्प बहुतेक शिवमंदिरांत गाभाऱ्याच्या उंबरठ्यावर दिसतें.

हा सारा पौराणिक प्रसंग ज्या ठिकाणीं घडला, त्या कनखल येथें गंगाकिनारीं दक्षेश्वर मंदिर आहे. मंदिरांत या कथेंतील प्रमुख घटनांचीं चित्रें आहेत. मंदिराच्या जवळच यज्ञाचें कुंड आहे. तें सतत पेटलेलें असतें. त्याला सतीचें कुंड म्हणतात. गंगेच्या किनाऱ्यावरच बेलांच्या झाडांच्या मध्यें 'बिल्वकेदार' आहे. त्यासमोरच नील पर्वत आहे आणि त्यांतून येणाऱ्या गंगेला येथें 'नीलधारा' हें काव्यमय नांव आहे. कनखलाजवळच गुरुकुल व ऋषिकुल या संस्था आहेत. त्याशिवाय खुद्द कनखलमध्यें अनेक आश्रम व धर्मशाळा आहेत. कनखल हें छोटें गांव आहे म्हणूनच तें अधिक नितांत रमणीय वाटतें.

कनखलच्या उलट बाजूला 'हरी की पायरी' पासून दोन मैलांवर 'परमार्थाश्रम' नांवाचा अतिशय सुंदर व शांत असा विशाल आश्रम आहे. १९६२ सालीं हरिद्वारला कुंभमेळा भरला होता, त्या वेळीं हा आश्रम बाल्यावस्थेंतच होता. पण आतां त्यानें खूपच मोठें स्वरूप धारण केलें आहे. निवृत्तिमार्गावरील साधकांची सोय करावी, म्हणून स्वामी शुकदेवानंद सरस्वती यांनीं या आश्रमाची स्थापना केली. या आश्रमांत प्रवेश केल्याबरोबर गजेंद्रमोक्षाची विशाल प्रतिकृति दिसते. एका लहानशा कृत्रिम सरोवरांत हत्तीचा पाय मगरीनें धरल्याचें आणि विष्णूनें चक्र फेकून गजेंद्राला मुक्त केल्याचें दृश्य येथें भव्य मूर्तींनीं दाखविलें आहे. आंत सप्तऋषीश्वर, दुर्गा,

विष्णु, राधाकृष्ण, कूर्मावतार, मत्स्यावतार, नृसिंहावतार, मोहिनी अवतार अशा मूर्तींचीं अनेक मंदिरें आहेत. परशुराम, बुद्ध, कपिल, हंस, धन्वंतरी, हयग्रीव, दत्तात्रेय यांचींहि मंदिरें आहेत. जवळच आश्रमांत रहाणाऱ्या साधूंची रहाण्याची व्यवस्था आहे. हा सर्व आश्रम व निवासस्थानें सिमेंट कॉंक्रीटचीं आहेत. इतकेंच नव्हे, तर कांहीं मंदिरांतील देवांवर विजेचा पंखाहि सतत फिरत असतो. दोन देवालयांत समोरासमोर आरसे लावण्यांत आले असल्यानें त्यांत अगदीं दूरपर्यंत लहान लहान होत जाणाऱ्या अनंत मूर्तिं दिसतात. या आश्रमातर्फे अन्नछत्र चालविण्यांत येतें. आश्रमाचा प्रकाशन विभाग असून त्याच्यातर्फे धार्मिक पुस्तकें प्रकाशित होतात. परमार्थ आश्रमाचा औषध विभाग आहे आणि आश्रमाला टेलिफोनहि आहे. आधुनिक सोयी आणि नितांत रमणीयता यांचा हा सुंदर संगम आहे.

परमार्थाश्रमाच्या जरा पलीकडे सप्तऋषि आश्रम आहे. हा आश्रम परमार्थाश्रमापेक्षां मोठा आहे. त्याच्या निदान चौपट जागा या आश्रमानें व्यापली आहे. गंगेच्या कांठच्या शांत परिसरांत आणि हरिद्वारच्या गडबडी-पासून दूर असलेल्या आश्रमांत मोठ्या इमारती नाहींत. सुरुवातीलाच एक उंच संगमरवरी स्तंभ आणि त्याच्या भोंवतींचा मोठा संगमरवरी परिसर मन प्रसन्न करतो. उघड्या जागेंत प्रवचन करण्यासाठीं ही आदर्श जागा आहे. आपल्या पुराणतील महान् ऋषींच्या स्मरणार्थ हा आश्रम बांधण्यांत आला आहे. त्यांतील मुख्य देवालयांत देवाच्या भोंवतींच्या प्रदक्षिणेच्या जागेंत या सात ऋषींचे पुतळे आहेत. हे सात ऋषि म्हणजे विश्वामित्र, कश्यप, जमदग्नि, भरद्वाज, गौतम, अत्रि आणि वसिष्ठ हे होत. प्राचीन काळीं गंगा पृथ्वीवर आली, तेव्हां हिमालयाच्या पायथ्याशीं हे सात ऋषि तपश्चर्या करीत होते. तेव्हां त्यांना उपद्रव होऊं नये म्हणून या ठिकाणीं गंगा सात प्रवाहांत विभागली गेली आणि या सात ऋषींची तपश्चर्या अखंड चालू राहून गंगाहि निवांतपणें वाहूं लागली, अशी आख्यायिका येथें सांगतात आणि ती या देवालयाच्या भिंतीवर चित्रित करण्यांत आली आहे. येथून जवळच गंगेचे सात नसले तरी चार पांच प्रवाह होतांना दिसतात. हें मात्र आम्हीं पाहिलें. या आश्रमांत लहान बंगले आहेत. त्यांत साधू किंवा अभ्यासू यांना मोफत राहतां येतें. प्रत्येक आश्रमाला कोणत्या तरी ऋषीचें नांव दिलें आहे. अनसूया, अरुंधती

अशीं पुराणांतील स्त्रियांचीं नांवें दिलेले बंगले आहेत. त्यांत योगिनींना किंवा कुटुंबांना रहावयास देतात. सप्तर्षि मंदिरांत प्राचीन ऋषींच्या बरोबरच रामतीर्थ, परमहंस, लोकमान्य टिळक, मालवीय यांच्यासारख्या अलीकडच्या काळांतील महर्षींच्याहि प्रतिमा पाहून मला फार समाधान वाटलें.

सप्तर्षि आश्रमाच्या निमित्तानें या सात ऋषींचें स्मरण करणें अवश्य आहे. अत्रि ऋषि हे ब्रह्मदेवाच्या डोळ्यापासून झाले, अशी कथा आहे. वेदांतील अग्नि, इंद्र, अश्विनी व विश्वदेव यांच्या सूक्तांचे कर्ते म्हणून अत्रि ऋषींचा उल्लेख आहे. अनसूया ही अत्रींची पत्नी. त्यांना दत्त, दुर्वास आणि सोम असे तीन चिरंजीव होते. 'अत्रिस्मृति' मध्यें या ऋषींचा उपदेश आहे. दान हाच सर्वश्रेष्ठ मित्र, माता हाच सर्वश्रेष्ठ गुरु, पातिव्रत्य हेंच सर्वश्रेष्ठ व्रत आणि विद्यादान हेंच सर्वश्रेष्ठ दान असें अत्रि ऋषींनीं म्हटलें आहे. या ऋषींच्या नांवाचें गोत्रहि आहे.

कश्यप हे अग्नीचे शिष्य होते. मरीचिपत्नी व कर्दमाची कन्या कला हिला कश्यप व पूर्णिमा असे दोन पुत्र झाले. कश्यप हे सप्तर्षींपैकीं व प्रजापतींपैकीं एक आहेत. परशुरामानें एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केल्यानंतर सरस्वतीतीरीं अश्वमेध यज्ञ केला. या यज्ञाचे अध्वर्यू कश्यप होते. अंग राजानें पृथ्वीचें दान करण्याचें ठरविलें तेव्हां आपलें कलेवर टाकून पृथ्वी ब्रह्मदेवाकडे गेली. त्या वेळीं कश्यप योगशक्तीनें पृथ्वींत शिरले व त्यांनीं तिला जिवंत केलें. म्हणून पृथ्वीस कश्यपी असेंहि म्हणतात. पुढें पृथ्वी दुष्टांच्या पापामुळें बुडूं लागली, तेव्हां कश्यपानें तिला आपल्या मांडीचा आधार दिला, म्हणून तिला ऊर्वी असें म्हणतात. कश्यपसंहिता, कश्यपोत्तर संहिता, कश्यपस्मृति हे ग्रंथ त्यांनीं लिहिले असून त्यांच्या नांवाचें 'काश्यप' हें गोत्रहि आहे.

वसिष्ठ हे ब्रह्मदेवाच्या प्राणवायूपासून निर्माण झाले असें एका पुराणांत लिहिलें आहे, तर उर्वशीला पाहून मित्रावरुणापासून हे निर्माण झाले असें ऋग्वेदांत म्हटलें आहे. वसिष्ठ हे ऋग्वेदाच्या सहाव्या मंडलाचे द्रष्टे होते. वसिष्ठ व विश्वामित्र यांचें वैर प्रसिद्ध आहे. मनूनें यांना सप्तर्षींत स्थान दिलें आहे. हरिश्चंद्राच्या राजसूय यज्ञांत वसिष्ठ हे ब्रह्मा होते. एक काळ असा होता, कीं यज्ञकर्म करण्यास वसिष्ठ हेच योग्य ब्राह्मण होते. पराशर हे वसिष्ठांचे चिरंजीव. वसिष्ठांनीं निर्माण केलेल्या ऋचांतच महामृत्युंजय मंत्र आहे.

नारदाची भगिनी अरुंधती ही वसिष्ठांची पत्नी. वसिष्ठांच्याकडे कामधेनु होती, ती विश्वामित्रांनीं बळजबरीनें नेण्याचा प्रयत्न केला. तेव्हां कामधेनूच्या शरीरापासून संरक्षक निर्माण झाले व त्यांनीं विश्वामित्राचा पराभव केला. तेव्हांपासून क्षत्रियबलापेक्षां ब्राह्मण बल श्रेष्ठ आहे हें विश्वामित्रांना पटलें व त्यांनीं तपश्चर्या करण्यास सुरुवात केली. वसिष्ठकल्प, वसिष्ठतंत्र, वसिष्ठसंहिता इत्यादि अनेक ग्रंथांचे वसिष्ठ हे कर्ते होते.

विश्वामित्र हे इंद्राचाच अवतार होते. कुशिकानें इंद्रासारखा मुलगा व्हावा म्हणून तपश्चर्या केली, तेव्हां आपल्यासारखा अन्य कोणी होऊं नये म्हणून इंद्रानें स्वतःच विश्वामित्राच्या रूपानें जन्म घेतला. विश्वामित्रांनीं सत्यव्रत त्रिशंकूला राज्य मिळवून दिलें व त्याला सदेह स्वर्गाला नेण्याचा प्रयत्न केला. विश्वामित्रांनीं तपश्चर्या केल्यानें त्यांना महर्षिपद मिळालें पण त्यांनीं इंद्रियांवर विजय न मिळविल्यामुळें त्यांना ब्रह्मर्षिपद मिळेना. त्यांचा तपोभंग करण्यासाठीं देवांनीं रंभा पाठविली, पण विश्वामित्रांनीं शाप देऊन तिला शिळा केलें. त्यांची परीक्षा पहाण्यासाठीं धर्म वसिष्ठरूपानें त्यांच्याकडे आले व अन्न मागितलें. विश्वामित्रांनीं भात तयार केला; पण तोंपर्यंत वसिष्ठ निघून गेले होते. तेव्हां विश्वामित्रांनीं हातांत भात घेऊन वर्षानुवर्षे उभें राहून त्यांची वाट पाहिली. अखेर वसिष्ठ परत आले आणि त्यांनीं विश्वामित्रांना ब्रह्मर्षि म्हटलें. विश्वामित्र स्मृति व इतर अनेक ग्रंथांचे ते कर्ते होते. त्यांनीं वसिष्ठद्वेषिणी म्हणून कांहीं ऋचा लिहिल्या, पण वसिष्ठ गोत्रांतील लोक त्या म्हणत नाहींत.

जमदग्नि हे ऋचीक व सत्यवती यांचे पुत्र. हे अत्यंत रागीट पण महातपस्वी होते. एकदां त्यांनीं सोडलेला बाण आणण्यास त्यांनीं पत्नीस सांगितलें. तीव्र उन्हामुळें तिला तो बाण परत आणण्यास उशीर झाला. तेव्हां धनुर्धर जमदग्नीस इतका संताप आला कीं, त्यांनीं सूर्याचा छेद करण्यासाठीं बाण धनुष्यास लावला. तेव्हां सूर्य त्यांना शरण आला व तोच सूर्य पुढें परशुराम या नावानें महा-तेजस्वी योद्धा म्हणून जमदग्नीचा पुत्र झाला, अशी कथा आहे. एकदां तो आपली पत्नी रेणूका हिच्यावर रागावला व आपल्या मुलांस तिचा शिरच्छेद करण्यास सांगितलें. बाकीच्या मुलांनीं नकार दिला; पण परशुरामानें आईचा शिरच्छेद केला. नंतर वडिलांना प्रसन्न करून त्यानें पुनः मातेस जिवंत केलें. पुढें कार्तवीर्य या क्षत्रियानें जमदग्नीस एकवीस बाणांनीं मारलें. त्याचा सूड

म्हणून परशुरामानें एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केली. जमदग्नीनें प्रथम श्राद्ध सुरू केलें असाहि उल्लेख आढळतो. जमदग्नीचीं बरींच सूत्रें ऋग्वेदांत आहेत.

गौतम हे दीर्घतमा व प्रद्वेषी यांचे पुत्र. ब्रह्मदेवाची मानसकन्या अहल्या ही गौतमांची पत्नी. परियात्र पर्वताजवळ आश्रमांत त्यांनीं तप केलें, तेव्हां यम प्रसन्न झाला. पितरांचें ऋण कसें फेडावें असें त्याला गौतमांनीं विचारलें असतां यमानें सत्य, धर्म, तप व शुचिर्भूतपणा हे उपाय सांगितले. बारा वर्षें दुष्काळ पडला असतांना गौतमांनीं ऋषींना अन्न देऊन वांचविलें. गौतमस्मृति या ग्रंथांत चातुर्वर्ण्य, उपनयन, राजधर्म, स्त्रियांचीं कर्तव्यें यांचा विचार केला आहे. इंद्रानें एकदां गौतमाचें रूप घेऊन अहल्येचा सहवास मिळविला. तेव्हां गौतमांनीं इंद्राला हजार क्षतें पडतील आणि अहल्या शिळा होईल असा शाप दिला. पुढें रामाच्या चरणस्पर्शानें शिळेची पुनः अहल्या झाली.

भरद्वाज ऋषींनीं वेदाध्ययनाकरितां तीन जन्म घेतल्याची कथा आहे. भरद्वाज यांना बृहस्पतीचा पुत्र असेंहि कोठें कोठें म्हटल्याचें आढळतें. ते काशीस जाऊन उपाध्याय झाले. त्यांनीं सावित्राग्नि विद्या आत्मसात केली होती.

या सप्तर्षि आश्रमाला एकदां भेट दिल्यावर तेथें महिना पंधरा दिवस रहाण्याची ज्याला इच्छा होत नाहीं, असा माणूस विरळाच. संसारी माणसाला अशा निवांत जीवनाच्या अनेक इच्छा बाजूला साराव्या लागतात. कारण आपलें चाकोरींतील जीवन अशा प्रशांत जीवनाशीं काटकोन करून असतें. रजा नाहीं, मुलांच्या शाळा आहेत, मागें घरची व्यवस्था कोण पहाणार, अशा अनेक व्यावहारिक अडचणींनीं आपण अशा आश्रमांचा सहवास फार काळ घेऊं शकत नाहीं. तरी पण एवढें तरी साधलें असें समाधान येथें आल्यावर झाल्यावांचून राहात नाहीं. आश्रमांत आम्ही तास दीड तास काढल्यावर हरिद्वारला परतलों. वाटेंत ‘ हरी की पायरी ’ जवळ भीमगोडा तलावाजवळ थांबलों. तेथील मंदिरात जाऊन आम्ही देवदर्शन केल्यावर जवळच असलेल्या ‘ हरी की पायरी ’ वर आलों. कारण आतां थोड्याच वेळांत गंगेची आरती होणार होती.

हरिद्वारला रोज सायंकाळीं होणारी ‘ गंगेची आरती ’ पहायची आम्हांला अतिशय उत्सुकता लागली होती. गंगेची आरती हें हरिद्वारचें वैभव. राजाचें खरें ऐश्वर्य राज्याभिषेकाच्या वेळीं दिसायचें, तसें हरिद्वारचें खरें सौंदर्य आणि

ऐश्वर्य गंगेच्या आरतीच्या वेळीं दिसतें. आरती सायंसमयीं होते. पण त्या-पूर्वींच भाविक लोक हरी की पायरीवर गर्दी करण्यास सुरवात करतात. आरती-साठीं जातांना वाटेवरच 'दीपदान' करण्यासाठीं फुलांचे द्रोण मिळतात. पानांच्या द्रोणांत फुलें सुंदर रचना करून भरलेलीं असतात आणि वातीच्या लहानशा निरंजनांत तेल वात घालून तें या फुलांत ठेवलेलें असतें. ही ज्योत पेटवून गंगेच्या पाण्यांत सोडली, कीं प्रवाहाबरोबर वहात जाते आणि अतिशय रमणीय दिसते. गंगेच्या आरतीच्या वेळीं नुकताच अंधार पडत असतो आणि अशा अर्ध–अंधकारांत हे शेंकडों दीप प्रवाहावरून वहात असतात. त्याच वेळीं गंगेच्या दोन्ही कांठांवर हजारों यात्रिक गंगेची आरती म्हणत असतात. किंवा टाळ्या वाजवून आरतीला साथ देत असतात. जेथें गंगामातेचें देवालय आहे, त्याच्याजवळच गंगेच्या पायरीवर तीन मोठ्या मशालीवजा समया पेटविण्यांत येतात आणि झांजा, ढोल, शंख इत्यादि वाद्यांच्या गजरांत या मशाली गंगेच्या पाण्याला ओवाळून तिची आरती करण्यांत येते. हें दृश्य इतकें भव्य, विशाल आणि उदात्त वाटतें कीं त्याची छाप आपल्या मनावर चिरंतन बसते. गंगेच्या आरतींतील भक्तिभाव, संध्याकाळचा शीतल वारा, आकाशांतल्या चांदण्यांप्रमाणें गंगाजलांत विहार करणारे असंख्य दीप, वाद्यांचा व टाळ्यांचा गजर, द्रोणांतील गुलाबपुष्पांचा मंद सुगंध असें चित्त आणि शरीर यांना संपूर्ण सुख देणारें हें दृश्य इतकें परिणामकारक असतें कीं या एकाच क्षणासाठीं हजारों मैल प्रवास करून येथवर येतों, तरी त्याचें सार्थक होतें, अशी आपली खात्री होते.

गंगेची आरती ज्या कांठावरून होते, त्याच्या उलट कांठावरच्या पायरी-वरून ती अधिकच शोभायमान दिसते. कारण समोरच्या कांठावरच्या मंदिरांचीं शिखरें, तिन्ही प्रचंड मशाली, आरती म्हणणाऱ्यांच्या प्रसन्न आकृति आणि यामध्यें वहाणाऱ्या गंगेच्या जलपृष्ठावरील चमकतीं माणकें हीं जवळच्या कांठा-पेक्षां समोरच्या कांठावरूनच अधिक स्पष्ट दिसतात. आरती झाल्यावर आम्ही त्या पायरीवर जाऊन आरतीचा अंगारा, प्रसाद घेतला आणि क्षणभर देवाच्या द्वारीं विश्रांति घेऊन परतलों.

दुसऱ्या दिवशीं दुपारीं आमचा डबा हरिद्वारहून पुढें मसुरीला जाणाऱ्या गाडीला जोडण्यांत आला. साडेचार पांचच्या सुमारास हृषीकेशला पोंचलों. या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ...

दोन क्षेत्रांतील अंतर फक्त साडेचौदा मैल आहे. हृषीकेशला आमचा मुक्काम दीड दोन दिवस पडणार असल्यानें निवांतपणें सारें पहायला भरपूर वेळ होता. तरी आम्ही संध्याकाळीं ऊन जरा खालीं होतांच आधीं गंगेच्या कांठीं गेलों. हरिद्वारच्यासारखा हृषीकेशचा घाट वैभवशाली नाहीं. लहानसाच आहे. गर्दीहि फारच कमी दिसली. दुकानें, बाजार हींहि आटोपशीरच होतीं. साधू, बैरागी, संन्यासी यांची संख्या मात्र त्या तोकड्या गर्दीच्या मानानें अधिक वाटली. गांव चांगलें आहे. हिमालयाच्या आसमंतांतील मुख्य मोटार-वहातूक येथूनच होते. कारण येथून पुढें हिमालयाच्या भागांत रेल्वे नसल्यानें मोटारीनेंच गुप्तकाशी, श्रीनगर, ज्योतिर्मठ ( जोशीमठ ) वगैरे भागांत जावें लागतें. ही वाहतूक गढवाल मोटार मालक संघाच्या मोटारींनीं होते. फक्त जोशीमठ ते बद्रीनारायण या १९ मैलांच्या फास्यावर सरकारी एस्. टी. च्या मोटारी आहेत. स्टेशनपासून गांव व मोटारस्टँड मैल दीड मैल आहे. गांवांत तार, पोस्ट, टेलिफोन वगैरे सोयी आहेत. पण हरिद्वारइतकें हें गांव स्वच्छ व प्रसन्न वाटत नाहीं.

हृषीकेशमध्यें भरत व राम यांचीं स्वतंत्र देवालयें आहेत. रामाच्या देवालयासमोर ऋषिकुंड आहे. लंकेंत जाऊन रावणाशीं युद्ध करावें लागलें म्हणून राम व लक्ष्मण यांनीं येथें प्रायश्चित्तार्थ तपश्चर्या केली, त्यामुळें हें क्षेत्र विशेष पवित्र आहे. पुष्करमंदिर, शत्रुघ्न मंदिर अशीं इतर देवालयेंहि बरींच आहेत. पण हृषिकेशचें खरें वैभव तेथून दीड मैलावरच्या मुनी की रेती येथें आहे. या ठिकाणीं जाण्यासाठीं मोटारचा रस्ता आहे. टांगेहि मिळतात.

मुनी–की–रेती हें गांव हृषीकेशप्रमाणें गंगानदीच्या उजव्या काठावर आहे. प्राचीन कालीं रैभ्य मुनींनीं या ठिकाणीं मौन धरून तपश्चर्या केली होती, म्हणून त्याला मुनी–की–रेती हें नाव पडलें आहे. स्वामी रामतीर्थ येथें येऊन कांहीं काळ वास्तव्य करीत असत. मुनी–की–रेती जवळून चंद्रभागा नदी वहाते. या गांवाजवळ कांहीं कर्तबगार मराठी माणसांनी एक अद्‌भुत कामगिरी केली आहे, त्याचीहि ओळख येथें करून दिली पाहिजे. मुंबईहून निघतांना मला एका स्नेह्यानें सांगितलें होतें कीं हृषीकेशला ‘ विठ्ठलाश्रम ’ बांधला जात आहे, त्याला, अवश्य भेट द्या. हृषीकेशला आमचा एक दिवस मुक्काम वाढला हें त्या अर्थी बरेंच झालें असें मला वाटलें. म्हणून आम्ही आठदहा जण

तेथून दीड मैलावर असलेल्या ' मुनी की रेती ' गांवीं विठ्ठलाश्रम पहायला निघालों. गंगेच्या कांठीं स्वर्गाश्रमाच्या उलट तीराला आलों. तेथें ' विठ्ठलाश्रम ' अशी पाटी होती. पण दिशा दाखविली होती ती टेकडीवर. आम्ही ती लहानशी वाट चढत चढत टेकडीवर आलों. दुरूनच एका नव्या कोऱ्या सुंदर मंदिराचा कळस दिसला. टेकडीवर चांगलें पठार आहे. तीन चार इमारती बांधल्या जात होत्या. देवळाचेंहि कांहीं बांधकाम झालें होतें व कांहीं चाललें होतें. आम्हांला लांबून येतांना पाहून विठ्ठलाश्रमाचे पदाधिकारी श्री. वसंत चिटणीस हे पुढें आले. त्यांनीं आम्हांला मंदिराची व एकंदर विठ्ठलाश्रमाची माहिती सांगितली.

मंदिराजवळच मुख्य निवासस्थान होतें. तेथें पडवींत तीस चाळीस मराठी माणसें बसलीं होतीं. एक बाई ज्ञानेश्वरीवरच्या बाराव्या अध्यायावर प्रवचन देत होत्या. नंतर कळलें, कीं ज्ञानेश्वरीची एक प्रत संपादन करणाऱ्या साखरे-बुवांच्या शिष्याच्या त्या स्नुषा. त्यांची वाणी शुद्ध आणि प्रसादमय होती. या वेळपर्यंत संध्याकाळ होत होती. त्या थंड वाऱ्यांत, डोंगराच्या पठारावर झाडाझुडपांच्या आणि मंदिराच्या सान्निध्यांतील ज्ञानेश्वरीचें तें वाचन अतिशय प्रभावी वाटत होतें. महाराष्ट्रापासून हजार बाराशें मैल दूर अगदीं वेगळ्या वातावरणांत चाललेलें प्रवचन ऐकून माणसाच्या शाश्वत मूलभूत सत्प्रवृत्तींवरचा विश्वास वाढला. तो साराच आसमंत अतिशय उदात्त वाटला.

या विठ्ठलाश्रमाची कहाणी ही मराठी माणसाच्या कर्तबगारीची उत्साह-वर्धक कहाणी आहे. १९६० सालीं महाराष्ट्रांतील कांहीं मंडळी हिमालयाच्या यात्रेस गेली. एका रात्रीं हे यात्रिक हरिद्वारपासून दीड दोन मैलांवर असलेल्या कनखल गांवीं आले. त्या आठ जणांपैकीं एकजण आजारी होता. कनखल येथें एका आश्रमांत त्यांनीं एका रात्रीपुरती जागा मागितली. पण आश्रमाच्या पदा-धिकाऱ्यांनीं सांगितलें कीं, आश्रमाच्या मुंबईच्या कचेरीकडून चिठी आणल्या-वांचून जागा मिळणार नाहीं. गांवांत निवारा नाहीं हें पाहून ही मराठी मंडळी एका आजारी माणसासह दीड मैल चालून हरिद्वारला आली. तेथेंहि त्यांना निवारा मिळाला नाहीं. तेव्हां त्यानीं ती रात्र गंगाकांठीं उघड्या मैदानावर काढली. त्याच रात्रीं त्यांनीं विचार केला, कीं या भागांत हजारों मराठी माणसें दरसाल येतात. पण आपलें म्हणावें असें त्यांना येथें ठिकाण नाहीं.

भारताच्या निरनिराळ्या प्रांतीयांच्या धर्मशाळा असून आपल्याला मात्र कांहींच निवारा असूं नये याचें त्यांना दुःख झालें. पुढें येणाऱ्या मराठी माणसांना तरी असे हाल सोसावे लागूं नयेत म्हणून या आठ मराठी लोकांनीं महाराष्ट्राचें सांस्कृतिक केंद्र तेथें स्थापन करण्याचा निश्चय केला. त्यांत 'एअर इंडिया' चे श्री. वसंत चिटणीस हे मुख्य होते.

श्री. चिटणीस या यात्रेहून परत आले, तेव्हां त्यांनीं अनेकांना भेटून हिमालयाच्या पायथ्याशीं मराठी माणसांसाठीं केंद्र स्थापण्याचा निश्चय सांगितला. श्री. बाणावलीकर, श्री. देशमुख, श्री. काणे, श्रीमती मोतीबेन दळवी इत्यादींनीं त्यांना सहकार्य दिलें. हृषीकेशजवळ चंद्रभागा नदी आहे. पंढरपूरला दुसऱ्या चंद्रभागेच्या कांठीं विठ्ठल मंदिर आहे. तसेंच हिमालयांतील चंद्रभागेच्या कांठीं विठ्ठल मंदिर व त्याला जोडूनच आश्रम स्थापण्याचा निर्णय या उत्साही कार्यकर्त्यांनीं घेतला. १९६३ सालीं समिति स्थापन झाली. महाराष्ट्राचे त्या वेळचे गृहमंत्री श्री. प. कृ. सावंत हे या समितीचे अध्यक्ष होते. विठ्ठलाश्रम संस्थेला देणग्या देणाऱ्यांना प्राप्तिकर माफ आहे. समितीनें निधि जमविण्यास सुरुवात केली. चार वर्षांत समितीनें दोन लक्ष रुपये जमविले. मे १९६४ मध्यें मंदिरांत विठ्ठल मूर्तीची स्थापना केली. या मंदिराच्या परिसरांतील नऊ एकर जमीन समितीनें विकत घेतली. मंदिरासाठीं ग्वाल्हेरहून दगड आणला. येथें राहून ज्यांना वेदाभ्यास, चिंतन, लेखन इत्यादि करायचें असेल, त्यांच्यासाठीं स्वयंपूर्ण अशीं चार निवासस्थानें बांधण्यांत आलीं असून, आणखीहि अनेक बंगले बांधण्याचें काम चालू आहे. आश्रमाच्या आवारांत भात, कलिंगडें, द्राक्षें वगैरे लावण्यांत आलीं आहेत. आश्रमांत रहाणाऱ्यांना येथील जमिनींतूनच धान्य वगैरे मिळावें अशी योजना आहे. संन्यासी व साधक यांची हिमालयांत सोय करणें, संस्कृत पाठशाला व ग्रंथालय काढणें, वेदाभ्यासासाठीं येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीं वसतिगृह बांधणें अशा अनेक योजना समितीकडे असून, त्या पूर्ण करण्यासाठीं निधि गोळा केला जात आहे. समितीला दिल्लीचे इंजिनियर श्री. पु. मा. अंधारे यांनीं विनामूल्य आराखडे तयार करून दिले. त्याशिवाय प्रचारासाठीं चित्रपट, पुस्तिका, माहितीपत्रकें इत्यादि सर्व कामें समितीसाठीं मराठी माणसांनीं मोफत केलीं आहेत. उठल्यासुटल्या मराठी माणसांच्यावर टीका करून त्यांचा उत्साहभंग करणाऱ्यांना

'विठ्ठलाश्रम' हें स्फूर्तिदायक व चोख असें उत्तर आहे, असें मला हें संस्कृति-केंद्र पहातांना वाटलें.

मराठी साहित्य संमेलनासाठीं ही अगदीं योग्य अशी जागा आहे असा विचार त्या वेळीं माझ्या मनांत आला. साहित्यरसिकांनी अशा निवांत ठिकाणीं येऊन चार सहा दिवस रहावें. शहराच्या धकाधकीपासून दूर असलेल्या या निवांत रमणीय ठिकाणीं साहित्यचर्चेचें सत्र असावें असें मला वाटलें. येथें साहित्य-संमेलन किंवा निदान मराठी साहित्यिकांचा मेळावा भरवायचा ठरला, तर त्याला आपण सर्व तऱ्हेची मदत करूं आणि विठ्ठलाश्रमावर साहित्यिकांचा तसा अधिकारच आहे असें श्री. चिटणीस यांनीं मला आश्वासन दिलें.

या विठ्ठलाश्रमापासून मैलभर अंतरावर सुप्रसिद्ध 'लक्ष्मण झूला' आहे. हिमालयाकडे पायवाटेनें किंवा वाहनानें प्रवास करणारे या पुलापर्यंत गंगेच्या उजव्या कांठानें जात असतात. पण हा पूल ओलांडून गेलें, कीं गंगा डाव्या हाताला रहाते. गंगा नदीवर जे अनेक पूल आहेत, त्यांपैकीं हा एक अत्यंत महत्त्वाचा आहे. फार पूर्वीं म्हणजे पाऊणशें-ऐंशी वर्षांपूर्वीं हा पूल शिंक्याचा असे. गंगेच्या या कांठापासून त्या कांठापर्यंत एक दोरी बांधलेली असे. आणि या दोरीला शिंक्यांची एक मालिका बांधलेली असे. यात्रिक मग एका शिंक्यांतून दुसऱ्या शिंक्यांत असें करीत अगदीं जीव मुठींत धरून हा शिंक्यांचा पूल पार करीत. खालीं खोलवर गंगेचा जोरदार प्रवाह दिसायचा आणि एखादा कमजोर मनाचा प्रवासी मध्येंच घाबरून थबकायचा. दोरीला बांधलेल्या शिंक्यांत माणसानें बसून तें शिंकें ओढण्याचाहि प्रकार झाला. पण पुढें हा चालत जाण्यासारखा झुलता पूल झाला आणि अगदीं अलीकडे तर जीप मोटारीहि त्यावरून जाऊं शकतात. इतका तो बळकट झाला आहे. तरी अजूनहि या पुलावरून खालीं नजर टाकली, तर भीति वाटल्यावांचून रहात नाहीं. कारण बळकट असला, तरी हा पूल हालत राहतो आणि अस्थिरतेची कल्पना मनाला चाटून जाते. समुद्रसपाटीपासून अकराशें फूट उंचीवरचा आणि ४५० फूट लांबीचा हा पूल पार करून गेल्यावर मंदिरें, आश्रम, धर्मशाळा यांची एक अतिशय मनोहर व लांबच लांब रांग लागते. या ठिकाणीं गंगेचें पात्र सुमारें तीनशें फूट रुंद आहे.

लक्ष्मण झूल्याजवळच लक्ष्मणाचें मंदिर आहे. भारतांत राम–सीता यांचीं

हजारों मंदिरें आहेत आणि त्यांपैकीं कांहीं मंदिरांत लक्ष्मणाची दुय्यम मूर्ती आहे. पण लक्ष्मणाचें असें स्वतंत्र मंदिर क्वचितच दिसतें. लक्ष्मण म्हणजे रामायणांतील बंधुप्रेमाचा समूर्त आदर्श. इंद्रजिताच्या वधामुळें हातून जें पातक घडलें, त्याचें क्षालन व्हावें म्हणून लक्ष्मणानें येथें तपश्चर्या केल्याचा उल्लेख आढळतो. येथें भरत, शत्रुघ्न, पुष्कर यांचींहि स्वतंत्र मंदिरें आहेत. महादेवाचेंहि एक देवालय असून इतरहि लहानमोठीं मंदिरें अलीकडे उभारण्यांत आलीं आहेत. या भागांत गीता-मंदिर हें सर्वांत मोठें असून त्याची कल्पनाहि अतिशय रम्य आहे. गंगेच्या कांठीं विस्तीर्ण जागेवर मध्यें प्रचंड चौक ठेवून त्याभोंवतीं हें गीतामंदिर बांधलेलें आहे. या मंदिरांत वरच्या मजल्यावर मोठें सभागृह आहे. या सभागृहांत भिंतीवर गीतेंतील सर्व अध्याय व श्लोक सुबक अक्षरांत लिहिलेले आहेत. या सभागृहांत गीतेवर प्रवचनें होतात व सभागृह श्रोत्यांनीं भरून गेलें, तर खालील चौकांत ध्वनिक्षेपकाच्या साहाय्यानें प्रवचन ऐकूं येतें. तळमजल्यावरील चौकाच्या भोंवतालच्या भिंतींवर रामायण, महाभारत, भागवत इत्यादि पुराणांतील ठळक प्रसंगांचीं मनोहर चित्रें काढण्यांत आलीं आहेत. या मंदिरांत सुमारें पांचशें लोकांची रहाण्याची सोय आहे, ती विनामूल्य आहे. महाराष्ट्रांतीलही कांहीं लोक या ठिकाणीं दोन तीन महिने राहून गीतातत्त्व श्रवण करतात आणि रोज गंगास्नान करून निवांतपणें वेळ घालवितात. गीतामंदिरांत गोरखपूर येथील गीता प्रेसचें पुस्तकाचें दुकान आहे. त्यांत हिंदी भाषेंतील प्रमुख धार्मिक ग्रंथ मिळतात.

जवळच परमार्थ निकेतन आहे. तेथील घड्याळाचा उंच मनोरा दुरूनच प्रवाश्यांचें लक्ष आकर्षित करून घेतो. या आश्रमांतहि रहाण्यासाठीं विनामूल्य खोल्या मिळतात. या आश्रमांत धर्मग्रंथांतील अनेक प्रसंगांचीं चित्रें किंवा पुतळे आहेत. त्यांत शबरीनें रामाला दिलेलीं बोरें, सुदाम्यानें श्रीकृष्णास दिलेले पोहे, सावित्रीनें यमाकडून पतीचे प्राण मिळविले, भगीरथानें पृथ्वीवर आणलेली गंगा, शिव-पार्वती-विवाह, कामदहन, विश्वरूपदर्शन इत्यादि दृश्यें मनोहर आहेत. त्याशिवाय आद्य शंकराचार्य, अगस्ति, वसिष्ठ, भरद्वाज, इत्यादींच्या मूर्ति किंवा चित्रेंहि आहेत. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, लोकमान्य टिळक यांचींहि चित्रें महाराष्ट्रापासून हजार बाराशें मैलांवर येथें दिसलीं आणि अतिशय आनंद वाटला. परमात्म निकेतनांतील वातावरण प्रसन्न आणि नांवाला शोभणारें,

परमार्थाच्या भावना निर्माण करणारें आहे. याचें नांव जरी आश्रम असलें, तरी सर्व इमारती आधुनिक सोयीच्या, सिमेंट कॉंक्रीटच्या व स्वच्छ आहेत. येथें महिना दोन महिने रहावें आणि जगाच्या गजबजाटापासून दूरच्या या प्रशांत भागांत गंगांकांठीं कांहीं वाचन करावें असें फार वाटलें. धर्मग्रंथ वाचावेत, निरनिराळ्या प्रांतांतून किंवा देशांतून आलेल्यांशीं चर्चा करावी आणि जीवनाचा सुसंगत अर्थ लावण्याचा प्रयत्न करावा याला हें अगदीं योग्य असें स्थळ आहे.

गीतामंदिर आणि परमार्थ-निकेतन यांच्या जवळच आणखी एक तितकेंच पवित्र ठिकाण आहे. तें म्हणजे बाबा काळी कमळीवाले यांची समाधी व गादी. या ठिकाणीं गंगोत्रीहून खास आणलेलें गंगाजळ मिळतें. या केंद्रातर्फे अजूनहि गोरगरिबांना रोज दोन वेळां मोफत अन्न देण्यांत येतें. काळी कमळीवाले यांच्या या केंद्रांत लक्ष्मीनारायण आणि राम-सीता यांच्या सुबक मूर्ति आहेत. त्यांची गादी व समाधी असलेल्या पवित्र व प्रशस्त सभागृहांत कांहीं क्षण काढले, कीं ते मानव असूनहि देवाचिया द्वारीं बसल्यासारखें मन शांत व प्रसन्न होतें. कारण हिमालयाचा आसमंत बाबा काळी कमळीवाले यांच्या त्यागी, उदार आणि पवित्र वास्तव्यानें आणि कर्तृत्वानें दरवळून गेला आहे.

हिमालयाच्या वाटेवर सर्वत्र बाबा काळी कमळीवाले यांच्या धर्मशाळा व इतर सोयी आहेत. त्यांचें नांव स्वामी विशुद्धानंद. १८८४ सालीं त्यांनीं हिमालयाची यात्रा केली. यम्नोत्री, गंगोत्री, केदारनाथ, बदरीनारायण अशीं उत्तरखंडांतील अनेक पवित्र स्थानें त्यांनीं पाहिलीं. त्या वेळीं ही यात्रा इतकी अवघड होती, कीं आतां त्याची कल्पनाही करतां यावयाची नाहीं. कित्येक ठिकाणीं जंगलांत धड पायवाटाहि नव्हत्या. दोन दोन, तीन तीन दिवस काट्याकुट्यांतून आणि जंगली श्वापदांच्या भयांतून प्रवास करावा, तेव्हां दहावीस घरांची वस्ती लागत असे. तेथील लोकहि अतिशय गरीब असल्यानें त्यांच्याकडे निवाऱ्याची किंवा इतर कसलीहि सोय होण्याची शक्यता नव्हती. अशा अतिशय प्रतिकूल परिस्थितींतहि दरसाल शेंकडों लोक या बिकट यात्रेस जात असत. पण त्यांपैकीं कित्येकजण वाटेंतच भुकेनें, थंडीनें किंवा आजारानें मृत्युमुखीं पडत. जे कशीबशी यात्रा पूर्ण करीत त्यांचेहि कल्पनातीत हाल होत असत.

स्वामी विशुद्धानंदांनीं यात्रेकरूंचे हे अपरिमित हाल पाहिले आणि स्वतः

अनुभवले. हे हाल कमी करावे असें स्वामीजींच्या मनानें घेतलें. त्यांनीं त्यासाठीं एक समिती स्थापन केली. उत्तरखंडांत शेंकडों मैलांच्या भागांत धर्मशाळा बांधून यात्रेकरूंना निवारा, पाण्याची सोय वगैरे देणें हें प्रचंड कार्य होतें आणि त्यासाठीं फार मोठ्या रकमेची गरज होती. विशुद्धानंद कलकत्त्याला गेले, पण तेथील बडे व्यापारी त्यांना दाद देईनात. शेवटीं त्यांनीं त्यासाठीं प्रायोपवेशन केलें. हिमालयांतील यात्रेकरूंच्या सोयीसाठीं त्यांनीं आपले प्राण पणाला लावले, तेव्हां एका धनाढ्य बाईनें आपल्या अंगावरील पांच हजार रुपयांचे दागिने काढून त्यांच्यापुढें ठेवले. पण स्वामी विशुद्धानंदांनीं सांगितलें, "तुमच्या पतीच्या परवानगीवांचून मला ही देणगी घेतां येणार नाहीं." निधि जमविण्याच्या बाबतींत त्यांची ही तत्त्वनिष्ठा व निर्धार पाहून इतरांनींहि देणग्या देण्यास सुरुवात केली. हळूं हळूं निधि वाढूं लागला आणि स्वामीजींनीं उपोषण सोडून यात्रेकरूंच्या सोयीसाठीं धर्मशाळा वगैरे बांधण्यास सुरुवात केली.

हें कार्य चाललें असतांच एक व्यापारी विशुद्धानंदांच्याकडे आला. व्यापारांत त्याचें अतोनात नुकसान झालें होतें व तो व्यापार उदीम सोडून परमार्थाच्या मार्गाला लागूं इच्छीत होता. पण विशुद्धानंदांनीं त्याला सांगितलें, "हें तुझें वैराग्य फार काल टिकणार नाहीं. कारण त्याचा उगम पराभवांतून आणि वैतागांतून आला आहे. तूं पुनः व्यापारांत जा आणि उत्तम व्यवहारानें वाग. माझा तुला आशीर्वाद आहे." स्वामीजींचा आशीर्वाद घेऊन तो पुनः व्यापारांत पडला आणि त्याला चांगले दिवस आले. कांहीं वर्षांनीं तो स्वामीजींच्याकडे आला आणि म्हणाला, "आपल्या प्रसादानें मला आज वैभव मिळालें व त्यांतील कांहीं आपल्याला द्यावें अशी इच्छा आहे." पण स्वामीजी स्वत:साठीं कांहींहि घेत नसत. त्यांनीं हिमालयांतील वाटेवर धर्मशाळा बांधण्यास त्या व्यापाऱ्याला सांगितलें. त्याप्रमाणें त्यानेंहि या धर्मशाळांत मोठीच भर घातली. या धर्मशाळेंत यात्रेकरूंना मोफत जेवणाचीं सदावर्तें असत आणि गरजू व गरीब यात्रेकरूंना एक कांबळी व औषधोपचारहि मिळत. याशिवाय पाठशाळा, धार्मिक केंद्रें, पाणपोया, गोशाळा, पाण्याचे हौद यांचीहि सोय विशुद्धानंदांनीं व त्यानंतरच्या त्यांच्या शिष्यांनीं केली. आर्थिक परिस्थितीमुळें व वाढत्या महागाईमुळें अलीकडे सदावर्तें जवळजवळ

बंद झालीं आहेत. पण या भागांत १८० वर धर्मशाळा विशुद्धानंदांच्या प्रेरणेनें निघाल्या आहेत, व अजून चालू आहेत. स्वतः स्वामीजी इतके निःस्पृह होते, कीं आपल्या धर्मशाळेंत किंवा सदावर्तांतसुद्धां स्वतः काम केल्यावांचून ते अन्नग्रहण करीत नसत. धर्मशाळेची झाडलोट करणें किंवा हौदांत घागरींनीं पाणी भरणें असें संस्थेचें काम केल्यावरच ते सदावर्तांत जेवण घेत. त्यांच्या अंगावर नेहमीं काळ्या कांबळ्याची कफनी असे, म्हणून पुढें त्यांचें नांव बाबा काळी कमळीवाले असें पडलें.

या कर्मवीराच्या स्मृतीला अभिवादन करून आणि इतर देवालयें, आश्रम पाहून आम्ही नाव घाटावर आलों. त्यावेळीं वरून ऊन तापत होतें, पण गंगेचें पाणी मात्र अत्यंत थंड होतें, येथून गंगापात्र पार करण्यासाठीं एकसारख्या नावा सुटत असतात. नावेजवळून मोठमोठे मासे घिरट्या घालीत असतात आणि प्रवाश्यांनीं टाकलेलें अन्न मटकावीत असतात. गंगेच्या वरच्या प्रवाहांतून येणारे ओंडके हलके हलके खालीं सरकत असतात. दोन्ही बाजूंना हिरवेचार पर्वत, मध्यें नदीचें खोल पात्र, कांठांवर आश्रम आणि मंदिरें यांचें लहान लहान होत जाणारें दर्शन, उजव्या हाताला उंचावर दिसणारा लक्ष्मण झूला आणि डाव्या हाताला अनंताकडे जाणारें भागीरथीचें पाणी या सुंदर दृश्याचा संथ आस्वाद घेत आम्ही पलीकडच्या तीराला लागलों आणि टांग्यांत बसून हृषीकेशकडे परतलों.

दुसऱ्या दिवशीं आम्हांला मोटारीनें श्रीनगरला जायचें होतें. सकाळीं नऊ वाजतां मोटार निघणार म्हणून आम्ही त्यापूर्वींच तयार झालों. दहाच्या सुमाराला दोन मोटारी आल्या. त्यांवर आमचें सामान चढवलें. कोणी कोठें बसायचें हें आधींच ठरविलेलें असल्यानें कांहींच वाद निघाला नाहीं. मात्र मोटार सरळ श्रीनगरकडे न जातां हृषीकेशमध्येंच गेली. चौकशी करतां कळलें कीं, ज्यानें स्टेशनपर्यंत मोटार आणली, तो क्लीनर होता. खरा ड्रायव्हर गांवांत होता. त्याला क्लीनरनें शोधलें. थोडी मोटार–दुरुस्ती केली आणि 'जय केदारनाथ' 'जय बद्रीविशाल' अशा ललकाऱ्यांत आम्ही श्रीनगरच्या वाटेनें निघालों. मोटारीनें तास दोन तास गमावल्यानें त्यावेळीं मला महाराष्ट्रांत एस. टी. सुरू होण्यापूर्वींच्या मोटार-वाहतुकीची आठवण झाली.

हिमालयाच्या भागांतील मोटारवाहतूक एकमार्गी आहे; पण एखादा

माणूस एकमार्गी म्हणजे सरळ असतो, त्या अर्थीं नव्हे. उलट, ही वाहतूक बरीच गुंतागुंतीची आणि वेळघेणी आहे. डोंगरांतील रस्ते अरुंद आणि धोक्याचीं अनंत वळणें असलेले आहेत, त्यामुळें मोटारी एकाच बाजूनें जाऊं शकतात. दुतर्फा वाहतूक नसल्यानें दोन तीन तासांच्या अंतरानें आलटून-पालटून दोन दिशांच्या मोटारी सोडाव्या लागतात. त्यासाठीं ठिकठिकाणीं वाहतूक पोलिसांचीं गेट्स आहेत. समजा, हृषीकेशचें गेट श्रीनगरकडे जाण्या-साठीं सकाळीं अकराला खुलें होतें. तें अर्धा तास खुलें राहील. मग बंद होईल. त्यानंतर या गेटनें जाणाऱ्या मोटारी देवप्रयागाला दोनला पोंचतील. मग तिकडून मोटारी सुटतील. त्या हृषीकेशला आल्यावर वेळ राहिलाच तर इकडून पुनः मोटारी जातील. रात्रीची वाहतूक बंद असते. त्यामुळें एखादें 'गेट' वेळेअभावीं चुकलें, कीं चार सहा तास मुक्काम पडलाच. कधीं कधीं तर अंदाज चुकून गेट हुकलें तर प्रश्याशांना मोटारींतच रात्र काढावी लागते. म्हणून या भागांत ठराविक वेळेलाच गेटांतून जाण्यासाठीं मोटारींची धांवपळ असते. एका वेळीं दहा ते पंधरा मोटारी जथ्यांत असतात. पुढच्या मोटारीला पोलिसांतर्फे लाल निशाण लावण्यांत येतें आणि अखेरच्या मोटारीला हिरवें निशाण लावण्यांत येतें. हिरव्या निशाणाची शेवटची मोटार गेली, कीं त्या गेटमधून उलट बाजूची वाहतूक सुरू होते.

एक मात्र खरें, कीं, या भागांतला मोटारप्रवास रोमांचकारक आहे. वळणें इतकीं असतात आणि रस्ते इतके अरुंद असतात कीं, आपल्यासारख्या नवख्या प्रवाशाला एकसारखी भीती वाटत असते. एका बाजूला खोल दरी, त्या दरींत शुभ्रजलाची नदी, त्यापलीकडे डोंगर, सगळ्या जमिनी हिरव्या ठिपक्यांनीं भरून टाकणारीं झाडें, दुसऱ्या बाजूला उंचच उंच कडे अशा निसर्गरम्य पण मोटार कोसळण्याची भीति दाखविणाऱ्या रस्त्यावरून आपण प्रवास करीत असतों. 'बाबा रे ! मोटार जरा हळू चालवलीस तर बरें होईल !' असें ड्रायव्हरला सांगावेंसें वाटतें. एका वळणावर मोटार रस्त्याच्या अगदीं कडेला जावी आणि जीव मुठींत धरून, डोळे मिटून उगी रहावें, पण तेवढ्यांत तें वळण गेल्यावर समाधानाचा सुस्कारा सोडावा. पण लगेच दुसरें बांकदार वळण पुढें दिसावें असा प्रकार सुरुवातीला होतो. पण दहा-पंधरा मिनिटांतच नवा प्रवासी धीर करूं लागतो आणि त्याची भीति हळूहळू कमी होते. मग कोठें

त्याचें लक्ष आसपासच्या निसर्गसौंदर्याकडे लागतें.

हृषिकेश सोडल्यावर सुमारें तीन तासांनीं आमची मोटार देवप्रयागला थांबली. तीन तासांत आम्ही फक्त ४५ मैल अंतर तोडलें होतें. देवप्रयाग हें अतिशय मनोरम गांव आहे. या ठिकाणीं गंगा आणि अलकनंदा या नद्यांचा संगम होतो. येथें संस्कृत महाविद्यालय आणि रामाचें प्राचीन देवालय आहे. नदीच्या दोन कांठांवर पायरीपायरीनें असलेलीं घरें आणि दोन कांठांना जोडणारा झुलता पूल मनोहर दिसत होता. देवप्रयाग हें बरेंच मोठें गांव आहे. कोल्हापूर-सोलापूरसारखीं दुकानें, उपाहारगृहें वगैरे दिसलीं. तार, फोन-कचेऱ्याहि आहेत. देवप्रयागची उंची समुद्रसपाटीपासून १७०० फूट आहे. श्रीरामचंद्रांनीं रावणाचा वध केल्यानंतर देवप्रयागला तप केल्याचा उल्लेख कोठें कोठें आढळला.

देवप्रयागच्या राममंदिरांतील मूर्तीची स्थापना आद्य शंकराचार्यांनीं केली. पण १९०३ च्या भूकंपांत मंदिर पडलें. दौलतराव महाराज शिंदे यांनीं या मंदिराचा जीर्णोद्धार केला. बलिराज, विदुर इत्यादींनींहि देवप्रयाग येथें तप केलें असल्याची आख्यायिका आहे. विष्णूच्या पदकमलापासून निघणारी अलकनंदा आणि शंकराच्या जटेंतून निघणारी गंगा यांच्या मीलनाच्या या भूमीवर अनेक महर्षींनीं तप केल्याचे उल्लेख पुराणांतरीं आहेत. म्हणून स्नानदान, श्राद्ध इत्यादि धार्मिक विधींसाठीं हें क्षेत्र विशेष पवित्र मानलें गेलें आहे. देवप्रयाग ज्या पर्वताच्या पायथ्याशीं आहे, त्याचें नांव राघव पर्वत असें आहे, गंगेच्या पलीकडे दशरथ पर्वत आहे. अलकनंदेंत वसिष्ठकुंड असून गंगेंत ब्रह्मकुंड आहे.

श्रीनगरपासून तीन मैलांवर बिल्वकेदार आहे. त्यालाच भिल्लकेदार असेंहि म्हणतात. येथील शिवलिंगास वेल वाहण्याचें पुण्य मोठें असतें. कारण याच ठिकाणीं 'किरातार्जुन युद्ध' झालें. त्याची पुराणांतरींची कथा अशी, कीं बिल्वकेदार जवळच्याच इंद्रकीट पर्वतावर अर्जुन पाशुपतास्त्रासाठीं शंकराची आराधना करीत तप करीत होता. पण हें प्रभावी अस्त्र देण्यापूर्वी अर्जुनाची सत्त्वपरीक्षा करावयाची असें शंकरांनीं ठरविलें. म्हणून त्यांनीं वराहाचें रूप धारण केलेला एक राक्षस अर्जुनावर सोडला. अर्जुनानें त्याच्यावर बाण सोडला व त्याच वेळीं शंकरानें किराताचें रूप घेऊन वराहावर बाण सोडला. ही शिकार

कोणीं केली याबद्दल अर्जुन आणि किरातरूपी शंकर यांच्यांत युद्ध जुंपलें शंकरानें अर्जुनास मूर्च्छित केलें. पण शुद्धीवर आल्यावर अर्जुनानें शिवलिंग तयार केलें आणि भक्तिभावानें त्याच्यावर बिल्वपत्र घातलें. मग तो नव्या उत्साहानें किराताबरोबर युद्धास तयार झाला. पण आपण नुकतेंच शिवलिंगावर वाहिलेलें बिल्वपत्र किराताच्या शिरावर दिसलें, तेव्हां अर्जुनानें हाच शंकर असें ओळखून त्याला साष्टांग नमस्कार घातला. म्हणून शंकरहि प्रसन्न होऊन त्यांनीं त्याला पाशुपतास्त्र दिलें.

हृषिकेशहून मोटारीनें निघाल्यावर पहिला मुक्काम पडला, तो श्रीनगरमध्यें. मात्र काश्मीरमधील राजधानीचें गांव श्रीनगर तें हें नव्हे. गांव येण्यापूर्वी तीन मैल मोठा भक्कम पूल आहे. हा अगदीं अलीकडेच झाला आहे. पूर्वी पूल होता तो दोऱ्यांचा होता. त्यावरून मोटारी जाऊं शकत नसत. म्हणून यात्रेकरू पूर्वी या पुलाशीं उतरून पुढें चालत जात असत. श्रीनगरमध्यें आद्य शंकराचार्यांच्या वेळचीं ‘ श्री ’ यंत्रें आहेत. त्यावरून या शहरास श्रीनगर हें नांव पडलें असें सांगतात. येथील कमलेश्वर महादेवाची कथा ‘ महिम्न स्तोत्रांत ’ दिली आहे ती अशी :

एकदां श्रीकृष्णानें महादेवाची पूजा करण्यासाठीं एक हजार कमळें जमविण्याचा निश्चय केला. हिमालयाच्या आसमंतांत फिरून मिळतील तेवढीं कमळें श्रीकृष्णानें आणलीं. पण मोजून पहातां तीं ९९९ भरलीं. एकच कमळ कमी पडल्यामुळें आपली महापूजा व्यर्थ जाणार म्हणून श्रीकृष्णानें आपला नेत्र हेंच हजारावें कमळ असें समजून तो काढून ९९९ कमळांच्या बरोबर महादेवांस अर्पण केला. श्रीकृष्णाची परीक्षा पहाण्यासाठींच महादेवांनीं हिमालयांत एक कमळ त्याला कमी मिळेल अशी परिस्थिती निर्माण केली होती. पण श्रीकृष्णानें आपल्या अपार भक्तीनें महादेवावरहि मात केली. तें पाहून महादेव प्रसन्न झाले आणि त्यांनीं श्रीकृष्णास सुदर्शन चक्र दिलें. श्रीकृष्णानें महादेवाला याच ठिकाणीं सहस्र कमलें वाहिलीं म्हणून या देवास कमलेश्वर महादेव हें नांव देण्यांत आलें आहे.

आद्य शंकराचार्यांच्या काळापर्यंत या श्रीनगरांत नरबली दिला जात असे. एका श्री यंत्रापुढें शाक्तपंथीय हा बली देत. पण आद्य शंकराचार्यांना ही गोष्ट समजली, तेव्हां ते श्रीनगरला गेले आणि ज्या श्रीयंत्रापुढें नरमेध होत असे,

तें चक्र उलटविलें आणि '.आजपासून नरबली बंद' अशी आज्ञा केली.

श्रीनगर ही एकेकाळीं टेहरी गढवाल संस्थानची राजधानी होती. समुद्र-सपाटीपासून या गांवाची उंची १९०० फूट आहे. अलकनंदा नदीच्या कांठावर उत्तरदक्षिण असें हें गांव आहे. हें गांव नसून, गढवालच्या मानानें मोठें शहरच आहे असें म्हटलें पाहिजे. सुमारें पाऊणशें वर्षांपूर्वी महापूर आला आणि त्यांत जुनें श्रीनगर वाहून गेलें. तेथून एक मैलावर सुरक्षित जागीं नवें श्रीनगर वसलें आहे. गुप्तकाशी सोडल्यानंतर पुढें इतकें मोठें शहर लागत नाहीं. त्यांत पोस्ट, तार, हॉस्पिटल वगैरे सर्व सोयी आहेत. आम्ही श्रीनगरमध्यें पोंचलों, तेव्हां साधारण पांच साडेपांच वाजले असतील. प्रवासांतली धूळ झाडून चहापाणी घेऊन आम्ही गांव पहायला बाहेर पडलों. महादेवाचें दर्शन घेतलें आणि नदीवर गेलों. नदीला त्यावेळीं फारसें पाणी नव्हतें. पण नदीचें पात्र खूपच मोठें होतें. लहान लहान गोटे आणि रेती यांनीं तें भरून गेलें होतें. कांठालाच एक सुंदर बाग होती. आम्ही त्या रमणीय नदीकांठीं थोडा वेळ विश्रांति घेतली. तेथून आम्हांला बर्फाच्छादित अशा एका पर्वत-शिखराचें लांबून दर्शन झालें, पण तें इतकें लांब होतें कीं त्याचा पांढरा रंग अगदीं अस्पष्ट दिसत होता. तरी पण आपण हिमालयाच्या आसपास आलों ही पहिली उत्तेजक भावना त्या शिखरामुळें आली. नदींत स्नान करावें असें वाटलें, पण पाणी इतकें थंडगार होतें कीं, तो विचार सोडून दिला. अंधार पडूं लागला, तेव्हां नदीकांठीं गेलेले आम्हीं पांच सहाजण पुनः धर्मशाळेंत परतलों. ही धर्मशाळा सरकारी होती आणि चांगली शेंसव्वाशें लोक रहातील इतकी प्रशस्त होती. आमच्या यात्रिकांनीं तिच्या एका बाजूला पथाऱ्या पसरल्या होत्या. हृषीकेश ते श्रीनगर हें अंतर ७० मैलांचेंच असलें, तरी उन्हाळा, धूळ आणि वळणें असलेल्या रस्त्यावर मोटारीनें घेतलेले वांकडेतिकडे हेलकावे यांमुळें आम्ही खूपच दमून गेलों होतों. जेवणें आटोपलीं आणि आम्ही झोंपून गेलों.

श्रीनगरहून मोटारीनें अगदीं सकाळींच निघालों. सामानाची फारशी बांधा-बांध करण्याचा प्रश्न नव्हता. कारण लवकर निघायचें असल्यानें ट्रंका, बॅगा खालीं काढल्याच नव्हत्या. ज्या मोटारींनीं आम्ही हृषिकेशहून श्रीनगरला आलों, त्याच मोटारींच्यावर हें सामान होतें. झोंपण्यासाठीं फक्त होल्डॉल आणि

वळकट्याच खालीं घेतल्या होत्या. पहांटे पांचला उठून हें सारें आवरलें आणि चहापाणी घेऊन सहा-साडेसहाला श्रीनगर सोडलें. प्रवासाचा रस्ता पूर्वीसारखाच रमणीय होता. एका बाजूला उंचच उंच पर्वत आणि दुसऱ्या बाजूला हिरव्या खोल दरींतून वहाणारी निळसर रंगाच्या पाण्याची नदी यांमधून जाणाऱ्या निरुंद रस्त्यावरून मोटार आटोपशीर वेगानें जात होती.

सकाळीं नऊच्या सुमाराला रुद्रप्रयागला पोंचलों आणि गेटाच्या विलामतींत सांपडलों. अडीच तास गेट नाहीं असें कळलें; पण गेट ताबडतोब मिळालें नाहीं, तेंच बरें झालें असें नंतर वाटलें. कारण रुद्रप्रयागचा संगम म्हणजे एक प्रभावी काव्य आहे. अलकनंदा आणि मंदाकिनी या दोन नद्या येथें मिळतात. पण त्या उंचावरून येत असल्यानें त्यांचा संगमाजवळचा जोर विलक्षण आहे. वर्षानुवर्षाच्या विरहानंतर अतिशय आवेगानें, आतुरतेनें, वेगानें एखाद्या युगुलानें भेटावें, तशा या दोन नद्या जोरानें एकमेकीला मिठी मारतात आणि एकरूप होतात. जीं दोन प्रमुख तीर्थक्षेत्रें पहाण्यासाठीं आम्ही जात होतों, त्याच क्षेत्रांहून त्या नद्या आल्या होत्या. मंदाकिनी नदी केदारनाथहून येते आणि अलकनंदा नदी बद्रीनारायणाहून येते. विशेषतः अलकनंदेचा प्रवाह अतिशय जोराचा आहे, त्यामुळें मोठ्या लाटा उसळत असल्याचें दुर्लभ दृश्य या संगमावर दिसतें. समुद्राशिवाय सर्वसाधारणपणें नदीवर असें दृश्य दिसत नाहीं. गांवाच्या एका टोकाला हा संगम आहे. पाण्याजवळ जाण्यासाठीं खूपच खोल उतरून जावें लागतें. पण त्यासाठीं सुंदर पक्क्या पायऱ्यांचा घाट आहे. ऐन संगमांत पोहणें किंवा स्नान करणें मात्र बरेंच धोक्याचें आहे. बहुतेक यात्रिक मंदाकिनीच्या पाण्यांत स्नान करतात. कारण या दोन नद्यांत तीच तुलनेनें कमी जोराची आहे. दोन्ही नद्यांचें पाणी अतिशय थंड, बर्फासारखें असतें. कारण तें बर्फ वितळूनच झालेलें पाणी असतें.

संगमावरचें दृश्य रमणीय आहे. येथें निवांत स्नान करावें आणि गर्जत पुढें धांवणाऱ्या नद्यांच्या पाण्याकडे पहात रहावें. हिमालयाच्या जंगलांतून सोडलेले ओंडके ह्या ठिकाणीं विलक्षण गतीनें धांवतात आणि शर्यतीच्या घोड्यासारखे दिसतात. अलकनंदा व मंदाकिनी यांच्या पाण्याचे रंगहि अगदीं सूक्ष्मपणें पाहिल्यास किंचित् वेगळे वाटतात. मंदाकिनी अधिक शुभ्र, आणि अलकनंदा किंचित् अधिक हिरव्या झांकेची आहे. हे दोन रंग मिसळून एकरूप होतांनांचें

दृश्य तासन् तास पहात रहावेंसें वाटतें.

घाटाच्या वर रुद्रेश्वर महादेवाचें देवालय आहे. जवळ प्रशस्त मोकळी जागा, लहानशी बागहि आहे. या ठिकाणीं नारदानें रुद्रदर्शनासाठीं तपश्चर्या केल्याचा उल्लेख आहे. येथें एक संस्कृत पाठशाला आहे. त्या पाठशालेचे एक प्रवक्ते रुद्रेश्वर मंदिरांत बसले होते व यात्रिकांपैकीं कोणी शाळेस आर्थिक साहाय्य दिलें तर तें स्वीकारीत होते. आमच्या जथ्यापैकीं एका गृहस्थांनीं त्यांचें संस्कृताचें ज्ञान अजमाविण्यासाठीं संस्कृतांतून संभाषण करण्यास सुरुवात केली. तेव्हां त्यांनीं सुमधुर व स्वच्छ संस्कृतांतून उत्तम उत्तरें दिलीं.

रुद्रप्रयाग हें गांव समुद्रसपाटीपासून दोन हजार फुटांवर आहे. या गांवाहून पुढें हिमालयांत भारतीयांशिवाय इतरांना जाण्यास परवानगी नाहीं. Foreigners are not allowed beyond this limit असा येथें फलक आहे. १९६२ च्या चिनी युद्धानंतर ही दक्षता घेतली असावी. बाबा काळी कमळीवाले यांची धर्मशाळा येथें आहे. केदारनाथ आणि बद्रीनारायण या दोन पवित्र तीर्थस्थानांकडे याच गांवाहून रस्ते फुटतात. त्यामुळें हें एक महत्त्वाचें केंद्र आहे. त्यानंतर मोटारीनें जातांना वाटेंत 'अगस्तिमुनी' हें गांव लागलें. तेथें अगस्तिमुनीचें देवालय आहे. मोटार तासभर थांबणार होती. तोंपर्यंत हें देवालय पाहून आलों. त्यांत अगस्तींची पांच फूट उंचीची तांब्याची मूर्ति आहे. मूर्तीच्या हातांत चंद्र व सूर्य आहे. देवालय बरेंच जुनें असलें, तरी हिमालयाचे प्रवासी येथें सहसा मुक्काम करीत नसल्यानें समृद्ध वाटत नाहीं. त्या देवालयाजवळच शिवाचें व नृसिंहाचेंहि देवालय आहे. पण ज्यांच्यावरून या गांवास नांव पडलें आहे; त्या अगस्तिमुनींचा येथें अग्रमान आहे.

अगस्तिमुनी हे मित्रावरुणाचे पुत्र. त्यांच्या पत्नीचें नांव लोपामुद्रा असें होतें. एकदां कालकेय नांवाचा राक्षस देवांना संत्रस्त करूं लागला. देव त्याचा वध करण्यासाठीं आले, तेव्हा कालकेय राक्षस समुद्रांत जाऊन लपून बसला. त्याला मारणें अशा रीतीनें कठीण झालें, तेव्हां देवांनीं अगस्तिमुनींची प्रार्थना केली. अगस्तींचें तपोबल महान् होतें. त्यांनीं आचमनांत सबंध समुद्र पिऊन टाकला. तेव्हां कालकेय राक्षस उघडा पडला व देवांनीं त्याला ठार केलें पुढें आणखी एकदां देवांच्यावर संकट आलें. तेव्हांहि अगस्तिमुनी त्यांच्या

साहाय्यासाठीं आले. त्यावेळीं अगस्तिमुनी हिमालयाच्या याच भागांत तप करीत होते. दक्षिणेंत विंध्य पर्वताला आपण पृथ्वीवरील सर्वांत उंच पर्वत व्हावें अशी महत्त्वाकांक्षा वाटून त्यानें उंच होण्यास सुरुवात केली. विंध्य इतका उंच झाला कीं, उत्तरायणांतून दक्षिणायनांत येतांना सूर्यालासुद्धां त्याचा अडथळा येऊं लागला. ऋषि व ब्राह्मण यांचीं धर्मकृत्यें त्यामुळें बंद पडूं लागलीं. त्यांनीं देवांना आणि देवांनीं अगस्तिमुनींना सांकडें घातलें. अगस्तिमुनींनीं सर्वांना संकटमुक्त करण्याचें आश्वासन दिलें.

अगस्तिमुनी हे विंध्य पर्वताचे गुरु होते. त्यांनीं हिमालयांतून दक्षिणेकडे प्रवास करण्यास सुरुवात केली. आपले गुरु येत असतांना पाहून विंध्य पर्वतानें नम्रतेनें त्यांना नमस्कार घातला. तेव्हां अगस्तिमुनींनीं सांगितलें, ‘ मी दक्षिणेंतून परत येईपर्यंत असाच पडून रहा. ’ विंध्यानें ती आज्ञा मानली. पण अगस्तिमुनी दक्षिणेंतून परत आलेच नाहींत. ते पुढें रामेश्वरांतच राहिले. ते उत्तरेंतून दक्षिणेंत आल्यानें विंध्य पर्वत कायमचा लहान राहिला आणि सूर्य निर्विघ्नपणें दक्षिणायनांत जाऊं शकला. तसेंच देवादिकांच्या व ऋषि-ब्राह्मणांच्या धर्मकार्यांतील अडथळाहि दूर झाला. रामाच्या वनवासाच्या काळांत राम, सीता व लक्ष्मण यांनीं अगस्तिमुनींची भेट घेतल्याचा आणि त्यांनीं रामाला अमोघ बाण, अक्षय भाता, रत्नजडित धनुष्य इत्यादि वस्तु देऊन शुभाशीर्वाद दिल्याचा रामायणांत उल्लेख आहे.

अगस्तिमुनी हें गांव समुद्रसपाटीपासून तीन हजार फुटांवर आहे. हें गांव चांगलें प्रशस्त, सपाटीवरचें, शाळा, महाविद्यालय, दवाखाना, तार वगैरे सोयी असलेलें आहे व तात्पुरता असा विमानतळहि येथें आहे. पूर्वी तिबेटशीं व्यापार करणारे लोक अगस्तिमुनी येथें लोंकरीचे कपडे, शाली, कांबळी वगैरेंची विक्री करीत असत. अगस्तिमुनी व गुप्तकाशी यांच्या दरम्यान चंद्रापुरी हें गांव लागतें. अशा लहान लहान गांवांतून जात जात आम्हांला अखेर गुप्तकाशी हें गांव डोंगरावर पांढरट ठिपके असल्यासारखें दिसूं लागलें.

गुप्तकाशी हें गांव डोंगराच्या उतरणीवर पायऱ्यापायऱ्यांसारखें वसलें आहे. त्यामुळें तें आम्हांला लांबूनच दिसलें. गांवांतून पाण्याचे दोन पाट वहात आहेत. आम्ही गुप्तकाशीला पोहोंचलों, तेव्हां अकरा साडेअकरा वाजले असावेत. आम्हांला जेथें जेवणासाठी उतरावयाचें होतें, तें ठिकाण

खूपच उंचावर होतें. गुप्तकाशीच्या पायथ्याशीं भला मोठा मोटार तळ आहे. केदारच्या वाटेवरचा हा अखेरचा मोटारतळ. येथून पुढें चालत किंवा अन्य वहानानें जावें लागतें. आम्ही मोटारींतून उतरून धूळ झटकून किंचित् विश्रांति घेतली. सामान वर नेण्यासाठीं ओझेवाले आले होते आणि त्यांच्या गढवाली भाषेंतील अनोखी गडबड गोंधळ करीत होते. ऊन चांगलेंच तापत होतें. मोटारतळाची नेहमींची रुटखुटहि चालूच होती. आम्हांला वर जाऊन स्नान-भोजन करून ऊन खालीं आल्यावर त्याच दिवशीं पायीं प्रवासाला निघायचें होतें, म्हणून इकडे तिकडे गमवायला फारसा वेळ नव्हता. गुप्तकाशी गांव ज्या डोंगरावर वसलें आहे, तो डोंगर चांगलाच खडा आहे. त्यामुळें वर चढतांना बहुतेकांना धाप लागली आणि एकदोनदां वाटेंत टेकावें लागलें. दोनतीन वृद्धांना तर कंडींतूनच वर जावें लागलें. वर कुठल्यातरी धर्मशाळेंत आमची रहायची बरीशी व्यवस्था होती. उतरल्याबरोबर चहापाणी झालें आणि स्नानासाठीं कपडे घेऊन आम्ही जवळच्याच विश्वेश्वर मंदिराकडे निघालों.

समुद्रसपाटीपासून पांच हजार फूट उंचीचें गुप्तकाशी हें गांव विश्वेश्वराचें मंदिर व मनकर्णिका कुंड यामुळें प्रसिद्ध आहे. हें देवालय दगडी असून त्याची धाटणी त्या भागांतील बहुतेक सर्वच देवालयांसारखीच उत्तर भारतीय पद्धतीची आहे. मंदिरांत विश्वेश्वर नांवाचें शिवलिंग आहे. पिंडीजवळच गौरीची मूर्ति आहे. या देवालयाच्या आवारांत उत्तरेस अर्धनारीनटेश्वराचें देऊळ आहे. ही संगमरवरी मूर्ति नंदीवर आरूढ झालेली आहे. याशिवाय श्रीचंद्रशेखर मंदिरहि आहे. पण गुप्तकाशीचें एक महत्त्वाचें आकर्षण म्हणजे मनकर्णिका कुंड. याची लांबी व रुंदी प्रत्येकीं सुमारें सोळा फूट असून खोली साधारण सहा फूट आहे. कुंडाच्या कांठाला दोन सिंहमुखें आहेत. डावी-कडील मुखाचें नांव यमुना व उजवीकडील मुखाचें नांव भागीरथी असें आहे. येथें स्नान केल्यामुळें यमुना व गंगा या दोन्ही पवित्र नद्यांचें स्नान केल्याचें पुण्य मिळतें असें सांगतात. या मुखांतून पडणारें पाणी स्फटिकासारखें शुभ्र आणि थंडगार आहे. सतत पडणारें पाणी वाहून जाण्याची सोय असल्यानें फारसें पाणी सांचत नाहीं आणि मुलांना किंवा स्त्रियांनाहि स्नान करण्याची भीति वाटत नाहीं.

या गांवीं विश्वेश्वर शंकर गुप्तरूपानें रहातात म्हणून याला गुप्तकाशी हें नांव पडलें आहे. येथें ब्राह्मण पूजा सांगतो व त्याला 'गुप्तदान' द्यायचें असतें. हें गुप्तदान देण्याची पद्धत अशी, कीं सुक्या खोबऱ्याचा गोटा एका बाजूला कातरून आंत आपल्याला हवे तेवढे पैसे घालायचे व पुनः त्यावर खोबऱ्याचें झांकण घालून तो गोटा ब्राह्मणाला दान करायचा. आम्ही मनकर्णिका कुंडांत थंडगार पाण्यानें स्नान केलें. गुप्तदान केलें आणि देवदर्शन करून चरचरीत भुकेले होत्साते आमच्या धर्मशाळेंत आलों. या वेळेपर्यंत उन्हें चांगलीं कडाडलीं होतीं. त्यामुळें ओले टॉवेल डोकीवर टाकूनच आम्हांला परतावें लागलें. गुप्तकाशींत सूर्यसुद्धां गुप्तरूपानें तळपता, तर बरें झालें असतें असा विचार तेव्हां माझ्या मनांत आला.

गुप्तकाशी हें एका डोंगरावर आहे, तर त्याच्या समोरच्याच डोंगरावर उखीमठ आहे. याचें मूळ नांव उषा मठ होतें, त्याचा अपभ्रंश होऊन उखीमठ झालें. सध्यां जेथें उखीमठ आहे, तेथें प्राचीनकाळीं प्रल्हादपुत्र बाणासुर याची राजधानी होती. उषा ही बाणासुराची मुलगी. तिच्या स्वप्नांत एकदां एक अतिशय सुंदर तरुण आला व त्याच्या आठवणीनें ती झुरणीस लागली. त्या तरुणाचें वर्णन तिनें चित्रलेखा या मैत्रिणीजवळ केलें. मग त्या वर्णनास अनुरूप अशीं अनेक चित्रें चित्रलेखेनें काढलीं. त्यांत श्रीकृष्णाचा मुलगा अनिरुद्ध याचें चित्र पहातांच उषेनें 'हाच तो' म्हणून सांगितलें. चित्रलेखेनें योगसामर्थ्यानें उभयतांची भेट घडवली व त्यांचा गांधर्व विवाह केला. उषेचा पिता बाणासुर याच्या ध्यानीं ही घटना येतांच त्यानें अनिरुद्धाला नागांच्या पाशानें बांधून टाकलें. तेव्हां श्रीकृष्ण धांवून आले आणि त्यांनीं बाणासुराचा पराभव केला. मग बाणासुरानें वैदिक पद्धतीने जाहीरपणें उषा-अनिरुद्धांचा विवाह केला.

उखीमठ ही केदारनाथाची हिंवाळ्यांतील गादी आहे. अति बर्फवृष्टीमुळें केदारपुरी बंद होते, तेव्हां म्हणजे सुमारें कार्तिक शुद्ध प्रतिपदेपासून वैशाख शुद्ध तृतीयेपर्यंत, केदारनाथाच्या उत्सवमूर्तींची दैनंदिन पूजाअर्चा उखीमठ येथें होते. उखीमठास केदारनाथाचें दुमजली, लांकडी नक्षीकाम केलेलें सुंदर मंदिर आहे. मंदिरांत ओंकारेश्वर महादेवाची पितळी पंचमुखी मूर्ति पिंडीवर असून तीमागें मांधाता राजाची दगडी मूर्ति आहे. केदारनाथाच्या उत्सवमूर्तींचें शिर

सोन्याचें आहे. देवळाला विस्तीर्ण पटांगण असून त्यांत राउळांचा म्हणजे पुजाऱ्यांचा प्रशस्त वाडा आहे. उषा व अनिरुद्ध यांचा येथें विवाह झाला. त्यांच्याहि मूर्ति एका मंदिरांत आहेत. बाबा काळी कमळीवाले यांची प्रशस्त अशी धर्मशाळाहि उखीमठास आहे.

गुप्तकाशीपासून पुढें चालतच जायचें होतें. पहिला मुक्काम चार मैलांवर ब्युंगचट्टी येथें पडायचा होता. पण चालत जाण्याची पूर्वतयारी बरीच करायची होती. पायीं मार्गावर जाण्याचे तीन प्रकार. पायीं चालत जाणें, घोड्यावरून जाणें किंवा दंडी अगर कंडी यांसारख्या माणसांनीं वहावयाच्या पालखींत बसून जाणें. अगदीं वृद्ध, आजारी किंवा अशक्त लोक दंडी–कंडी करतात. कंडी म्हणजे एक उभट टोपली असते. तींत यात्रेकरू बसतो. मग एक हमाल हें मानवी ओझें उचलून पाठीवर घेतो. त्याची दोरी त्यानें कपाळावर बांधलेली असते. दंडीपेक्षां हें वाहन थोडें स्वस्त असतें, पण त्यांत बसणारा माणूस बराच अवघडतो. कारण कंडींत हलायला जागा नसते. दंडी हें पालखीसारखें वाहन चार किंवा सहा माणसें उचलून घेतात. या दोन्हींपेक्षां घोडा बरा असतो. त्याच्यावर अवघडत नाहीं. पण संवय नसल्यानें अंग दुखतें. गुप्तकाशी ते केदार आणि परत गुप्तकाशी या सुमारें ६२ मैलांच्या प्रवासाला दंडीला २५० रु., कंडीला १५० रु. आणि घोड्याला सुमारें १०० रु. पडतात. आम्ही मात्र ठरवलें कीं आपल्याला झेपेल तेवढें चालत जायचें नि पुढें घोडा करायचा.

सोमवार ता. ८ मे रोजीं दुपारीं तीनला आम्ही सर्व यात्रेकरू उठलों. चहा वगैरे होऊन, सामानाची बांधाबांध करायला पाऊण तास तरी लागलाच. उन्ह असलें, तरी आतांपासूनच थंडी पडायलाहि सुरुवात झाली होती. आम्हीं चालण्याचे कपडे चढवले. अंगांत स्वेटर, डोकीवर गरम कानटोपी, पायांत बूट आणि हातांत काठी अशा जाम्यानिम्यानिशीं आम्ही तयार झालों. दुपारीं पावणेचार वाजतां ‘ जय केदार नाथ ’ ‘ जय बद्रीविशाल ’ च्या घोषांत आम्ही गुप्तकाशीहून पैदल रस्त्यानें चालण्यास सुरुवात केली. आमच्या बरोबरचें सामान खेचरांवरून आधींच पुढें गेलें होतें. त्यामुळें आमच्याकडे कुठें थर्मास, पाण्याची बाटली किंवा लहानशी पिशवी आणि काठी, छत्री यांशिवाय इतर कांहीं जड सामान नव्हतें. रात्रीं फारशी झोप लागली नव्हती, तरी पहांटेच्या

थंड वाऱ्यानें अंगांत नवा जोम आणि उत्साह आणला होता. रस्ता बराच अरुंद होता. फार तर तीन साडेतीन फूट रुंद. सुरुवातीला रस्ता फारसा चढाचा नव्हता. त्यामुळें चालायला मौज वाटली. पण पहिलीच चढण लागली, तेव्हां मात्र पूर्वी वाटलें तेवढें हें सोपें काम नाहीं अशी खात्री झाली.

पायीं प्रवासासंबंधींची माझी पूर्वीची कल्पना होती कीं वाटेंत गप्पा मारीत जातांना आपण सहज अंतर काटूं. पण प्रत्यक्षांत मात्र हा अंदाज चुकीचा ठरला होता. कारण चालणें म्हणजे आपण शहरांत डांबरी रस्त्यावरून चालतों तसेंच हिमालयाच्या वाटेवरचें चालणें असें गृहीत धरतों. शहरांतले रस्ते सपाट असतात; त्यांत चढउतार नसतो. आपण शहरांत सर्वसामान्यपणें एका वेळीं थोडेंच अंतर चालतों. पण केदारच्या वाटेवर मात्र वेगळी परिस्थिति असते. बरीच चढण किंवा एकदम उतार यांना तोंड देतांना आपल्याला दम लागतो. त्यामुळें गप्पा मारीत चालण्याची कल्पना सोडून द्यावी लागते. म्हणजे या रस्त्यावर अगदींच बोलतां येत नाहीं असें नव्हे. पण प्रदीर्घ चर्चा किंवा फार वेळ बोलणें सुलभ नसतें. मैल दोन मैल चालून दमल्यावर एखाद्या चट्टीवर विश्रांति घेतांना किंवा जेथें चट्टीसुद्धां नाहीं अशा वाटेवरच्या एखाद्याच चहाच्या दुकानाच्या बांकावर बसल्यावर थोड्या गप्पा होऊं शकतात, पण फार नाहीं. पुढें चालण्याचें दडपण सारखें मनावर असतें.

हरिद्वारला घेतलेल्या काठ्या मात्र या पायीं प्रवासांत चांगल्या कामास आल्या. या काठ्यांना खालच्या बाजूला लोखंडी फाळासारखें टोंक असतें. चढणीला हें टोंक जमिनींत खुपसून जोर देऊन चढतां येतें आणि उतरणीला हेंच टोंक जमिनींत रोवून स्वतःची गति रोखून आधार घेतां येतो. पहिले दोन अडीच मैल आम्ही मजेनें चाललों. पण पुढें जवळ जवळ सारीच चढण होती. मी आणि सौ. दमलों तर थोडी विश्रांति घेऊन चालत होतों. पण आम्हां यात्रेकरूंत कांहीं जणांचें असें मत होतें कीं एकदां चालायचा सुरवात केली, कीं थेट मुक्कामाला पोहोंचल्यावरच थांबायचें. मध्यें थांबल्यावर शरीर आळसावतें असें त्यांना वाटत होतें. मी मात्र त्यांच्याशीं सहमत नव्हतों. चालण्यांत आनंद वाटेल तोंपर्यंत चालायचें, दमलों तर बसायचें, तजेला वाटल्यावर पुनः उठायचें, वाटेंत चहा मिळाला तर घ्यायचा, निर्झर दिसला तर पाणी प्यायचें आणि प्रवास हा कर्तव्यबुद्धीनें न करतां

रमत गमत ख्यालीखुशालीनें करायचा, अशी माझी कल्पना होती. पण या कल्पनेला पाठिंबा देणारे फारसे प्रवासी आढळले नाहींत. चाळीस-पन्नास यात्रेकरूंत चालतांना साहजिकच चार-सहा जणांचे असे गट पडतात. ताज्या दमाचे कांहीं लोक पुढें जातात, मध्यम दमाचे मध्यें राहतात आणि वयस्क लोक धीमे धीमे मागून येतात. चालणारे लोक निघाल्यानंतर तासाभरानें घोडे, दंडी-कंडीवाले निघतात. कारण त्यांची गति अधिक असते. त्यामुळें मुक्कामाला सर्वजण जवळजवळ एकाच वेळीं पोंचतात.

ज्या रस्त्यावरून आम्ही चालत होतों, त्या रस्त्याच्या डाव्या हातास पहाड होता आणि उजव्या हातास खोल दरी होती. या दरींतून नदी वाहत होती. दाट झाडीमुळें ही नदी कधींकधीं दिसतहि नसे. पण सर्व दरी हिरवी गार होती. चीड झाडांचीं उंचच उंच टोकें सर्वत्र दिसत. एखाद्या सरळ स्वभावाच्या सत्प्रवृत्त माणसाप्रमाणें चीड हें झाड सरळ वाढतें. त्यांत वाकडेपणा दिसत नाहीं. सुरूच्या झाडासारखेंच हें दिसतें. अशा सरळ वृक्षाला ' चीड ' हें चिडचिडें नांव कां पडावें हें कळत नाहीं. आंबा, देवदार, भूर्ज हे वृक्षहि क्वचित् दिसतात. पण प्राधान्य आहे, तें चीड वृक्षांना. त्यांच्या सरळपणामुळें उंच पर्वतावर हीं झाडें नियोजनपूर्वक कोणीं लावलीं आहेत कीं काय असें वाटतें. या पैदल मार्गावर फुलें मात्र मोठ्या प्रमाणावर दिसलीं नाहींत. म्हैसूर, बंगलोर या भागांच्या मानानें हिमालयाच्या परिसरांत फुलें कमीच. फुलें नाहींत असें नाहीं, पण त्यांची समृद्धि जाणवत नाहीं. जीं आहेत त्यांत गुलाबी टपोरा गुलाब, पांढरा एक-पदरी गुलाब आणि कमळें हीं प्रमुख. नीलकमल हा केदारच्या आसमंतांतील विशेष सौंदर्याचा फुलाचा प्रकार. त्याखेरीज चारसहा प्रकारचीं फुलें आढळतात. स्वामी अखंडानंदांनीं ' हिमालयाच्या कुशींत ' या ग्रंथांत एका रानफुलाचें वर्णन केलें आहे. जंगलांत जेव्हां खायला कांहीं मिळत नाहीं, तेव्हां या भागांतील लोक या रानफुलांची चटणी करून खातात असें त्यांनीं म्हटलें आहे. हिमालयांतील गुलाब मात्र अगदीं संस्मरणीय असतो. त्याचा गोंडस गुलाबी रंग आणि अनेक पदरांच्या मंद सुगंधी पाकळ्या यांनीं तो अगदीं डवरलेला बहरलेला असतो. तो कुठेंहि पाहिला, तरी मन अगदीं प्रसन्न होतें. त्याच्या उलट एकपदरी पांढरा गुलाब. त्याचा आकार लहान म्हणजे प्राजक्ताच्या फुलापेक्षां थोडा मोठा किंवा सदाफुलीएवढा असतो म्हणाना. पण या फुलालाहि

चांगला गंध असतो. गुलाबी गुलाबापेक्षां तो नाजूक असतो. पण आठदहा पांढऱ्या गुलाबांचा गुच्छ मनाला आल्हाद देतो.

रस्त्यानें चालत निघालें, कीं अनेक प्रकारच्या आरोळ्या कानीं पडतात. सुरुवातीला अपरिचितपणामुळें त्यांचें नवल वाटतें. पण पुढें त्या अंगवळणीं पडतात. केदारहून आलेले यात्रिक समोरून येतात व तिकडे जाणाऱ्या यात्रिकांच्या जवळून जातात, तेव्हां 'जय केदार' असा हमखास घोष करतात. आपणहि त्याच घोषानें त्यांना साद द्यायची असते. तिकडून आलेल्या यात्रिकाच्या चेहऱ्यावर कृतकृत्यतेचें तेज आणि किंचित् अहंकार दिसतो. तर केदारकडे जाणारा यात्रेकरू त्याच्याकडे पाहतांना अधिकच आदरानें आणि थोड्याशा हेव्यानें पहातो. 'यानें दर्शन साधलें. आपणहि असेंच साधूं' अशी एक उत्साह-प्रेरक भावनाहि केदारकडे जाणाऱ्या यात्रिकाच्या मनांत आल्यावांचून रहात नाहीं. या वाटेवर वारंवार ऐकूं येणारी दुसरी आरोळी म्हणजे 'पहाड के तरफ' ही मागून येणाऱ्या खेचरवाल्यांनीं किंवा घोडे, कंडी, दंडीवाल्यांनीं दिलेली आरोळी. एखादें वाहन किंवा जनावर मागून येतें, तेव्हां पायीं चालणाऱ्यांनीं पहाडाला चिकटून उभें रहायचें असतें. दरीच्या बाजूला पादचारी उभा राहिला, तर घोड्याखेचराचा धक्का लागून तो खालीं पडण्याची भीति असल्यानें 'पहाड के तरफ' अशी ललकारी दिली जाते. कांहीं दंडी-कंडीवाले 'समाल के चलो' अशीहि वर्दी जवळून जातां-येतांना देतात. एखादा पांथस्थ चुकून दरींत घसरला तर काय होतें, याची मीं एका घोडेवाल्याकडे चौकशी केली. त्यानें सांगितलें, "अशा प्रवाश्याची आशाच सोडून दिली पाहिजे. कारण दरी इतकी खोल असते कीं खालीं पडलेल्या प्रवाश्याचा शोध करण्यासाठीं दरींत उतरणारीं माणसें मिळणें कठीण. माणसें मिळालीं, तरीहि उपयोग नसतो. खालीं पडलेला माणूस गडगडत नदींत पडतो आणि प्रवाहाच्या वेगानें तो किंवा त्याचें शव दूर नेलें जातें. मग त्याचा शोध करणार कसा ? नदीच्या वेगानें धांवत जाऊन त्याला शोधणें अशक्यच असतें. म्हणून असा यात्रेकरू गंगार्पण झाला असें मानून त्याची आशा सोडली पाहिजे." आम्ही या अवघड प्रवासांतून आल्यानंतर आठ-दहा दिवसांनीं नागपूरचे एक यात्रेकरू याच मार्गावर दरींत पडले आणि त्यांचे अवशेषहि हातीं लागले नाहींत असें पुढें वर्तमानपत्रांत वाचलें.

गुप्तकाशीहून व्युंगचट्टीपर्यंत दोन तीन चट्ट्या लागल्या. त्यांतल्या त्यांत नालाचट्टी मोठी आहे. तेथून केदार, बदरी आणि गुप्तकाशी इकडे तीन मार्ग जातात. नालाचट्टीला ललितादेवीचें देवालय आहे. नलराजानें येथें ललितादेवीची उपासना केली म्हणून या गांवाला नालाचट्टी नांव पडलें अशी आख्यायिका आहे. नालाचट्टीजवळच नलदमयंती मंदिरहि आहे. नलदमयंती हें भारतीय संस्कृतींतील एक अतिशय सुंदर काव्य आहे.

संस्कृत कविमंडळांतील मुकुटमणि म्हणजे कालिदास. केदारच्या पायवाटेवर जेथें नालाचट्टी आहे, तेथून एका मैलावर नारायण कोटी या ठिकाणीं कालिदासानें ललितादेवीची आराधना केली होती. हिमालयाच्या आसमंताशीं कालिदासाचा किती निकटचा परिचय होता, हें 'मेघदूत' व इतर काव्यांवरून दिसतें. इसवी सनाच्या सहाव्या शतकांत कालिदास होऊन गेला असावा. पण त्याच्या कालाबाबत एकमत नाहीं. कुमारसंभव, रघुवंश, शाकुंतल, विक्रमोर्वशीय, मालविकाग्निमित्र, मेघदूत, ऋतुसंहार अशा संस्कृत भाषेंतीलच नव्हे तर जगाच्या सर्वश्रेष्ठ साहित्यकृतींत समाविष्ट होणाऱ्या अलौकिक साहित्याचा निर्माता कालिदास या भागांत एके काळीं संचार करीत होता, या जाणिवेनें कोणाहि साहित्यप्रेमी रसिकाला आनंद झाल्यावांचून रहाणार नाहीं. कालिदास हा जातीचा ब्राह्मण होता, पण लहानपणींच त्याचे आईबाप निधन पावले. एका गवळ्यानें त्याचें संगोपन केलें. पुढें कालिदासाचा विवाह एका राजकन्येशीं झाला. पण "तुझा नवरा गवळी आहे, ब्राह्मण नाहीं" असें तिला मैत्रिणींनीं हिणवल्यानें तिला आपल्या पतीची लाज वाटूं लागली. म्हणून कालिदासानें देवीची आराधना केली. देवी प्रसन्न होऊन तिनें कालिदासाला वर दिला. त्यामुळें तो महापंडित व महाकवि झाला अशी आख्यायिका आहे.

हिमालयाच्या या पायी मार्गानें निघालें, कीं वाटेंत ठिकठिकाणीं गढवाली मुलें येतात आणि पै-पैसा किंवा 'सुईदोरा' मागतात. दीडदोन वर्षांपासून आठदहा वर्षांपर्यंतचीं हीं मुलें आणि मुली अतिशय गोजिरवाणीं असतात. रंग गोरा, गुलाबी, आणि थंडीनें नाकगाल अधिकच लाल झालेले, अंगावर गरम कपडे गुंडाळलेले, डोकीवर माकडटोपी अशा अवतारांत हीं मुलें घोळक्यानें येतात. त्यांच्या अंगावरचे कपडे बहुधा मैल किंवा घट्ट असतात. कारण चार–

पांच मुलें असलेल्या घरांत या मुलाचे जुने कपडे त्या मुलाला घालण्याची प्रथा सगळीकडेच असते. क्वचित् कोणी यात्रिकानें दिलेले कपडेहि हीं मुलें घालतात. मुलींच्या नाकांत पितळेचे किंवा तांब्याचे अलंकार असतात. हातांतहि कथिल, तांबें, पितळ अशा धातूंचीं काकणें असतात. कपडे वारंवार फाटल्यामुळें शिवावे लागतात म्हणून इकडे 'सुईदोरा' मागण्याची पद्धत पडली असावी. ही पद्धत ज्यांना माहीत आहे, असे यात्रेकरू आपल्या गांवाहून निघतांनाच किंवा हरिद्वारसारख्या मोठ्या शहरीं सुईदोऱ्याचीं पांच पंचवीस पाकिटें खरेदी करून वाटेंत मुलांना देतात. पण ही पद्धत ज्यांना पूर्वी माहीत नसते, असे आमच्यासारखे नवे यात्रेकरू मुलांना पांचदहा पैसे देऊन त्यांचा निरोप घेतात. या गोजिरवाण्या मुलांच्या मऊ मऊ गालाला हात लावण्याचा मोह मात्र आवरणें कठीण.

या रस्त्यावरून आम्ही मैल दीडमैल चाललों, तों आमचे कपडे चमकूं लागल्यासारखे दिसले. कांहींतरी पडलें असेल म्हणून कपडे झटकून साफ केले. पण पुनः अर्ध्या तासांत चमक दिसूं लागली. हें काय आहे म्हणून एका चट्टीवर विचारलें, तेव्हां कळलें कीं, या रस्त्यावर अभ्रकाचे दगड आहेत. त्यांचे बारीक कण हवेंत उडतात आणि ते कपड्यांना चिकटतात. मग पुढें लक्ष देऊन पाहिलें तों अभ्रकाचे कित्येक दगड आढळले. त्यांतले कांहीं चमकणारे दगड कौतुक म्हणून आम्ही मुलांना खेळण्यासाठीं घरीं आणले. हिमालयाच्या वाटेवर चालूं लागल्याबरोबर थोड्याच अवधींत आमचें व्यक्तिमत्त्व असें 'चमकदार' झाल्याचें पाहून चमत्कार व आनंद वाटला.

व्युंगचट्टीला आम्ही पोचलों, तेव्हां संध्याकाळ झाली होती. संधिप्रकाश कसाबसा जीव धरून होता, पण तोहि लुप्त होत होता. गांव लहानसेंच होतें. गांवांत बराच चढउतार होता. रस्ते दगडी होते. लहानशा घरांतून दिवे लागत होते. पुढें गेलेलीं आमच्या पथकांतलीं माणसें आमच्या स्वागतासाठीं एका घराजवळ उभीं होतीं. सर्वांना एकाच ठिकाणीं उतरण्याची सोय नसल्यानें तीन घरें घेतलीं होतीं. एका घराच्या लांबच लांब पडवींत पंचवीस माणसें रहायचीं होतीं. दुसऱ्या घरांत दहाबारा आणि उरलेलीं तिसऱ्या घरांत. चालून दमलेले कांहीं प्रवासी अंथरुणें पसरून पडले होते. आम्हीहि पुरे श्रांत झालों होतों. आमचें घर मिळाल्याबरोबर आम्ही हात–पाय तोंड धुऊन आडवे

झालों. थोडया वेळानें चहा आला आणि आम्हांला थोडें उत्साही वाटूं लागलें. सगळेच लोक दमले असल्यानें गप्पागोष्टींतहि कोणी रमले नव्हते. जेवण तयार होईपर्यंत विश्रांति घेतली; तेवढ्यांत 'घोडेवाले' येऊन 'कोणाला घोडा हवा का?' असें विचारूं लागले. एकाच दिवसाच्या चालण्यावरून मीं निष्कर्ष काढला होता, कीं केदारपर्यंत चालत जाणें मला अशक्य नव्हतें, पण दगदगीचें निश्चितच होतें. म्हणून मीं विचार केला, कीं उद्यां पहांटेपासून एक घोडा सांगावा. थोडा वेळ सौ. बसेल आणि थोडा वेळ मी बसेन. म्हणून मैलाला दीड रुपयाप्रमाणें घोडा ठरवला.

दुसऱ्या दिवशीं पहांटे चारला सर्वांना उठविण्यांत आलें. पांच वाजतां पुढें चालत जायचें होतें. आदल्या दिवशींच्या चालण्याचे श्रम लक्षांत घेऊन दुसऱ्या दिवशीं मीं घोडा सांगितला होता. पण आम्ही ठरवलेला घोडा आलाच नाहीं. बाकी सारी चालणारी मंडळी तयार झाली. तेव्हां मीहि घोडयाची आशा सोडून सर्वांबरोबर चालूं लागलों. हवा सुंदर होती. थंड वारा होता. सकाळची वेळ असल्यानें अंगांत चांगला उत्साह होता. पहिला मैलभर चालायला खूपच गंमत वाटली. पण मग चढ लागला. तो फार कठीण नव्हता. पण असेच आणखी चार सहा मैल चढ–उतार असले, तर आम्हां दोघांनाहि थकून गेल्यासारखें होणार होतें. इतक्यांत आमच्यापैकीं एकजण घोडयावरून आले आणि त्यांनीं सांगितलें कीं आम्ही ठरवलेला घोडा मागून येत आहे. म्हणून ब्युंगचट्टीपासून दोन मैलांवर एका गांवी रस्त्यावरच्याच एका चहाच्या दुकानांत मी थांबलों. चहाची शेगडी चांगली तावून पेटली होती. आणि त्या थंडींत चहाचे घुटके घेतांना फार प्रसन्न वाटत होतें.

इतक्यांत त्याच गांवचा एक वृद्ध गढवाली इसम शेकायला म्हणून चहाच्या शेगडीजवळ आला. आमचा घोडा येईपर्यंत मलाहि कुणीतरी गप्पा मारायला हवेंच होतें. मी त्या वृद्धाला एक चहाचा पेला दिला. बोलतां बोलतां तो म्हणाला, "माझी उमर आतां सत्तरीला आली आहे. पण पूर्वीचा काळ आतां राहिला नाहीं. पूर्वीं आमच्याकडे चोऱ्यामाऱ्या अजिबात होत नसत. पण आतां लोकांना खायला मिळायची मारामार. कधीं कधीं रामबाण नांवाचे जंगली लोक येतात. राखणदारावर बाण मारून शेतांतलं पीक कापून नेतात. डोंगरांत कुठला आला आहे कायदा नि कुठला आला आहे पोलीस!

" सावकार पंधरा टक्के वीस टक्के व्याज घेतो. त्याचीं मुलं गुलमर्गाला नाहींतर श्रीनगरला शिकायला जातात. गरिबाचीं मुलं रोज चारसहा मैल चालत जवळच्या शाळेंत जातात. मग या पायपिटीला कंटाळून शाळा सोडून देतात. शिक्षण नाहीं, मग घोडेवाला होणं, नाहीं तर मोलमजुरी करणं, एवढंच त्यांच्या नशिबांत उरतं. सावकारांचीं मुलं कंत्राटदार होतात. पैसा जमवतात आणि निवडणुकींत निवडून येतात. त्यांच्या ओळखीगाळखी होतात. मोठ्या गांवाला बशिले असतात. गोरगरिबांना निवडणुकींत कोण विचारतो ? "

निवडणुकीसंबंधीचे त्या वृद्ध गढवाली माणसाचे विचार भारतांतील इतर भागांतील लोकांच्या अनुभवापेक्षां फारसे वेगळे नव्हते. स्वतंत्र देशांत कोणीहि सामान्य माणूस राष्ट्राध्यक्ष किंवा पंतप्रधान होऊं शकतो असें कागदोपत्री लिहिलेलें असतें एवढेंच. प्रत्यक्षांत तसें घडलेलें दिसत नाहीं. तेथें दोनदा चहा घेऊन मीं विश्रांति घेतली आणि भरपूर गप्पा मारल्या. इतक्यांत मागून घोडेवाला आला. तेव्हां घोड्यावर स्वार होऊन मी तेथून पुढें जाऊं लागलों.

हे घोडे तसे फार सुरक्षित असतात. ते फार उंच नसल्यानें सपाट जमिनीवर भीति वाटत नाहीं. शिवाय बरोबर घोडेवालाहि असतोच. पण अरुंद वाटेनें जेव्हां घोडा पहाडांतील बिकट चढण चढूं लागतो किंवा दुर्गम उतरण उतरूं लागतो, तेव्हां मात्र बसणाऱ्याला सुरुवातीला खूपच भीति वाटते. कारण बाजूला खोल दरी असते आणि तिची खोली इतकी असते कीं तिकडे पाहिल्याबरोबर नजर फिरून जाते. पण हे घोडे इतके तरबेज असतात कीं अगदीं चिंचोळ्या रस्त्यानेंहि ते अगदीं अचूक जातात. विशेषतः बर्फ, पाऊस किंवा डोंगरांतून येणारे झरे यांमुळे रस्त्यांत चिखल झालेला असला किंवा ते निसरडे झालेले असले, तर वर बसणारा अतिशय चिंतेनें घोड्याच्या प्रत्येक पावलाकडे पहात रहातो. अशा वेळीं घोड्यावर बसण्यापेक्षां चालत गेलेलें बरें असें वाटतें. पण घोडेवाला धीर देत असतो आणि घोडेस्वार हातांत लगाम आणि मुठींत जीव धरून धीमे-धीमे जात असतो.

तेथून दीड एक मैल गेल्यावर चालत जाणाऱ्यांचा जथा लागला. तेव्हां मी घोड्यावरून उतरलों आणि सौ. ला घोड्यावर बसायला सांगितलें मी पूर्वी दोन-तीनदां कुठें कुठें घोड्यावर बसलों होतों. माथेरानला, कोल्हापूरला घोड्यावरून थोडी रपेट केली होती. दहा वर्षांपूर्वी इजिप्तमध्यें पिरॅमिडस

पहायला जातांना मी थोडा वेळ उंटावरहि बसलों होतों. पण उंटावर बसण्या-पेक्षां घोड्यावर बसणें शतपटीनें चांगलें. उंटावर बसणाऱ्याचें शरीर इतक्या जोरानें मागें-पुढें फेंकलें जातें कीं कंबरेचे मणके थोड्याच वेळांत ढिले होतात. उंट हा जमिनीपासून बराच उंच असल्यानें त्याच्यावर नव्यानें बसणाऱ्याला भीतीहि वाटते. तो ‘ उंच ’ असतो म्हणूनच त्याला ‘ उंट ’ हें नांव पडलें असावें.

घोड्यावरून जाण्यास सौ. रजनीहि थोडी नाखूषच होती. कारण पूर्वी ती कधींच घोड्यावरून गेली नव्हती. पण तीन साडेतीन मैल चालण्याचा थकवा तिलाहि आला होता. म्हणून हा तरी प्रयोग करून पहावा या विचारानें ती घोडेस्वार झाली.

हिमालयांतील घोडेवाले हें एक स्वतंत्रच प्रकरण आहे. अशा तीन घोडे-वाल्यांशीं माझा विशेष परिचय झाला. घोड्यावरून जातांना त्यांच्याशीं बोलणें सोपें असतें. चालतांना जसें दमायला होतें, तितकें घोड्यावर बसून जातांना होत नाहीं. या घोडेवाल्यांचें वेगळेंच जग असतें. केदार ते गुप्तकाशी या भागांत सुमारें सहाशें घोडे आहेत. हे घोडे आकारानें फार मोठे नसतात. तट्टापेक्षां किंचित् मोठे असतात. एका घोड्यावर माणसांचें एक कुटुंब जगत असतें. घोड्याला दर मैलाला दीड रुपया भाडें असतें. यात्रेकरूंचा मोसम मे महिन्यापासून चारच महिने असल्यानें या घोड्यांना वर्षातून चार महिने काम असतें आणि आठ महिने ते रिकामेच असतात. या आठ महिन्यांत घोडेवाले शेतीचीं कामें करतात. पण हिमालयाच्या भागांत फारशी शेती नाहींच. हात दोन हात रुंद आणि दहावीस हात लांब अशा पायऱ्या पाय-ऱ्यांच्या आकाराची शेती डोंगरांच्या उतारावर कुठें कुठें पिकते, तेवढीच शेती. या शेतींतून थोडा गहूं, राळा किंवा भात पिकतें. त्यामुळें मोसमाच्या चार महिन्यांत घोडेवाले जें मिळवितील, त्यावरच मुख्यतः उरलेल्या आठ महिन्यांत त्यांना गुजराण करावी लागते. घोडेवाल्यांच्या एका कुटुंबात आई, वडील, बायको, एक दोन मुलें असतात. म्हणजे पांच ते सात माणसांचा निर्वाह या एका घोड्याच्या चार महिन्यांच्या कामावर करावा लागतो. एका घोड्याची किंमत आठशें ते हजार रुपये असते. हे पैसे मुख्यतः गांवच्या सावकाराकडून जबर व्याजानें घ्यायचे नि हप्त्यानें फे

ग्रंथालय, ठाणे.

जेव्हां मोसम नसतो, तेव्हां या घोड्यांच्या पोटापाण्याची काय व्यवस्था असते याची मला उत्सुकता होती. त्याबद्दल आमचा घोडेवाला म्हणाला, "पावसांत नि बर्फांत आम्हांलाच खायला मिळायची मारामार. मग घोड्याला आम्ही कुठून घालणार ? म्हणून मोसम संपल्याबरोबर आम्ही आमचे घोडे डोंगरावरच्या पठारावर मोकळे सोडून देतों. तिथें ते आठ महिने जंगलांतला झाडपाला खाऊन रहातात. पठार उंचावर आहे. म्हणून घोडे दुसरीकडे जायची भीति नसते. यात्रेकरूंचा मोसम सुरू होण्यापूर्वी चार पांच दिवस आम्ही सहा सातशें घोडेवाले वर जंगलांत जातों. आम्ही प्रत्येकानें आपल्या घोड्याचें नांव ठेवलें आहे. कोणी 'हीरो' कोणी 'प्रदीप' कोणी 'दोस्त' अशीं नांवें दिलीं आहेत. त्यांच्या नांवानें पुकारा करीत जंगलांत हिंडतों. आम्ही आमच्या मित्रांचे घोडेहि ओळखतों. त्यांच्यापैकीं कोणाचा घोडा आढळला तर त्याला झाडाला बांधून आम्ही त्या घोडेवाल्याला 'तुझा घोडा अमुक ठिकाणीं आहे' अशी वर्दी देतों. असे हळूहळू सर्वांचे घोडे सांपडतात. दोन-तीन वर्षांतून एखादाच घोडा थंडीनें गारठून किंवा पठारावरून घसरून खालीं दरींत पडून मरून जातो. अशा दुर्दैवी घोडेवाल्याचें नुकसान भरून येणें कठिणच असतें."

गुप्तकाशींत घोड्याचे एजंट किंवा अडते असतात. ते शिकले सवरलेले असतात आणि यात्रा कंपन्यांशीं त्यांच्या ओळखीपाळखी असतात. त्यामुळें या कंपन्यांचीं पथकें येण्यापूर्वीच हे अडते गुप्तकाशींत त्यांच्यासाठीं घोडीं राखून ठेवतात. यात्रा कंपन्या जो मेहनताना देतात, त्यापैकीं आपला भाग कापून घेऊन हे अडते उरलेला मोबदला घोडेवाल्यांना देतात. आमच्या घोडेवाल्यानें सांगितलें कीं, घोडेवाले निरक्षर असतात म्हणून त्यांचें हें असें नुकसान होतें. त्यापेक्षां यात्रेकरूंशीं थेट सौदा केला, तर त्यांना थोडा अधिक पैसा मिळतो. जेव्हां घोड्याला 'स्वारी' मिळत नाहीं, तेव्हां स्वारीच्या शोधांत घोडेवाले हिंडतात, पण स्वतः ते घोड्यावर बसलेले कधीं मला दिसले नाहींत. ते घोड्यावर कां बसत नाहींत असें मीं विचारलें, तेव्हां घोडेवाला म्हणाला, "आम्हांला घोड्यावर बसणें परवडत नाहीं. घोडा हेंच आमचें पोटाचें साधन. त्यावर जास्त भार घालायचा म्हणजे त्याला लवकर निकामी करायचें. स्वारी मिळते तेव्हां आम्हांला ती घ्यावीच लागते. पण स्वारी

नसतांना जर आम्ही घोड्यावर बसलों, तर त्यांना विश्रांति केव्हां मिळणार ? म्हणून आम्ही आमच्या जनावरावर बसत नाहीं. ”

हे घोडेवाले अतिशय गरीब आहेत. ते अत्यंत प्रामाणिक व विश्वासू आहेत. त्यांच्याकडे कोणतीहि वस्तू दिली, तरी ती हरवायची किंवा चोरीला जायची नाहीं. हिमालयांतील हमाल दंडी-कंडीवालेहि असेच प्रामाणिक असतात. या भागांत चोऱ्यामाऱ्या जवळजवळ नाहींतच. निदान स्थानिक लोक तरी कधीं या वाटेला जात नाहींत. बाहेरून आलेला एखादा अगदीं क्वचित् कुठें हातचलाखी करीत असेल तरच. एरव्हीं हा सर्व प्रदेश एकट्या दुकट्यानेंहि निर्धास्तपणें प्रवास करायला योग्य असाच आहे. या गरीब घोडेवाल्यांना एखादें जेवण आणि घोड्याला गूळ किंवा चणे स्वारीनें दिवसांतून द्यायचे असा नियम नसला तरी बराच शिरस्ता आहे. घोडेवाले सांगतात कीं एक वेळ स्वतःला न खाल्लें तरी घोडेवाला आपल्या जनावरांची आबाळ करीत नाहीं. कारण घोड्याच्या ताकदीवर घरांतील सगळ्याच माणसांचें अन्न अवलंबून असतें.

मोसमाच्या चार महिन्यांत घोडेवाल्यांचें घरगुती जीवन अव्यवस्थितच असतें. कारण गुप्तकाशी ते केदार आणि केदार ते गुप्तकाशी अशा फेऱ्या त्याला निर्वाहासाठीं माराव्या लागतात. त्यामुळें या चार महिन्यांत तो बहुधा बाहेर गांवींच असतो. घोड्यांचा मुक्काम मात्र केदारनाथावर पडत नाहीं. कारण तेथें कडाक्याची थंडी असते, बर्फ पडत असतें आणि त्या थंडींत घोडा मरून जाण्याची शक्यता असते. म्हणून उतारूला केदारनाथावर पोहोंचवल्यावर हे लोक घोड्याला घेऊन खालीं देवदेखणी किंवा गौरीकुंडापर्यंत येतात आणि रात्रीं तेथें मुक्काम करून पुनः सकाळीं केदारावर जातात. असें त्यांचें जीवन अतिशय कष्टाचें असतें. दररोज स्वारी मिळतेच असें नाहीं. दारिद्य, थंडी, डोंगरांतले चढउतार यांच्याशीं त्याला अखेरपर्यंत झगडावें लागतें. या भागांत मुलींची संख्या कमी असल्यानें लग्न करायचें तर मुलीच्या बापाला पैसे द्यावे लागतात. त्याला आपल्याकडे ‘ द्याज ’ म्हणतात. मोसमाच्या चार महिन्यांत काम करून हे पैसे जमविणें कठिण झाल्यानें कित्येक घोडेवाल्यांचें लग्नाचें वय होऊन बरींच वर्षें झालीं तरीं ते अविवाहित राहिलेले आढळतात.

घोडेवाल्याशीं गप्पा मारीत मारीत आम्हीं दहा वाजेपर्यंत रामपूरला

पोचलों. वाटेंत मैखंडा, फाटाचट्टी लागतात. मैखंडा येथें महिषासुरमर्दिनीचें देवालय आहे. या ठिकाणीं महिषासुराचा वध भगवतीदेवीनें केला व ती महिषासुरमर्दिनी झाली अशी आख्यायिका आहे. देवीनें महिषासुराचे अनंत तुकडे करून येथील पर्वतावर टाकले म्हणून त्याला मैखंडा नांव पडलें. येथून फाटाचट्टी दोन मैल दूर आहे. ब्युंगचट्टी ते रामपूर हें अंतर आठ मैल आहे. घोड्यावरून जाणाऱ्यांना हें अंतर जास्त नाहीं. पण पायीं चालणाऱ्यांची संख्या मोठी आहे व त्यांना विश्रांतीची आवश्यकता असते. म्हणून रामपूर येथें मुक्काम ठेवण्यांत आला होता.

रामपूर हें खूपच मोठें गांव आहे. पाण्याची मुबलकता आहे. धर्मशाळाहि प्रशस्त आहेत. पण येथें व या भागांत माशांचा उपद्रव बराच होतो. रामपूर हें समुद्रसपाटीपासून ६,४०० फूट उंचीवर आहे. रामपूरला व या भागांतील खानावळींत रहाण्याचा वेगळा आकार पडत नाहीं. तेथें जेवण घेतलें, तर त्या भोजनाच्या आकारांतच राहाण्याचा हक्कहि प्राप्त होतो. मात्र कांहीं अंथरूण पांघरूण हवें, तर चार आठ आणे दिवसाला द्यावे लागतात. रामपूरपासून थंडी वाढण्यास सुरुवात होते. केदारनाथहून येणारे आणि वर जाणारे असे अनेक प्रवासी येथें वस्तीसाठीं राहतात आणि एकमेकांना कुशल विचारून डोंगरमाथ्यावरील बर्फाची माहिती घेतात. केदारावर जर अति बर्फ पडत असेल तर एक दोन दिवस थांबण्याची हीच सोयीची जागा आहे. याच्यापुढें गौरीकुंड हें मुक्कामाचें ठिकाण असलें, तरी रामपूरपेक्षां तें गांव लहान आहे. तेथें माल कमी मिळतो, महागाई अधिक आहे आणि थंडीहि अधिक असते.

मात्र रामपूरमध्यें तसें पहाण्यासारखें कांहीं नाहीं. गांवाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत दगडी रस्ता आहे. तेवढा एकदोनदां पालथा घातला, कीं गांव एकसुरी वाटूं लागतें. हिमालयाच्या वाटेवरच्या प्रायः सर्वच गांवांची ही स्थिति आहे. यात्रेच्या मोसमांत गांवाच्या दोन्ही टोकांना तात्पुरतीं 'पेशाब घरें' उभारलेलीं असतात. तेव्हां या 'पेशाब घरा' पासून त्या पेशाबघरापर्यंत चक्कर टाकणें हाच गांव पहाण्याचा अर्थ होतो. तरीपण सुदैवानें बहुतेक यात्रिक प्रवासानें दमलेले असल्यानें त्यांना गांव पहाण्याची वेगळी शक्ति उरलेली नसते. रामपूरमध्यें आम्हांला बरेच मराठी भाषिक लोक भेटले. कोणी

परभणीकडचे होते, तर कोणी अक्कलकोटकडील होते. ते दहा बारा जणांचा खाजगी गट करून केदारनाथला चालले होते.

रामपूरहून आम्ही अगदीं पहांटेच निघालों. तेथून पांच मैलांवर असलेल्या त्रिजुगी नारायण या देवस्थानाकडे आम्हांला जायचें होतें. ही वाट बरीच कठीण होती. कारण त्यांत तीन मैलांचा चढ होता. चालत जाणाऱ्यांना बराच त्रास झाला. घोड्यावरून जाणाऱ्यांना त्यांच्या तुलनेनें कमी झाला, पण नाहीं असें नाहीं. त्रिजुगी नारायण हें केदारच्या सरळ वाटेवर नाहीं. त्रिजुगीस जायचें, तर थोडें बाजूला जावें लागतें. त्यामुळें केदारच्या एकंदर वाटेचें अंतर वाढतें. तरी एक महत्त्वाचें देवस्थान पहायला मिळतें म्हणून यात्रेकरू तें चुकवीत नाहींत. आम्ही तेथें बाबा काळी कमळीवाले यांच्या प्रशस्त धर्मशाळेंत उतरलों. गेल्यावर चहा झाला आणि समोरच असलेल्या कुंडावर स्नानासाठीं आम्ही गेलों.

त्रिजुगी नारायण हें समुद्रसपाटीपासून ७५४० फूट उंचावर असल्यानें थंडी चांगलीच जाणवत होती. तो सर्व भाग पक्क्या दगडी कामाचा आहे. मुख्य देवालयाच्या बाहेर अन्नपूर्णा, गणपति व शिवलिंग या मूर्ति आहेत. समोर चार कुंडें आहेत. त्यांचीं नांवें ब्रह्मा, विष्णु, महेश व सरस्वती यांच्या-वरून ब्रह्मकुंड, विष्णुकुंड, रुद्रकुंड व सरस्वतीकुंड अशीं दिलीं आहेत. यांपैकीं पहिल्या दोन कुंडांत स्नान करायचें, सरस्वती कुंडावर देव, ऋषि, पितर यांना तर्पण करावयाचें आणि रुद्रकुंड किंवा महेशकुंडावर तीर्थप्राशन करायचें असा येथला धार्मिक विधि आहे. येथें बाबा काळी कमळीवाले यांच्या मठातर्फे वस्त्रदान, तर्पण, गोदान असे विविध धार्मिक विधि करण्याची सोय आहे.

त्रिजुगी नारायणाचें मुख्य माहात्म्य म्हणजे या ठिकाणीं शंकर-पार्वती विवाह झाला. दक्ष प्रजापतीच्या यज्ञांत त्याची कन्या सती हिनें उडी टाकून आहुति दिली. तिनेंच पुढें हिमालयाच्या पोटीं जन्म घेतला. तिचें नांव पार्वती. ती लहान असतांनाच नारद एकदां हिमालयाकडे गेले आणि त्यांनीं सांगितलें कीं, " पार्वतीचें भवितव्य उज्ज्वल आहे. प्रत्यक्ष शंकर तिच्याशीं विवाह करतील. तिच्या पोटीं कार्तिक स्वामी येतील. तो देवांचा सेनापति होईल आणि तारकासुराला मारून देवांना भयमुक्त करील. "

राजकन्या पार्वतीनें उपवर झाल्यावर आपली प्रतिज्ञा बोलून दाखविली, कीं

शंकर हे भणंग भिकारी असोत किंवा गिरिकंदरांत रहाणारे जोगी असोत, मी त्यांच्याशींच विवाह करणार. '' आपल्या प्रतिज्ञापूर्तीसाठीं तिनें राजाचा प्रासाद व त्यांतील सर्व वैभव सोडलें. तापसी वृत्तीनें राहून शंकराची आराधना करण्याचें व्रत तिनें घेतलें. हेंच हरितालिका व्रत असून सर्व हिंदू स्त्रिया करतात. विशेषत: इच्छित वर मिळावा म्हणून कुमारिका प्राधान्येंकरून हें व्रत करतात. पार्वतीनें हें व्रत त्रिजुगीपासून जवळच असलेल्या मैखंडा पर्वतावर आचरिलें होतें.

पार्वतीने इतकें कडक व्रत आचरिलें, तरी शंकर तिचा स्वीकार करतील कीं नाहीं, याची शंकाच होती. कारण शंकरांनीं रागानें प्रत्यक्ष मदनाचेंहि दहन केलें होतें. पण त्यांच्या रागिट स्वभावासहि पार्वतीनें आपल्या तेजानें व निष्ठेनें नम्र केलें. स्वतः शंकरांनीं तिला मागणी घातली. इंद्रादि देवादिकांना अत्यंत आनंद झाला. हा शंकर-पार्वती विवाह मग त्रिजुगी नारायण येथें अत्यंत वैभवानें झाला.

त्रिजुगी नारायणाच्या देवालयांतील गाभाऱ्यांत तीन मूर्ती आहेत. मधली मूर्ति महाविष्णूची आहे. एकीकडे सरस्वतीची व दुसरीकडे लक्ष्मीची मूर्ति आहे. देवळाच्या सभामंडपात चार फूट लांब रुंद असलेलें पेटतें कुंड आहे. शंकर पार्वती विवाह झाला, त्यावेळचें हें कुंड असून तें तीन युगें पेटतें आहे, असें तेथील पंडे सांगतात. शंकर-पार्वतीच्या विवाहाच्या गार्हपत्याग्नीच्या या कुंडाचा पवित्र अंगारा सर्व यात्रिक भक्तिभावनेनें लावतात. लाजा होम वगैरे विधि याच अग्नीवर झाले आणि दिव्य वधूवरांनीं याच कुंडाभोंवतीं प्रदक्षिणा घातल्या. हा अग्नि तीन युगें पेटत आहे, म्हणून या गांवाला त्रिजुगी नारायण हें नांव पडलें आहे. ' कुमारसंभव ' मध्यें शंकर-पार्वती विवाहाशीं निगडित अशा औषधीप्रस्थ आणि हिमवत्पुर यांचीं जीं वर्णनें आलीं आहेत, तीं त्रिजुगी नारायणाच्या निसर्गाशीं बरींच मिळतींजुळतीं आहेत.

त्रिजुगी नारायणाच्या मंदिरासमोरील कुंडांत आम्हीं स्नान केलें. पार्वतीच्या स्मरणार्थ वस्त्रदान करून आम्हीं उभयतांनीं यथाविधि पूजा केली आणि देवदर्शन वगैरे आटोपून पुनः धर्मशाळेंत आलों. तेथें वरच्या मजल्यावर आमचा मुक्काम होता. तळमजल्यावर कांहीं बंगाली लोक रहात होते. तीन चार पुरुष व तीन चार स्त्रिया होत्या. ही मंडळी आम्हांला पुढें केदार–बद्री-

नारायणाच्या वाटेंत अनेकदां भेटली. स्नान करून आल्यावर आम्हीं जेवण केलें. विश्रांति घेतली आणि दुपारीं चारच्या सुमारास पुढील प्रवासास निघालों. पुढचा मुक्काम गौरीकुंड येथें होता. येथून पुढें एकसारखा चढ लागणार होता. म्हणून माझ्यासाठीं एक व सौ. साठीं एक असे दोन घोडे आम्हीं ठरवले.

त्रिजुगीपासून तीन मैलांवर सोनप्रयाग असून तेथें सोनगंगा आणि मंदाकिनी यांचा संगम आहे. सोनगंगा नदीस वासुकी असेंहि म्हणतात. सोनप्रयागपासून एक मैलावर मुंडकटा गणेश आहे. या स्थळाची कथा प्रसिद्धच आहे. ती अशी, कीं एकदां पार्वती स्नानाला बसली असतां तिनें गणपतीला राखणदार म्हणून बाहेर ठेवलें व 'कोणासहि आंत येऊं देऊं नको' म्हणून सांगितलें. थोड्या वेळानें प्रत्यक्ष शंकरच तेथें आले. पण त्यांनाहि आंत जाण्यास गणपतीनें मनाई केली. तेव्हां शंकरांनीं संतप्त होऊन गणपतीचें मुंडकें उडविलें मग शंकरांनीं एका हत्तीचें शिर गणपतीला लावलें. शिरच्छेद केलेल्या स्थितींतील गणपतीचें लहानसें देऊळ येथें आहे; तोच मुंडकटा गणेश. अशा अवस्थेंतील गणेशाचें भारतांतील हें एकमेव देवालय.

त्रिजुगीपासून गौरीकुंडापर्यंतचा रस्ता बराच चढाचा आहे. त्यामुळें चालत येणाऱ्यांची गति जरा मंदावलीच. गौरीकुंड ते केदार हा रस्ता तर अतिशय चढाचा आणि अवघड असल्याचें घोडेवाल्यांनीं सांगितलें. पण आम्ही घोडेस्वार मात्र चालण्याचे कष्ट न घेतां निसर्गाचें सौंदर्यग्रहण करूं शकत होतों. एका बाजूला खोलवर खळाळणारी मंदाकिनी नदी आणि दुसऱ्या बाजूला दुर्गम पहाड यांतील चार हात रस्त्यावरून जातांना एकीकडे धोक्याच्या जाणिवेनें रोमांचकारक वाटत होतें, तर दुसरीकडे प्रतिक्षणीं धोका टळल्याची विजयी भावना आनंद देत होती. चीड वृक्षांचीं टोकें समोरच्या दरींत हिरवी किमया दाखवीत होतीं आणि अधूनमधून दर्शन देऊन लुप्त होणारीं हिमशिखरें लपंडाव खेळत होतीं. सूर्य अजून आकाशांत खेळत होता. वाढत्या थंडींत त्याचीं किरणें ऊबदार आणि सुखद वाटत होतीं. डोंगर-कपारीवरून कोसळणारे प्रपात कधीं दुरून मोत्यांच्या जाळ्यासारखे दिसत तर कधीं रस्त्याच्या अगदीं कडेलाच उडी घेणारे हे प्रपात अंगावर थंड तुषार उधळीत. पाठीवर टोपली बांधलेली आणि जंगलांत पानें गोळा करणारी एखादी लालबुंद गढवाल स्त्री थबकून यात्रेकरूंच्याकडे पहात राही. आणि या सर्वांवरून दृष्टि जरा वर

केली तर उंच उंच पर्वतशिखरांच्या मागें स्वच्छ, निळें, अनंत आकाश दिसे.

अशी मनमोकळी शोभा चवीनें पहात मी छोट्या घोड्यावरून हळूहळू चाललों होतों. हिमालयाच्या या प्रवासांतला एक मोठा फायदा असा, कीं स्वतःसाठीं भरपूर एकांत मिळतो. शहराच्या गजबजाटापासून, घाईगर्दीपासून, दबावापासून, घोषणांपासून अगदीं दूर शांत आणि निवांत अशा या निसर्गरम्य प्रदेशांत आपण स्वतःलाच शोधीत असतों, शहरी धावपळींत स्वतःचा शोध घेण्याची आपल्याला कधीं सवडच मिळत नाहीं. दैनंदिन व्यवहाराची धडपड आपण कां करीत असतों आणि तिचें फलित काय, याचा विचार करायलाहि आपल्या एरव्हीच्या धांवपळीच्या जीवनांत फुरसत नसते. मात्र हिमालयाच्या या प्रवासांत फुरसतच फुरसत असते. ९–१३ ची गाडी चुकेल म्हणून धांवाधांव करावी लागत नाहीं. हळूहळू चालायचें, दमलों तर थांबायचें नि रात्र होण्यापूर्वी आटोपशीर अंतर गांठायचें एवढाच ठोकळ कार्यक्रम असतो. आणि या कार्यक्रमांत स्वतःविषयीं विचार करायला भरपूर अवधि असतो. त्यामुळें मन कसें शांत आणि प्रसन्न रहातें.

संध्याकाळ झाली, तेव्हां आम्ही गौरीकुंडाला पोहोंचलों. गांव लहानच, बऱ्याच चढउताराचें आणि हिमालयाच्या भागांतील इतर गांवांसारखेंच होतें. आमची उतरण्याची जेथें व्यवस्था केली होती, ती धर्मशाळा प्रशस्त होती, आणि तिच्या समोरचें दृश्य अत्यंत विलोभनीय होतें. कारण धर्मशाळेच्या पायथ्याशींच मंदाकिनी नदी प्रमाथी लाटा उसळवीत वहात होती. नदींत मधून मोठमोठे खडक होते आणि त्यांवर फुटून या लाटांचा पांढरा शुभ्र फेंस उंच उडत होता. दिवाळींत शोभेच्या दारूचीं झाडें लावावींत तसे हे फेंसाचे तुषार उंच उडतांना दिसत होते. पलीकडच्या कांठावर हिरवीगार झाडी आणि तितक्याच वरपर्यंत हिरवा असलेला डोंगर. वरून खळाळत येणारें पाणी आणि प्रवाहांत होणाऱ्या त्याच्या अनंत आकृति यांच्याकडे पहात कितीहि वेळ बसलें तरी ताजेंतवानेंच वाटतें. गौरीकुंड हें समुद्रसपाटीपासून साडेसात हजार फूट उंचीवर असल्यानें येथें थंडी चांगलीच कडक होती. अंगांत दोन गरम स्वेटर आणि डोकीला गरम कानटोपी घातल्यावांचून बाहेर पडणें सुखद नव्हतें.

गौरीकुंड येथें गौरीचें देवालय, गौरीकुंड व अमृतकुंड अशीं मुख्य पवित्र स्थानें आहेत. गौरीकुंड म्हणजे निसर्गाचा चमत्कारच आहे. कारण

बाहेर कडाक्याची थंडी असतांनाही या कुंडांतील पाणी इतकें कढत असतें कीं स्नान करतांना अंगाला चटके बसतील कीं काय अशी भीति वाटते. हिमालयांतून येणारी उष्णोदकाची एक धार या कुंडांत सोडण्यांत आली आहे. एकाच वेळीं चाळीस पन्नास लोक स्नान करूं शकतील, असें हें पक्क्या दगडी बांधणीचें मोठें कुंड आहे. गोमुखांतून त्यांत पाणी पडतें, तें जवळजवळ उकळतें पाणी असतें. नंतर थोडें निवतें म्हणून, स्नान करणें शक्य होतें. पार्वतीनें या कुंडांत स्नान केलें होतें म्हणून या कुंडाला व गांवाला गौरीकुंड असें नांव पडलें आहे. या कुंडाजवळच अमृतकुंड आहे. हीं कुंडें जवळ जवळ असूनहि एका कुंडांतील पाणी अति शीतल आहे आणि दुसऱ्यांतील पाणी अति उष्ण आहे हा हिमालयाच्या परिसरांतील अविस्मरणीय चमत्कार आहे. असें सांगतात, कीं गौरीकुंडांतील उष्ण पाण्याची धार जेथून येते, तेथें गंधकाच्या पेटत्या खाणी आहेत. त्यांच्या जवळून वहाणारें हें पाणी पेटत्या गंधकामुळें उकळतें आणि जोरानें बाहेर पडतें. कडाक्याच्या थंडीत आयतें तापलेलें हें पाणी म्हणजे यात्रिकांना हें वरदानच आहे. विशेषतः सुवासिनी या गौरीकुंडांतील स्नान परमपवित्र मानतात. कारण त्यामुळें पार्वतीच्या भाग्याचा अंश आपल्याहि वांट्याला येतो, असें त्या मानतात.

रात्रीं गौरीकुंडाला मुक्काम केला. दुसऱ्या दिवशीं आम्ही सर्वजण अगदीं पहांटे उठलों. कुंडावर स्नान केलें. धार्मिक विधि केले आणि सात साडे-सातच्या सुमारास पुढील प्रवासाला निघालों. गौरीकुंड ते केदार हा सात मैलांचा टप्पा हा या यात्रेंतील सर्वांत अवघड मार्ग. हा सर्वच्या सर्व रस्ता खडा चढ आहे. तो दुर्गम मार्ग जाण्यासाठीं चालणाऱ्यांनीं कंबरा कसल्या. त्यांतच हवा जरा पावसाळी पडली होती. कोणत्या क्षणीं पाऊस येईल आणि रस्ता बुळबुळीत होईल याचा नेम नव्हता. शेवटचा मैल दोन मैल तर बर्फ पडण्याची शक्यता होती. आधींच वाढती थंडी आणि त्यांत चढाई, सोसाट्याचे वारे, पाऊस आणि बर्फ यांची भीति, यामुळें गौरीकुंडावरून निघतांना आम्हांला रणांगणावर निघालेल्या योद्धयासारखें वाटत होतें. या अडचणींनींच आमच्यांत नवा उत्साह आणला होता आणि त्यांच्याशीं मुकाबला करण्यासाठीं आम्ही सिद्ध झालों होतों. शेवटीं सर्वांची तयारी झाल्यावर 'जय केदारनाथ'च्या गर्जना झाल्या आणि दुर्गम पहाड फोडून

जाणाऱ्या निरुंद, खडकाळ वाटेवरून जाऊं लागलों.

गौरीकुंड ते केदार हा रस्ता खरोखरच महाकठीण आहे. अनेकदां तर आपण पर्वतावर नसून एखादी भिंतच चढून जातों असें वाटतें. उतार जवळ-जवळ नाहींच. रस्ता जास्तींत जास्त अरुंद आणि पर्वत तर एकसारखा उंचच उंच होत गेलेला. शेवटीं शेवटीं दर मैलास एक हजार फूट आपण उंच जातों. उजवीकडची दरी अधिकाधिक खोल होत जाते आणि हवा विरळ होत गेल्यानें श्वासोच्छ्वास करण्यास अडचण भासूं लागते. नेहमींची संवय असलेले घोडे. पण त्यांनासुद्धां या रस्त्यावर थांबत थांबत जावें लागतें. मग पायीं जाणारे दर तासा अर्ध्या तासाला दमून बसले तर त्यांत कांहींच नवल नाहीं. गौरीकुंडापासून दोन मैलांवर आम्ही प्रथम थांबलों. या गांवाचें नांव जंगलचट्टी. ही खरीच जंगलांत आहे. रस्त्याच्या कडेला चहाचीं कांहीं दुकानें आहेत, तेवढेंच गांव. येथून पुढें जाण्याची शक्ति घोड्यांना मिळावी म्हणून जंगलचट्टीला घोड्यांना चणे आणि गूळ चारतात. तेथून पुढें पांच मैलांचा अत्यंत कठिण चढ आहे. आम्हांला या चढाची थोडी भीति वाटत होती, पण अड-चणींतून यशस्वीपणें पार पडण्याची मानवाची उपजत आकांक्षा आम्हांला उत्साह देत होती. जंगलचट्टीला थोडी विश्रांति घेऊन आम्ही आगेकूच केलें.

गौरीकुंडपासून केदारनाथचा रस्ता मनस्वी सुंदर आहे. सबंध भारतांत इतका निसर्गसुंदर रस्ता असेल असें वाटत नाहीं. हिरव्या रंगाचें वैभव काय आहे, हें खरें या रस्त्यावर दिसतें. क्षितिजापर्यंत पसरलेलीं झाडें अनंत प्रकारच्या हिरव्या छटा दाखवीत होतीं. किर्र झाडीचा काळसरपणाकडे झुकणारा गडद हिरवा, झुबक्याझुबक्याच्या चीडवृक्षांचा सरळ थेट गडद हिरवा, कोवळ्या वेलींचा रक्तमिश्रित नवा हिरवा, किंचित् पक्व पानांचा पिवळसर हिरवा, वेलींच्या देठांचा पारवा, देवदार वृक्षांचा गंभीर–मख्ख हिरवा, जंगली लांकडांच्या झाडांचा पांढरट हिरवा, जंगलांतील इतर वृक्षांतून उंच डोकीं काढणाऱ्या झाडांचा चरचरीत हिरवा, शालीनतेनें नमलेल्या लहान वृक्षांचा मंगल हिरवा, वठत चाललेल्या झाडांच्या पानांचा फिकट हिरवा, एकाच वेलीवर तळापासून गडद होऊन वरपर्यंत मंदमंद होत जाणारा काश्मीरी हिरवा. एकाच झाडावर असंख्य पोपट बसले आहेत असा भास निर्माण करणारा पोपटी हिरवा, रंगमंचापुढचा नवा मखमली पडदा असतो, तसा गर्द अहंकारी हिरवा, अजंठ्याच्या लेण्यांतील

चित्रांतून उडून जात असल्यासारखा दिसणारा धुवट हिरवा,–असे किती हिरवे रंग सांगावे ? शब्द संपतील, पण त्या अजोड रस्त्यावर दिसणाऱ्या हिरव्या रंगाचे नमुने संपणार नाहींत. एखादी हव्यासी सुंदरी प्रियकराला भेटण्यासाठीं म्हणून हिरव्या वस्त्राची निवड करायला गेली असावी, आणि कुबेराने आपल्या भांडारांतून हिरव्या रंगांच्या अनंत छटांचीं वस्त्रें तिच्यापुढें टाकलीं असावींत असें या जीवनदायी हिरव्या रंगाच्या मार्गावरून जातांना वाटतें. हिरव्या रंगाच्या या अपूर्व पखरणींतून कधीं कधीं निळ्या नदीच्या पाण्याचें दर्शन होतें आणि त्या पाण्याच्या शुभ्र फेसांमुळें हिरव्या शालूच्या या निळ्या काठांना निसर्गाने केलेल्या जरतारी नक्षीनें मन प्रसन्न होतें.

जंगलचट्टी सोडल्यावर मधून मधून साधू संन्यासी रस्त्याच्या कडेला दगडांच्या ओबडधोबड गुहेंत रहात असलेले दिसले. मात्र कोणीहि यात्रेकरूकडे कांहीं मागतांना दिसला नाहीं. दोन साधू निश्चल उभे राहिले होते. यात्रेकरूंपैकीं कोणी आपण होऊन पैसा टाकीत होते. एका गुहेंतील दोन साधू धुनी पेटवून बसले होते. आमचे घोडेवाले सांगत होते, कीं यांपैकीं बहुतेक साधू बारमहा येथेंच रहातात. वर्षाचे मे महिन्यापासूनचे चार पांच महिने सोडले, तर या भागांत अतिशय बर्फ पडतें. त्या कडाक्याच्या थंडींत हे साधू कसे रहात असतील आणि काय खात असतील हें आम्हांला गूढच होतें. आम्ही त्यावेळीं अंगावर चार चार वस्त्रें चढविलीं होतीं तरी थंडीनें कुडकुडत होतों. पण साधूंच्या अंगावर कमरेला गुंडाळलेल्या तोटक्या भगव्या धोतराशिवाय कांहीं नव्हतें, तरी ते चांगले काटक आणि समाधानी दिसत होते.

केदारहून खालीं येणाऱ्या यात्रेकरूंना ‘ जय केदार ’ करीत, सभोंवतींची निसर्गशोभा पहात, घोड्यावरची मांड कष्टानें सांभाळीत आणि ज्याच्यासाठीं एवढा अट्टाहास केला, तें केदारमंदिर थोड्या वेळानें दिसणार या उत्साही कल्पनेनें मन भरून आलेल्या अवस्थेंत असतांनाच ‘ रामवाडा ’ हें गांव आलें. या गांवानजीक येत असतांनाच आम्हांला बर्फाचे प्रचंड ढीग दिसूं लागले. लहान लहान ओहळ पर्वतावरून येतां येतांच त्यांचें बर्फ झालें होतें. त्यामुळें मद्रासी ब्राह्मणानें कपाळावर गंधाचे नाम ओढावेत, तसे ते काळ्या डोंगरावरचे पांढरेशुभ्र पट्टे दिसत होते. आमच्या अगदीं वाटेवरूनच असा बर्फाचा एक प्रचंड ओहळ चालला होता. त्याला तुडवीत आम्ही पुढें गेलों.

अजून आमच्या अंगावर बर्फ पडलें नव्हतें. पण रामवाड्यांतील घरांवर, झाडांवर; रस्त्यावर अजून बर्फ होतें, त्याअर्थीं रात्रींच तेथें बर्फवृष्टि झाली असावी हें उघड होतें. त्या कडाडणाऱ्या थंडीवर लहानसा उपाय म्हणून आम्ही रामवाड्यांत पहिल्याप्रथमच लागलेल्या चहाच्या दुकानांत कडकडीत चहा घेतला. इतर वेळीं तांब्याच्या उभट पेल्यांतून येणाऱ्या चहानें हात भाजले असते. पण त्या थंडींत चहाचा पेला हातांत धरणेंसुद्धां सुखद वाटलें. शिवाय, आम्ही हातांत लोंकरीचे हातमोजे घातले होते, ते वेगळेच. या गांवीं आमचा चहापानासाठीं मुक्काम होता. तास दीड तास येथें रहायचें होतें म्हणून चहा घ्याल्यावर आम्ही पुन्हा अलीकडे येऊन बर्फाच्या प्रवाहावर काठ्या घेऊन इकडे तिकडे लहान मुलांसारखे हिंडूं-बागडूं लागलों. कित्येकांनीं या बर्फावर फोटोहि घेतले. मी व सौ. अशीच बर्फावर उभीं असतांना एक बंगाली जोडपें फोटोसाठीं तेथें आलें तेव्हां त्यांच्या फोटोच्या आड येऊं नये म्हणून जरा दूर जाऊं लागलों. पण फोटो काढणाऱ्या बंगाली माणसानें सांगितलें कीं ' आपणहि फोटोंत या ' म्हणून आम्ही उभे राहिलों. त्यानें आमचा पत्ता घेतला आणि सुमारें महिन्यानंतर आठवणीनें आमच्या फोटोची एक प्रत माझ्या घरच्या पत्त्यावर पाठविली. त्यासोबतच्या पत्रावरून कळलें कीं, हा बंगाली यात्रेकरू हावडा स्टेशनच्या तिसऱ्या वर्गाच्या उपाहारगृहांत काम करीत असतो. त्यानें कौतुकानें आणि निरपेक्षबुद्धीनें फोटो पाठविला त्याचा आम्हांला फार आनंद झाला.

रामवाडा हें लहानसें गांव समुद्रसपाटीपासून ९,२८० फूट उंच आहे. केदारपर्यंत एवढें मोठें गांव नाहीं. वर्षांतून यात्रेच्या मोसमांतच येथें वस्ती असते. एरव्हीं हे सबंध गांव बर्फाखालीं असतें. ज्या यात्रेकरूंना रात्रीच्या वेळीं केदारची कडक थंडी आणि विरळ हवा सोसत नसेल, ते रामवाडा येथें रात्रीं मुक्काम करतात आणि सकाळीं केदारचें दर्शन घेऊन पुनः रात्रीच्या मुक्कामाला रामवाड्याला परत येतात.

या गांवीं अम्ही तास दीडतास थांबलों. अल्पोपाहार केला. चालत जाणाऱ्यांसाठीं अशा विश्रांतीची बरीच आवश्यकता होती. घोड्यांनाहि विश्रांति हवी होती. आतां अखेरचे तीन मैल चढून जायचें होतें. खाऊन पिऊन ताजेतवाने झाल्यावर प्रथम चालणारी मंडळी निघाली. त्यानंतर थोड्या वेळानें आम्ही

घोडेस्वार निघालों. रामवाडा ते केदार हा रस्ता पूर्वीच्या रस्त्यांहून अधिक व चढाचा आहे. कधीं कधीं घोड्यावरून उतरून थोडें चालावें लागतें. तशांतच पावसाची बुरबुर सुरू झाली आणि लगाम व छत्री सावरीत घोड्यावरून जाण्याची कसरत आम्हांला करावी लागली. चालणाऱ्यांची परिस्थिति अधिकच कठीण होती. कारण त्यांना एका हातांत छत्री व दुसऱ्या हातांत काठी घेऊन खडा चढ चढावें लागत होतें. वाऱ्यामुळें छत्री उडून जाण्याची शक्यता होती आणि ती उडून न गेली, तरी वाऱ्यानें कपडे भिजत होते. आधींच थंडीचा कडाका आणि त्यांत गार वारे आणि पाऊस यांनीं चालविलेली झोडपणी यांमुळें चालणारे बऱ्याच अंशीं आणि घोडेस्वार कांहीं अंशीं अगदीं जेरीला आले.

थोड्याच वेळांत आम्ही समुद्रसपाटीपासून दहा हजार फूट उंचीवर आलों. हा अगदीं देखणा भाग आहे. थंड वाऱ्यानें डुलणाऱ्या झाडांची समृद्धि आणि उत्साहप्रेरक हवा, नुकताच पाऊस पडून गेल्यामुळें सारा प्रदेश घासून पुसून स्वच्छ केलेला आणि निळ्या आकाशाच्या पटलावर रेंगाळणाऱ्या शुभ्रकृष्ण मेघांची कलाकुसर यांनीं मन अत्यंत आल्हादित होत होतें. आतां पाऊस संपला होता आणि वाराहि खूप कमी झाला होता. निदान, त्याचा उपद्रव संपला होता. वाटेवर दिसणाऱ्या साधूंना नमस्कार करीत आणि वरून डोलीं-तून, घोड्यावरून किंवा पायीं येणाऱ्या यात्रिकांना ' जय केदार ' करीत आम्ही धीमे धीमे वर चाललों. साडेदहा हजार फूट उंचीवर आलों, तेव्हां हवेंत थोडा बदल झाल्याचा भास झाला. श्वासोच्छ्वास करण्यांत थोडी अडचण भासूं लागली. पण मला वाटलें कीं एकदम बराच चढ चढून आल्यानें दमून म्हणून असें झालें असावें. पण घोडा जसजसा अधिक वर चढूं लागला, आणि ' ११,००० ' फूट ही पाटी पाहिली, तेव्हां लक्षांत आलें कीं इतक्या उंचीवर हवा विरळ होत असल्यानें श्वसनक्रियेवर हा दाब पडत आहे.

या वेळीं बर्फानें सर्वांग भरलेले पर्वत अगदीं जवळ दिसूं लागले. या पर्वताहून जे पाण्याचे धबधबे किंवा ओहळ खालीं येत, त्यांचेंहि गोठून बर्फ झालेलें दिसत होतें. डोंगराच्या ज्या भागावर सतत बर्फ पडत होतें, तेथें झाडें किंवा वनस्पति यांचा मागमूसहि नव्हता. हिमपर्वताच्या शिखरावर कधीं-कधीं पांढरा धूर निघत असल्यासारखें दिसलें, ती बर्फातून येणारी वाफ असावी. केदार जवळ येऊं लागलें. तसा अधिकाधिक प्रदेश पांढरा शुभ्र होत

आलेला दिसला अजून आमच्या अंगावर बर्फ पडलेलें नव्हतें. पण त्यासाठीं आम्हांला फार वेळ वाट पहावी लागली नाहीं. आम्हीं साडेअकरा हजार फुटांची उंची गांठली असेल नसेल, तोंच प्रथम पावसाचे टपोरे थेंब पडूं लागले आणि त्याच्या पाठोपाठ लगेच बर्फ पडूं लागलें. संक्रांतीच्या हलव्यासारखे बर्फाचे गोल गोल दाणे टपटप टपटप पडूं लागले आणि आमच्या आतांपर्यंतच्या सर्व श्रमांचें सार्थक झालें. आम्ही छत्र्या मिटल्या आणि वरून होणारा बर्फाचा अभिषेक झेलीत आम्ही मोठ्या आनंदानें वाटचाल करूं लागलों. तें दृश्य अत्यंत रोमहर्षक होतें. आकाशांत पांढऱ्या शुभ्र जाईजुईच्या अनंत फुलांची वृष्टि व्हावी, तसे ते बर्फाचे लहान लहान वाटाण्याएवढे गोळे अलगद अंगावर पडत. कधीं ते हातावर झेलीत तर कधीं तोंड उघडून लहान मुलासारखे तोंडांत झेलीत आम्ही चाललों होतों. इंग्रजींत एक चांगली म्हण आहे. तिची मला तेव्हां आठवण झाली. ती अशी, कीं 'गॉड, मि व्ह मी धिस् डे' म्हणजे 'परमेश्वरा! असा दिवस माझ्या आयुष्यांत बारंवार येवो!'

ती हवा, तें बर्फ, तो पांढरा शुभ्र आसमंत इतका सुंदर होता कीं, आम्ही घोड्यावरून उतरलों आणि चालूं लागलों. आतां रस्ता अधिकाधिक पांढरा होऊं लागला. मोत्यांच्या राशी वरून पडाव्यात आणि पायांशीं त्यांचा खच व्हावा तसे बर्फाचे बारीक गोळे सांचूं लागले. आतां लांबून केदारनाथाच्या मंदिराच्या शिखरावरचा ध्वज दिसला आणि इतकी अवघड यात्रा केल्याचें सार्थक झालें म्हणून 'जय केदारनाथ' असे सहजस्फूर्त उद्‌गार आमच्या तोंडून बाहेर पडले. जयपुरी पद्धतीच्या शिखराचें टोक, त्यावर फडफडणारें निशाण आणि त्यामागें हिमाच्छादित पर्वतशिखरें हें दृश्य अगदीं अविस्मरणीय होतें. देवालयाच्या अलीकडे बरीच लांब वाट दगडी फरशीची आहे. तीवरून बर्फांतून चालतांना घोडा घसरेल अशी आपल्याला भीति वाटली, तरी हीं जनावरें अतिशय तयार असतात व धीमेपणानें पण नीट चालतात. मात्र शेवटचा हा थोडासा प्रवास घोड्यावरून करण्यापेक्षां चालत करण्यांतच मौज आहे. या अखेरच्या वाटेवर बरेंच खालीं उतरावें लागतें व मग पुनः उंच चढावें लागतें. आम्ही त्या चढावापर्यंत पोहोंचलों, तोंपर्यंत बर्फानें आसपास एकहि बिनपांढरा ठिबका ठेवला नव्हता. हा उतार म्हणजे पांढऱ्या शुभ्र थंडगार पाण्याच्या मंदाकिनी नदीचा उतार आहे. तीवर पूल बांधला आहे.

तिच्या कांठावरचें बर्फ हळूहळू विरघळून पाण्यांत मिसळून जातें, तें फार सुंदर दिसतें.

केदारपुरी गांवांत शिरण्याच्या ठिकाणीं आमचा मार्गदर्शक उभा होता. त्यानें आम्हांला कोठें उतरायचें तें सांगितलें. आमची धर्मशाळा बरीच मोठी, सोयीची, प्रशस्त होती. पाऊस, वारा, बर्फ यांनीं आम्ही गारठून गेलों होतों. धर्मशाळेंत शिरल्याबरोबर आमच्या पंड्यानें यात्रिकांना हार घालून त्यांचें स्वागत केलें. समोरच चार-पांच धगधगत्या शेगड्या ठेवल्या होत्या. त्या पाहून आम्हांला खूपच आनंद झाला. आम्ही शेकण्यासाठीं त्या शेगड्यांच्या भोंवतीं जमा झालों. मग गरम चहा घेतला आणि बर्फाचे अलगद गोळे टपकत असलेले पहात राहिलों. अजून आमच्या पथकांतील बहुतेक यात्रिक यायचे होते. कुणी म्हणाले, मंदिराचे दरवाजे बंद झाले असतील, आतां सकाळींच दर्शन होईल. पण मी विचार केला कीं, मंदिरापर्यंत जाऊन पाहूं. इतक्या लांब आलों, आतां शेंदोनशें यार्डांच्या अंतराला कशाला माघार घ्यायची ? म्हणून मी व माझी पत्नी मंदिराकडे निघालों. रस्त्यावर सहासात इंच बर्फाचा खच पडला होता. वारा, थंडी, वरून भुळुभुळु गळणारें बर्फ यांनीं अगदीं हाडांपर्यंत थंडी नेली होती. तरी आम्ही निघालोंच. लांबून पाहिलें. मंदिराचा दरवाजा उघडा दिसला. आम्ही आनंदानें झपाझप निघालों. आंत पुजाऱ्याशिवाय कोणी नव्हतें. पादत्राणें बाहेर चौथऱ्यावर ठेवून आम्ही निघालों, उघड्या पायांना बर्फानें किती कळा आल्या, हें वर्णन करून सांगणें कठीण. पण मंदिराच्या गाभाऱ्यांत जरा बरें वाटलें. थंडी खूपच कमी झाली होती. प्रथम मंदिराबाहेरील गणपतीचें दर्शन घेतलें, मग गाभाऱ्यांत जाऊन देवाची धूळभेट घेतली. यथासांग पूजाविधि करण्यासाठीं दुसऱ्या दिवशीं आम्ही येणारच होतों. पण त्या वेळीं निवांत दर्शन मिळालें आणि आमचा कष्टप्रद प्रवास सफल झाला.

केदारनाथ ही मूर्ति नसून साधारण त्रिकोणी अशी शिला आहे. ही रेड्याच्या पाठीसारखी दिसते. या शिलेची अशी कथा आहे, कीं पांडवांनीं राज्यत्याग केल्यानंतर ते केदारनाथच्या दर्शनासाठीं हिमालयाच्या या भागांत आले. पण पांडवांनीं आपल्या बांधवांची व स्वकुलांतील इतर नातेवाइकांची हत्या केली म्हणून केदारनाथांनीं महिषाचें रूप घेतलें व ते पृथ्वींत घुसूं लागले. तेव्हां भीमानें हा रेडा म्हणजेच केदार आहे असें ओळखून पृथ्वींत

घुसणारी ती पाठ पकडली. तेव्हां केदारनाथ प्रसन्न होऊन त्यांनीं पांडवांना भ्रातृहत्या व कुलहत्या या पापांतून मुक्त केलें. या महिषाचे पांच भाग पृथ्वीच्या निरनिराळ्या भागांत घुसले; त्या भागांना पंचकेदार म्हणतात. केदारनाथ येथें महिषाचा पृष्ठभाग आहे, मदमहेश्वर येथें द्वितीय केदार म्हणजे नाभि आहे, तुंगनाथ येथें तृतीय केदार म्हणजे बाहु आहेत, नेपाळांत पशुपति येथें चतुर्थ केदार म्हणजे रुद्रनाथ येथें मुख व पंचमकेदार कापिलेश्वर येथें जटा आहे. नेपाळमध्यें पशुपति येथें महिषाचें म्हणजे केदारनाथाचें शिर आहे. पंचकेदारांनीं हिमालयाचा व आसमंताचा ७०८ चौरस मैल भाग व्यापला आहे.

केदारनाथाचें मंदिर अतिशय प्राचीन आहे. जमिनीपासून तीन–चार फूट उंचवटा तयार केला आहे व त्यावर फरशी घातली आहे. मंदिराभोंवतीं या फरशीवर सात–आठशें लोक बसूं शकतील एवढा हा विस्तृत चबुतरा आहे. मंदिराचा कांहीं भाग व कांहीं शिल्पें हीं ग्रीक शैलीचीं आहेत. मंदिराच्या मुख्य दरवाजासमोर एक मोठा दगडी नंदी आहे. महाद्वाराच्या दोन्ही बाजूंस द्वारपाळांच्या मूर्ति आहेत. उजव्या बाजूला गजाननाची मूर्ति आहे. केदार-नाथाच्या पूजेसाठीं जाण्यापूर्वी या गणपतीची विधिपूर्वक पूजा करावयाची असते. पहिला दरवाजा ओलांडून आंत गेलें कीं सभामंडप लागतो. तो चांगला प्रशस्त आहे. त्याच्या मध्यभागीं लहानसा नंदी व गरुड आहेत. सभोंवतींच्या भिंतींत धर्म, अर्जुन, भीम, नकुल व सहदेव हे पांडव आणि द्रौपदी, कुंती, पार्वती, लक्ष्मी इत्यादि देवतांच्या मूर्ति आहेत. सभामंडप ओलांडून आंत गेलें, कीं आपण गाभाऱ्यांत येतों.

केदारनाथची शिला पर्वताच्या शिखराप्रमाणें आहे. त्याचा मध्यभाग थोडासा बसकट आहे. उंची साधारण तीन फूट व घेर दहाबारा फूट होईल. गाभाऱ्यांत डाव्या बाजूला अक्षय दीप असतो. तो रात्रंदिवस बारा महिने तेवत असतो. नोव्हेंबरमध्यें अति बर्फवृष्टीमुळें केदारनाथाचें मंदिर बंद होतें व सहा महिन्यांनंतर मे महिन्यांत तें पुनः उघडण्यांत येतें. तेव्हांहि हा दिवा जळत असतो असें म्हणतात. देवाला तूप लावण्याची प्रथा आहे. आपल्याकडे देवाच्या पायांस हात लावून दर्शन घेतात. केदारच्या शिलेला छाती लावून आलिंगन देऊन येथें दर्शनाची पूर्तता होते. मात्र असें निर्वाण दर्शन व

स्पर्शाची परवानगी सकाळीं बारा साडेबारापर्यंतच मिळते. सायंकाळीं आरतीच्या वेळीं लांबूनच दर्शन घ्यावें लागतें. आम्हांला देवाळ्याच्या गाभाऱ्यांत अर्ध्या तासाहून अधिक काळ मिळाला. दोन बंगाली वयस्क स्त्रिया गुप्त काशीहून चालत आल्या होत्या. साठपासष्ट मैलांचा प्रवास उतरत्या वयांत केल्यावर केदारच्या पाषाणाला छाती लावून दर्शन घेतांना त्यांच्या नेत्रांतून अश्रू ओघळत होते. तें दृश्य अविस्मरणीय होतें. कुठें कलकत्ता, कुठें हिमालयांतील केदार. भक्तीच्या निष्ठेनें या स्त्रिया इतक्या दूरवर आल्या आणि निर्वाण दर्शन मिळवून धन्य झाल्या. देवाच्या अंगावर कपडा वगैरे कांहीं न घालतां जें दर्शन मिळतें, त्याला निर्वाण दर्शन म्हणतात. केदारला हें दर्शन सकाळींच घडतें, संध्याकाळीं आरतीच्या वेळीं पाषाणावर रेशमी वस्त्र चढतें.

मंदिराचे दरवाजे बंद करायचे आहेत, असा इषारा मिळाला, तेव्हां आम्ही बाहेर पडलों. बर्फाच्या थरांतून चालत आणि छत्रीच्या साहाय्यानें वर्फवृष्टीपासून स्वतःला वांचवीत धर्मशाळेंत आलों. आतां ऊबदार रजयांत पडून रहाणें आवश्यकच होतें. कारण थंडीचा कडाका होताच. त्याशिवाय हवेच्या विरळपणामुळें श्वासोच्छ्वास करायलासुद्धां त्रास पडत होता. आम्ही धर्मशाळेत येतों, तों आमच्या पथकांतील आमच्या मागून चालत येणारे एक एक यात्रिक मुक्कामावर पोहोंचत होते. त्यांना मात्र हवेचा आणि चढाईचा अतिशय त्रास झाल्याचें स्पष्ट दिसत होतें. कारण आम्ही वर आल्यावर सोसाट्याचा वारा सुटला होता. पावसाच्या जोरदार सरी आल्या होत्या आणि बर्फवृष्टीहि वेगाची झाली होती.

पूर्वी आलेले लोक आतां खोल्यांत अंथरुणें टाकून दोन दोन रजया निरग अंगावर घेऊन झोंपले होते. त्याशिवाय आमच्या खोल्यांत ऊब येण्यासाठीं शेगड्या ठेवल्याच होत्या. पण थंडी या कशालाच जुमानीत नव्हती. मीहि जास्तींत जास्त गरम कपडे आणि डोकीवर माकडटोपी घालून रजयांत शिरलों. दीड-दोन तास तसेंच पडून राहिल्यावर थकवा कमी झाला. तोंपर्यंत जेवण तयार झालें होतें. पण हवेच्या कमी दाबामुळें येथें जेवण नीट शिजत नाहीं. त्यामुळें जसें अन्न शिजलें तसें आम्ही जेवलों. गुरुवार ता ११ मे हा तो दिवस होता. दर गुरुवारीं संध्याकाळीं आमच्या पथकांत दत्ताची आरती

होत असे. हिमालयाच्या त्या प्रगल्भ पार्श्वभूमीवर त्या रात्रींची आरती विशेष अर्थपूर्ण वाटली. रात्रीं मात्र कडक थंडीमुळे व विशेषतः विरळ हवेमुळे अनेकांना त्रास झाला. श्वासोच्छ्वास करणें कठीण झालें. डोकें व अंग दुखूं लागलें व विलक्षण अस्वस्थता आली. पहांटे पहांटे मात्र बहुतेकांना झोंप लागली.

दुसऱ्या दिवशीं आम्ही लवकर उठून स्नान वगैरे आटोपून केदारनाथाच्या पूजेसाठीं सिद्ध झालों. त्यासाठीं स्त्रियांनीं रेशमी वस्त्रें नेसलीं होतीं व बहुतेक पुरुषांनीं सोवळीं नेसलीं होतीं. तूप, डाळ, फुलें वगैरे पूजेचें साहित्य असलेलीं ताटें तयार मिळतात, तीं सर्वांनीं पंड्याकडून घेतलीं होतीं. त्या दिवशीं सकाळींहि बर्फ पडतच होतें. आमच्या इमारतीबाहेर पुरुषभर उंच बर्फाचे थर भिंतीला चिकटले होते. रस्त्यावरहि सहा इंच बर्फांतून चालत जावें लागत होतें. कुणी मुद्दाम गांवाहून बेलाचीं पानें आणलीं होतीं. कुणी सोन्याचीं बिल्वपत्रें करून आणलीं होतीं. आम्ही चाळीस बेचाळीसजण मंदिराकडे गेलों. तेथें सहा-सहा जणांच्या गटानें यात्रिकांना आंत सोडीत होते. आम्ही आमचा क्रम येण्याची वाट पहात थांबलों.

यथावकाश आमचा क्रम आला. पंड्यानें प्रथम आमच्याकडून श्रीगजाननाची यथाविधि पूजा करून घेतली. कोणत्याहि महत्कार्याच्या प्रारंभीं गणपतीची पूजा करण्याची महाराष्ट्रांतील पद्धत देशाच्या दुसऱ्या टोंकासहि असल्याचें पाहून समाधान वाटलें. मग आंत गेलों. तेथेंहि मुख्य देवाची व सर्व देवदेवतांची पूजा केली. ज्यांना आरती, लघुरुद्र, महारुद्र, एकादशिनी अशी अधिक पूजाअर्चा करावयाची असेल त्यांच्याकडून पैसे घेऊन पावती देण्यांत येते व त्याप्रमाणें धर्मकार्यें नंतर करून प्रसाद त्यांच्या घरीं रजिस्टर्ड पोस्टानें पाठविण्याची सोय आहे.

एका वेळीं थोडे थोडेच लोक आंत सोडले जात असल्यानें आमचे सर्व पूजाअर्चादर्शनादि विधि उत्तम रीतीनें पार पडले. आम्ही समाधानानें बाहेर आलों व जवळपासचीं ठिकाणें पहाण्यासाठीं दहा-पंधरा इतर यात्रिकांबरोबर निघालों. मला केदारनाथ मंदिराइतकेंच दुसरें पवित्र ठिकाण पहाण्याची अतिशय ओढ होती हें ठिकाण म्हणजे आद्य शंकराचार्यांची समाधि. केदारनाथच्या मंदिराचाच नव्हे, तर सबंध हिंदु धर्माचा आणि भारतीय संस्कृतीचा पुनरुद्धार करणारे अलौकिक शंकराचार्य. पं. जवाहरलाल नेहरूंनीं त्यांच्याबद्दल

म्हटलें आहे, " जगाकडे पाठ फिरवून जंगलांत एकटेच बसणारे ते पलायनवादी नव्हते. त्यांनीं आयुष्यभर सर्वत्र भारताचा प्रवास केला. अनेक वादसभा जिंकल्या, पंडितांच्याशीं चर्चा केल्या, विविध धर्मांच्या विरोधी गुरूंना हिंदुधर्म आणि त्यांतील अभेद्य तत्त्व पटवून दिलें. त्यांनीं हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंतचा भारतवर्ष एकसंध केला आणि हिंदुधर्माच्या अतूट धाग्यांनीं समाजाला एकत्रित आणलें. अनेक जन्मांत होणार नाहीं अशी अफाट कामगिरी शंकराचार्यांनीं अवघ्या बत्तीस वर्षांच्या आयुष्यांत करून दाखविली. देशाच्या चार दिशांना चार मठ स्थापून त्यांनीं हिंदुधर्माची पताका फडकावत ठेवली, ती आजहि कायम आहे." ( डिस्कव्हरी ऑफ इंडिया )

या दिग्विजयी शंकराचार्यांची समाधि केदारनाथाच्या मंदिराच्या डावीकडे जवळच शें-दीडशें यार्डांवर आहे. आम्ही बर्फ तुडवीत त्या बाजूला गेलों. तेथें एक लहानसें मंदिर आहे. आंत आद्य शंकराचार्यांची अतिसुंदर पांढरी शुभ्र संगमरवरी पूर्णाकार मूर्ति आहे. त्यांच्या परिचित धर्मोपदेशकाच्या आसनस्थ अवस्थेंत ती मूर्ति आहे. तिला आम्ही भक्तिभावानें नमस्कार केला. त्या लहानशा मंदिरामागच्या उंच हिमशिखराकडे नजर गेली. त्या हिमालयाइतकेंच शंकराचार्यांचें उत्तुंग जीवन मनश्चक्षूंसमोर उभें राहिलें.

नवव्या शतकांत होऊन गेलेले शंकराचार्य म्हणजे भारतांतीलच नव्हे, तर अखिल जगताच्या इतिहासांतील एक उदात्त चमत्कार आहे. त्यांची मूळभूमि केरळ प्रांतांतील. ते नंबुद्री ब्राह्मण होते. हे ब्राह्मण सदाचारसंपन्न व वेदाभ्यासपारंगत होते. पांचव्या वर्षीं उपनयन करून मुलाला गुरुगृहीं अभ्यासासाठीं पाठविण्याची प्राचीन चाल अद्यापिहि केरळीय नंबुद्री ब्राह्मणांत दिसते. हा प्रांत निसर्गरम्य असून तेथें कात, नारळ, पोफळ, केळीं वगैरेंची विपुलता आहे. अशा निसर्गसुंदर कालटी नांवाच्या केरळीय गांवांत विद्याधिराज नांवाचे एक वेदविद्यापारंगत व संपन्न असे नंबुद्री राहात होते. त्यांचा मुलगा शिवगुरु. हाहि मोठा प्रखर बुद्धीचा निघाला. पांचव्या वर्षीं त्याची मुंज करून त्याला गुरुगृहीं पाठविण्यांत आलें. तेथें त्यानें वेद, उपनिषदें, व्याकरण, छंद इत्यादींचें पठण केलें. पुढें यथावकाश तो तारुण्यांत आल्यावर त्याला धनाढ्यांच्या मुली सांगून येऊं लागल्या. पण त्यानें श्रीमंतीला नकार दिला आणि जवळच्या गांवांतील माघ पंडित यांची रूपगुणसंपन्न कन्या आर्याम्बा

होत असे. हिमालयाच्या त्या प्रगल्भ पार्श्वभूमीवर त्या रात्रींची आरती विशेष प्रसादपूर्ण वाटली. रात्रीं मात्र कडक थंडीचा व विशेषतः विरल हवेचा अनेकांना त्रास झाला. श्वासोच्छ्वास करणें कठीण झालें. डोकें व अंग दुखूं लागलें व विलक्षण अस्वस्थता आली. पहांटे पहांटे मात्र बहुतेकांना झोंप लागली.

दुसऱ्या दिवशीं आम्ही लवकर उठून स्नान वगैरे आटोपून केदारनाथाच्या पूजेसाठीं सिद्ध झालों. त्यासाठीं स्त्रियांनीं रेशमी वस्त्रें नेसलीं होतीं व बहुतेक पुरुषांनीं सोवळीं नेसलीं होतीं. तूप, डाळ, फुलें वगैरे पूजेचें साहित्य असलेलीं ताटें तयार मिळतात, तीं सर्वांनीं पंड्याकडून घेतलीं होतीं. त्या दिवशीं सकाळींहि बर्फ पडतच होतें. आमच्या इमारतीबाहेर पुरुषभर उंच बर्फाचे थर भिंतीला चिकटले होते. रस्त्यावरहि सहा इंच बर्फांतून चालत जावें लागत होतें. कुणी मुद्दाम गांवाहून वेलाचीं पानें आणलीं होतीं. कुणी सोन्याचीं बिल्वपत्रें करून आणलीं होतीं. आम्ही चाळीस बेचाळीसजण मंदिराकडे गेलों. तेथें सहा-सहा जणांच्या गटानें यात्रिकांना आंत सोडीत होते. आम्ही आमचा क्रम येण्याची वाट पहात थांबलों.

यथावकाश आमचा क्रम आला. पंड्यानें प्रथम आमच्याकडून श्रीगजाननाची यथाविधि पूजा करून घेतली. कोणत्याहि महत्कार्याच्या प्रारंभीं गणपतीची पूजा करण्याची महाराष्ट्रांतील पद्धत देशाच्या दुसऱ्या टोंकासहि असल्याचें पाहून समाधान वाटलें. मग आंत गेलों. तेथेंहि मुख्य देवाची व सर्व देवदेवतांची पूजा केली. ज्यांना आरती, लघुरुद्र, महारुद्र, एकादशिनी अशी अधिक पूजाअर्चा करावयाची असेल त्यांच्याकडून पैसे घेऊन पावती देण्यांत येते व त्याप्रमाणें धर्मकार्यें नंतर करून प्रसाद त्यांच्या घरीं रजिस्टर्ड पोस्टानें पाठविण्याची सोय आहे.

एका वेळीं थोडे थोडेच लोक आंत सोडले जात असल्यानें आमचे सर्व पूजाअर्चादर्शनादि विधि उत्तम रीतीनें पार पडले. आम्ही समाधानानें बाहेर आलों व जवळपासचीं ठिकाणें पहाण्यासाठीं दहा-पंधरा इतर यात्रिकांबरोबर निघालों. मला केदारनाथ मंदिराइतकेंच दुसरें पवित्र ठिकाण पहाण्याची अतिशय ओढ होती. हें ठिकाण म्हणजे आद्य शंकराचार्यांची समाधि. केदारनाथच्या मंदिराचाच नव्हे, तर सबंध हिंदु धर्माचा आणि भारतीय संस्कृतीचा पुनरुद्धार करणारे अलौकिक शंकराचार्य. पं. जवाहरलाल नेहरूंनीं त्यांच्याबद्दल

म्हटलें आहे, "जगाकडे पाठ फिरवून जंगलांत एकटेच बसणारे ते पलायनवादी नव्हते. त्यांनीं आयुष्यभर सबंध भारताचा प्रवास केला. अनेक वादसभा जिंकल्या, पंडितांच्याशीं चर्चा केल्या, विविध धर्मांच्या विरोधी गुरुंना हिंदुधर्म आणि त्यांतील अभेद्य तत्त्व पटवून दिलें. त्यांनीं हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंतचा भारतवर्ष एकसंध केला आणि हिंदुधर्माच्या अतूट धाग्यांनीं समाजाला एकत्रित आणलें. अनेक जन्मांत होणार नाहीं अशी अफाट कामगिरी शंकराचार्यांनीं अवघ्या बत्तीस वर्षांच्या आयुष्यांत करून दाखविली. देशाच्या चार दिशांना चार मठ स्थापून त्यांनीं हिंदुधर्माची पताका फडकावत ठेवली, ती आजहि कायम आहे." ( डिस्कव्हरी ऑफ इंडिया )

या दिग्विजयी शंकराचार्यांची समाधि केदारनाथाच्या मंदिराच्या डावीकडे जवळच शें-दीडशें यार्डांवर आहे. आम्ही बर्फ तुडवीत त्या बाजूला गेलों. तेथें एक लहानसें मंदिर आहे. आंत आद्य शंकराचार्यांची अतिसुंदर पांढरी शुभ्र संगमरवरी पूर्णाकार मूर्ति आहे. त्यांच्या परिचित धर्मोपदेशकाच्या आसनस्थ अवस्थेंत ती मूर्ति आहे. तिला आम्ही भक्तिभावानें नमस्कार केला. त्या लहानशा मंदिरामागच्या उंच हिमशिखराकडे नजर गेली. त्या हिमालयाइतकेंच शंकराचार्यांचें उत्तुंग जीवन मनश्चक्षूंसमोर उभें राहिलें.

नवव्या शतकांत होऊन गेलेले शंकराचार्य म्हणजे भारतांतीलच नव्हे, तर अखिल जगताच्या इतिहासांतील एक उदात्त चमत्कार आहे. त्यांची मूळभूमि केरळ प्रांतांतील. ते नंबुद्री ब्राह्मण होते. हे ब्राह्मण सदाचारसंपन्न व वेदाभ्यासपारंगत होते. पांचव्या वर्षीं उपनयन करून मुलाला गुरुगृहीं अभ्यासासाठीं पाठविण्याची प्राचीन चाल अद्यापिहि केरळीय नंबुद्री ब्राह्मणांत दिसते. हा प्रांत निसर्गरम्य असून तेथें कात, नारळ, पोफळ, केळी वगैरेंची विपुलता आहे अशा निसर्गसुंदर कालटी नांवाच्या केरळीय गांवांत विद्याधिराज नांवाचे एक वेदविद्यापारंगत व संपन्न असे नंबुद्री राहात होते. त्यांचा मुलगा शिवगुरु. हाहि मोठा प्रखर बुद्धीचा निघाला. पांचव्या वर्षीं त्याची मुंज करून त्याला गुरुगृहीं पाठविण्यांत आलें. तेथें त्यानें वेद, उपनिषदें, व्याकरण, छंद इत्यादींचें पठण केलें. पुढें यथावकाश तो तारुण्यांत आल्यावर त्याला धनाढ्यांच्या मुली सांगून येऊं लागल्या. पण त्यानें श्रीमंतीला नकार दिला आणि जवळच्या गांवांतील माघ पंडित यांची रूपगुणसंपन्न कन्या आर्याम्बा

हिच्याशीं विवाह केला. पण कित्येक वर्षें झालीं, तरी त्यांना अपत्य झालें नाहीं. घरीं सर्व सुखें असतां अपत्य नाहीं म्हणून दोघांनाहि अतीव चिंता निर्माण झाली. तेव्हां शास्त्री-पंडितांचें मार्गदर्शन घेऊन आणि घरचे सर्व व्यवहार नातेवाइकांवर सोंपवून शिवगुरु व आर्याम्बा यांनीं वृषपर्वतावर जाऊन अपत्यप्राप्तीसाठीं शंकराची आराधना करण्यास सुरुवात केली.

अशीं कडक तपश्चर्येचीं कांहीं वर्षें गेल्यावर शिवगुरूच्या स्वप्नांत एक ब्राह्मण आला आणि म्हणाला, " तूं अपत्यप्राप्तीसाठीं हें तप करतोस. तुला किती अपत्यें हवींत ? " शिवगुरु म्हणाले, " ईशकृपेंकरून घरीं सुबत्ता आहे, आपण वर द्याल तितकीं अपत्यें आम्हांला हवींत. " ब्राह्मण म्हणाला, " पण एक इषारा ऐक. पुष्कळ अपत्यें हवीं असतील, तर तीं मूर्ख व दुराचारी निघतील. एकच पुत्र हवा असेल तर तो सर्वगुणसंपन्न आणि बृहस्पतीसारखा प्रभावी असेल. " त्यावर शिवगुरु म्हणाले, " ठीक आहे. मला असा एकच पुत्र हवा. " ब्राह्मण म्हणाला, " पण तरीहि एक अट आहे. पृथ्वी जिंकणारा प्रतिभावान् मुलगा मिळेल, पण तो अल्पायुषी होईल. चालेल ? " हे शब्द ऐकून शिवगुरूवर वज्राघातच झाल्यासारखें झालें. त्यानें काकुळतीला येऊन विचारलें, " द्विजराज, एकच–पुत्र देणार, तो तरी दीर्घायुषी द्या. " ब्राह्मण म्हणाला, " नाहीं. दीर्घायुषी पण अज्ञानी मुलगा हवा कीं अल्पायुषी पण सर्वविद्यापारंगत मुलगा हवा त्याची निवड तूंच कर. " अखेर शिवगुरूंनीं अल्पायु पण सर्वविद्यापारंगत मुलगा मागितला आणि त्याला ' तथास्तु ' म्हणून ब्राह्मण दिसेनासा झाला.

हें स्वप्न पडल्यानंतर शिवगुरु व आर्याम्बा यांनीं तपाची यथाविधि सांगता केली. सगळीकडे आनंदी आनंद झाला. यथावकाश आर्याम्बा गरोदर राहिली व तिला अत्यंत तेजस्वी असा मुलगा झाला. मुलगा असामान्य रूपवान होता आणि त्याच्या चेहऱ्यावर विलक्षण बुद्धिमत्तेचें तेज विलसत होतें. तो वाढत होता आणि त्याच्या मनोहर विभ्रमांनीं मातापितरांना हर्ष होत होता आणि त्याच वेळीं हा सुलक्षणी मुलगा अल्पायुषी होणार म्हणून खंतहि वाटत होती. शंकराच्या प्रसादानें झालेला म्हणून त्याचें नांव शंकर ठेवण्यांत आलें होतें. पांचव्या वर्षी त्याची मुंज करून त्याला त्या भागांतील सर्वांत मोठ्या पंडिताकडे शिक्षणासाठीं पाठविण्यांत आलें. त्या आश्रमांतील अध्ययन व आचरण

अतिशय कडक असे. संध्यावंदन, वेदाभ्यास, अग्निपरिचर्या, भिक्षाटन, गुरुसेवा हीं सर्व कांटेकोरपणें करावीं लागत. शंकराची ग्रहणशक्ति इतकी तीव्र होती, कीं गुरुमुखांतून निघालेला प्रत्येक शब्द त्याच्या मनांत वज्रलेप होऊन जाई. तो एकपाठी होता. एकदां वाचलेलें शास्त्र, मग तें कितीहि मोठें असो, त्याला मुखोद्‌गत होत असे. वेद, व्याकरण, तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, छंद, पुराणें, या सर्वांवर शंकरानें तीन वर्षांत प्रभुत्व मिळविलें. अखेर त्याच्या गुरूंनींच सांगितलें कीं "बटु, आतां तुला द्यावयाला माझ्याकडे विद्या शिल्लक नाहीं." असें म्हणून गुरूंनीं त्याचा गौरव करून स्वगृहीं आणून सोडलें.

शंकर गुरुगृहीं असतांनाच त्याच्या अपूर्व बुद्धिमत्तेची कीर्ति आसमंतांत पसरली होती. केरळचा त्यावेळचा राजा हा रसिक, स्वतः कांहीं नाटकांचा कर्ता आणि ज्ञानी लोकांचा आदर करणारा होता. शंकराची भेट घ्यावी असें त्याला वाटत होतें. पण गुरूच्या आश्रमांत जाऊन विद्याभ्यासांत अडथळा आणण्याची राजाचीसुद्धां तेव्हां प्राज्ञा नव्हती. म्हणून शंकर घरीं आल्याचें कळतांच राजानें आपल्या प्रधानाजवळ वस्त्रभूषणें देऊन तीं शंकरास देण्यास सांगितलें व त्याला आपल्याकडे राजवाड्यांत घेऊन येण्यास सांगितलें. पण कालटी गांवीं जाऊन प्रधानानें राजवस्त्रें देऊं केलीं असतां शंकरानें विनयपूर्वक सांगितलें, "आम्ही संन्यासी, आम्हांला या वस्त्रांचा उपयोग नाहीं आणि राजाकडे येऊन आम्हांला कांहीं मागायचेंहि नाहीं. राजाला आमचा आशीर्वाद मात्र सांगावा."

पण हा नकार घेऊन राजा स्वस्थ बसला नाहीं. तो स्वतः दहा हजार मोहरा घेऊन शंकराकडे गेला, शंकरानें राजाचें उचित स्वागत केलें, पण त्याच्या मोहरा त्यालाच परत केल्या. राजानें त्या परत घेतल्या नाहींत, तेव्हां शंकराच्या इच्छेनुसार देवालय बांधण्यासाठीं त्याचें दान करण्यांत आलें. या वेळीं केरळच्या राजानें आपलीं तीन नाटकें शंकराला वाचून दाखविलीं. तीं तिन्ही नाटकें लक्षपूर्वक ऐकून शंकरानें संतोष व्यक्त केला आणि राजाला शुभाशीर्वाद दिला. त्यानंतर कांहीं वर्षांनीं राजा दुःखित होऊन शंकराकडे येऊन म्हणाला, "महापंडित शंकरमहाराज, मी आपल्याला माझीं तीन नाटकें वाचून दाखविलीं खरीं. पण पुढें तीं आगीच्या भक्ष्यस्थानीं पडलीं आणि आतां मी त्यांना कायमचा अंतरलों." तेव्हां शंकरांनीं त्याला सांगितलें, "राजा, तूं

मुलींच चिंता करूं नकोस. तुझीं नाटकें मला सर्वच्या सर्व आठवतात. " हें एकून राजाला अतिशय आनंद झाला. त्यानें लेखनिक बसविले. मग शंकरांनीं एकदांच ऐकलेलीं तीं तिन्ही नाटकें सर्वच्या सर्व म्हणून दाखविलीं आणि लेखकांनीं तीं उतरून घेतलीं. स्मरणशक्ति आणि कुशाग्रबुद्धि यांचा हा एक अलौकिक चमत्कार आहे.

स्वगृहीं परत आल्यापासून शंकरानें आपण संन्यास घेणार असें आईला सांगितलें होतें. पण आपला एकुलता एक मुलगा संन्यासी व्हावा, हें तिला पसंत नव्हतें म्हणून तिनें अनुज्ञा दिली नाहीं. एकदां शंकर आईबरोबर नदीवर स्नानास गेला असतां मगरीनें त्याला धरलें. तेव्हां शंकरानें आक्रोश करून आईला सांगितलें, " मला संन्यास घ्यायला आज्ञा देत असशील, तरच मी या मगरमिठींतून स्वतःला सोडवून घेईन, नाहींतर हेंच तुझें शेवटचें दर्शन ! " आपला मुलगा डोळ्यांसमोर मगरीच्या पोटांत जाणार हें पाहून आईनें मोठ्या दुःखानें त्याला संन्यास घेण्याची परवानगी दिली व शंकरानें आपलें सगळें बळ एकवटून मगरमिठींतून स्वतःला सोडवून घेतलें. त्यानंतर लवकरच शंकरानें आईचा आशीर्वाद घेऊन संन्यास देण्यास योग्य अशा गुरूच्या शोधार्थ घर सोडलें. प्रवास करीत करीत ते नर्मदातीरीं आले. तेथें गोविंदाचार्य मुनि एका गुहेंत तप करीत होते. त्यांना शंकराचार्यांनीं गुरु केलें. गोविंदाचार्यांनीं त्यांना आश्विन शुद्ध सप्तमीला संन्यासदीक्षा दिली आणि अद्वैत तत्त्वज्ञानाचें विद्यादान केलें. उपनिषदें व ब्रह्मसूत्र यांचा सखोल अभ्यास गुरु गोविंदाचार्यांच्याकडे शंकराचार्यांनीं केला. आपला शिष्य सर्व शास्त्रांत पारंगत झाल्याचें पाहून गुरूंनीं त्याला ' आतां अद्वैत तत्त्वाचा भारतवर्षांत प्रसार कर ' असा आदेश दिला. यांनींच त्याला आचार्य ही पदवी दिली आणि तेव्हांपासून शंकराचें शंकराचार्य या नांवांत रूपांतर झालें. त्यांचा आशीर्वाद घेऊन व गुरुचरणांवर मस्तक ठेवून शंकराचार्य त्या काळांतील विद्येचें माहेरघर जें काशी त्या क्षेत्रीं गेले.

काशीला शंकराचार्य गंगेच्या कांठीं मनकर्णिका घाटाजवळ एक झोंपडी करून तींत राहूं लागले. त्यांची विद्वत्ता व कीर्ति ऐकून दूरदूरच्या गांवांहून शिष्य आले. त्यांना शंकराचार्यांनीं अद्वैत तत्त्वाची शिकवण दिली. एकदां ते शिष्यांसह गंगेवर स्नान करून परत येत असतां एक चांडाळ त्यांच्या वाटेंत

आडवा आला. त्याला शंकराचार्य म्हणाले, " अरे, दूर हो. मला स्पर्श करूं नकोस. " त्यांवर चांडाळ निर्भयपणें म्हणाला, " तूं जर अद्वैत मानतोस, तर माणसामाणसांत भेद कां करतोस ? " त्यावर शंकराचार्यांनीं उत्तर देण्याचा वृथा प्रयत्न केला. पण चांडाळानें त्यांना हरविलें. तो म्हणाला, " आत्मा कधींहि विटाळत नाहीं. तुझ्यांत व माझ्यांत एकच चैतन्य आहे. तें सदा पवित्र आहे. माझा आत्मा अपवित्र आहे असें तूं सिद्ध कर, नाहीं तर वृथाभिमान सोडून मला स्पर्श कर. तुझें अद्वैत तत्त्वज्ञान खरें आहे कीं दिखाऊ आहे याचा पडताळा पहाण्याची हीच कसोटी आहे " शंकराचार्यांनीं क्षणभर विचार केला. तो चांडाळ असला, तरी त्याचें मत योग्य होतें. तें पटलें, तेव्हां शंकराचार्यांनीं आपलें ज्ञान व जात यांचा अभिमान सोडून त्या चांडाळाच्या पायाला स्पर्श केला आणि ते त्याला शरण गेले. तेव्हां आशीर्वाद देऊन 'अद्वैत तत्त्वज्ञानाचा प्रसार कर' असें सांगितलें व तो चांडाळ अदृश्य झाला. शंकराचार्यांनीं जाणलें कीं तो चांडाळ नसून प्रत्यक्ष काशी-विश्वनाथच होता.

शंकराचार्यांचा अवतार झाला, तेव्हां हिंदुधर्मावर अनेक बाजूंनीं संकटें आलीं होतीं. सम्राट अशोक, कनिष्क, हर्षवर्धन अशा अनेक राजांनीं उघडपणें बौद्ध धर्माचा प्रसार करण्यास सुरुवात केली. त्याशिवाय जैन धर्म, पशुपतमत, निरीश्वरवाद, चार्वाकमत, पांचरात्र मत, शाक्तपंथ, गाणपत्य पंथ, कापालिक मत असे अनेक लहानमोठे पंथ हिंदुधर्मीयांच्या लोकसंख्येचे लचके तोडीत होते. पण सर्वांत मोठा धोका होता तो बौद्ध धर्माचा. त्याला राजमान्यता होती आणि त्याचीं तत्त्वें सोपीं करून सांगणारे व प्रसार करणारे लक्षावधी भिक्षु भारतांत सर्वत्र पसरले होते. हिंदुधर्मास त्यामुळें इतकी अवकळा आली होती, कीं तींतून तो पुनः वर येईल असें वाटत नव्हतें. पण शंकराचार्यांचें कर्तृत्व अलौकिक होतें. त्यांनीं हिंदुधर्माच्या प्रसारासाठीं भारतभर दौरा काढला. देशाच्या चार दिशांना चार मठ स्थापले. बौद्धधर्माचा प्रसार करणाऱ्या महान पंडितांचा त्यांनीं वादविवादांत पराभव केला आणि त्यांपैकीं कित्येकांनीं हिंदुधर्म स्वीकारून आद्य शंकराचार्यांचें शिष्यत्व पत्करलें. विशेषतः मंडनमिश्र आणि शंकराचार्य यांचा वाद मुळांतून वाचण्यासारखा आहे. या वादांत मंडनमिश्रांची विद्वान् पत्नी सरस्वती हीच पंच होती व तिनेंच स्वतः वादाच्या अखेरीस मंडनमिश्र पराभूत झाल्याचें जाहीर केलें.

पण पतीचा पराभव मान्य करून ती स्वस्थ बसली नाहीं. सर्व शास्त्रांत पारंगत अशा सरस्वतीनें स्वतः शंकराचार्यांच्याबरोबर दीर्घ काळ शास्त्रार्थावर वाद केला. त्या वादांत सरस्वती हरली, तेव्हां तिनें जलसमाधि घेतली आणि मंडनमिश्रानें संन्यास घेतला.

शंकराचार्यांची माता अखेरच्या आजारांत होती, तेव्हां ते तिच्याकडे गेले. तिचे अखेरचे संस्कार आपण करूं असें त्यांनीं पूर्वी तिला वचन दिलें होतें. ती निधन पावली, तेव्हां गावांतील सनातनी लोकांनीं शंकराचार्यांना अंत्यसंस्कार करण्यास मनाई केली. कारण त्यांच्या मतें संन्याशाला हे संस्कार करण्याचा अधिकार नाहीं. तेव्हां शंकराचार्यांनीं त्याला शास्त्राधार दाखविला आणि अत्यंत तर्कशुद्ध पद्धतीनें आपलें मत मांडलें. पण सर्व गावकऱ्यांनीं त्यांच्यावर बहिष्कार घातला. म्हणून शंकराचार्यांनीं एकट्यानें मातेचें और्ध्वदेहिक आटोपलें व ते मातेच्या ऋणांतून मुक्त झाले.

शंकराचार्य केरळांतून निघाले, ते अद्वैत मताच्या प्रसाराच्या दिग्विजयासाठीं निघाले. त्यांनीं अनेक ज्ञानी शिष्य बरोबर घेतले. सुधन्वा राजानें त्यांच्या संरक्षणार्थ सैन्य दिलें. रामेश्वरच्या वाटेवर मध्यार्जुन नांवाच्या प्रसिद्ध शिव-मंदिरांत त्यांनीं कौल लावला, तेव्हां अद्वैताच्या बाजूनें कौल मिळाला. मग माता, गुरु, देव व ऋषि यांची प्रार्थना करून शंकराचार्यांनीं दिग्विजय सुरू केला. रामेश्वरास जाऊन त्यांनीं शाक्तपंथीयांच्या मिठींतून तेथील जनतेस सोडविलें. शाक्तांचा गुरु शेखर या पुढाऱ्याचा त्यांनीं वादांत पराभव केला. तेथून ते कांची येथें गेले. तेथें त्यांनीं शैवांना हरविलें आणि राजसेन राजाला तेथील मंदिराचा पुनरुद्धार करण्यास लावलें. मग त्रावणकोर येथें जाऊन शंकराचार्यांनीं वैष्णवांचा पराभव केला. पुढें श्रीशैल, गोकर्ण, द्वारका, उज्जैन, गौड अशा अनेक भागांत जाऊन शंकराचार्यांनीं हिंदुधर्माचा डळमळता समाज पुनः सांवरला आणि त्याला स्थैर्य दिलें. काश्मीरमध्यें शारदादेवीचें पीठ होतें. तेथें संस्कृत भाषा व शास्त्रें यांतील महान् पंडित होते; पण शारदापीठावर बसण्याची कोणीहि हिंमत केली नव्हती. शंकराचार्य तेथें शारदापीठांत गेले आणि त्यांनीं तेथील सर्वश्रेष्ठ पंडितांशीं वाद करून अद्वैत तत्त्वज्ञान त्यांना पटविलें. शंकराचार्यांची विद्वत्ता, प्रतिभा आणि त्यांच्यावर असलेला शारदा-देवीचा वरदहस्त पाहून, शारदापीठावर आरूढ होण्यास तेच एक पात्र आहेत

म्हणून सर्व पंडितांनीं त्यांना पीठावर आसनस्थ होण्याची विनंति केली. यावेळीं साक्षात् श्री शारदादेवी प्रकट होऊन तिनें शंकराचार्यांशीं संन्याशाचें कर्तव्य व व शुद्धाचरण यांविषयीं वाद केला. पण तिलाही शंकराचार्यांनीं हरविलें, अशीही एक आख्यायिका आहे. प्रत्यक्ष शारदेच्या आशीर्वादानें शंकराचार्य हे जगद्‌गुरु झाले. आपलें जीवनकार्य पूर्ण झालें हें पाहून शंकराचार्यांनीं आपल्या शिष्यांवर मठांचा कारभार सोंपविला. मग वयाच्या अवघ्या बत्तिसाव्या वर्षीं शंकराचार्य हिमालयांत गेले आणि त्यांनीं केदारनाथ मंदिराजवळ समाधी घेतली.

त्याच जागेजवळ आपण उभे आहोंत आणि त्या पवित्र भूमीच्या स्पर्शाचें भाग्य आपल्याला मिळालें आहे, ही अनुभूति अत्यंत चैतन्यदायक होती. एकादीच अनुभूति जन्मभर पुरते, तशी ती वाटली. शंकराचार्य झाले नसते, तर सिलोन, ब्रह्मदेश इत्यादि अनेक जवळच्या देशांप्रमाणेंच भारताचाही प्रमुख धर्म बौद्ध झाला असता आणि हिंदूंच्या श्रेष्ठ धार्मिक परंपरांचें काय झालें असतें कुणास ठाऊक. द्वारका, जगन्नाथपुरी, बदरीनारायण, रामेश्वर अशीं अनेक महत्त्वाचीं देवालयें शंकराचार्यांनीं उभारलीं. ज्योतिर्मठ, शृंगेरीमठ इत्यादि चार मठ स्थापून त्यांनीं हिंदुधर्मप्रसाराचीं केंद्रें सतत जागतीं ठेवलीं.

प्रस्थानत्रयी, शांकरभाष्य अशा ग्रंथांनीं पुढील काळांतील कोट्यवधी लोकांनाहि मार्गदर्शन केलें. अशा महापराक्रमी अवतारी पुरुषाच्या समाधीस अभिवादन करून आम्ही केदारपुरींतील इतर पवित्र स्थळें पहाण्यास निघालों. मंदिराच्या जवळपास अनेक कुंडें आहेत. त्यांत हंसकुंड, अमृतकुंड, रेतकुंड, उदककुंड इत्यादि विशेष महत्त्वाचीं आहेत. यांपैकी अमृतकुंडाचें जल प्राशन केलें, तर पुनर्जन्म येत नाहीं, असे तेथील पंड्ये सांगतात. रेतकुंडाजवळ जाऊन शिवनाम घेतलें, तर त्यांतून बुडबुडे येतात, असेंहि म्हणतात. केदार मंदिराजवळ एक मौनी साधु आहेत, त्यांचेंही आम्हीं दर्शन घेतलें. तेथून कांहीं अंतरावर भृगुपतन नांवाचें पर्वतावरील ठिकाण आहे. तेथें अतिशय खोल दरी आहे. या दरींत उडी घेऊन आत्महत्या केली, तर आत्महत्येचा दोष लागत नाहीं, उलट पुढील जन्मीं सर्व वासना सफल होतात या समजुतीनें फार पूर्वीं कांहीं यात्रेकरू या दरींत आत्मघात करीत असत. म्हणून गेलीं चाळीस वर्षें या भागाकडे यात्रेकरूंना जाण्यास बंदी आहे.

आम्ही तीन चार तास असे उघड्यावर होतों. नवीं नवीं धर्मस्थानें पहाण्याच्या उत्साहांत प्रथम आम्हाला थंडीचा कडाका तितका जाणवला नाहीं, पण हळूहळू थंडीनें आम्हांला चांगलेंच ग्रासलें. बर्फ आणि अधून मधून पाऊस बरसतच होता. केदारपुरींत पहाण्यासारखीं सर्व ठिकाणें पाहून झालीं. गांव लहानच आहे. पन्नास साठ घरें असतील. तींहि मुख्यतः मंदिराचे पुजारी, पंडये, चहाचे दुकानदार, टपालकचेरींत काम करणारे सेवक अशा आवश्यक लोकांचींच आहेत. मण्यांच्या माळा, केदारचीं छायाचित्रें, गाईड्स वगैरे विकण्याचीं दोन चार दुकानें आहेत. थोड्या धर्मशाळा आहेत. घरांतून बाहेर पडल्यावर आम्ही अगदीं गारठून व भिजून चिंब होऊन तीन चार तासांनीं आमच्या धर्मशाळेंत परतलों. तेथें गरम चहा घेऊन दोन दोन रजयांत जाऊन भरपूर विश्रांति घेतली. तोपर्यंत जेवण तयार झालें होतें. तें शिजण्यास कठीण असें होतें, तरी त्यांतल्या त्यांत बरें होतें. जेवणें होईपर्यंत आमचे घोडेहि आले होते. केदारला अतिशय थंडी असल्यानें घोडे मुक्कामाला खालीं गौरीकुंडाला जातात आणि सकाळीं ११ वाजेपर्यंत परत येतात. जेवण झाल्यावर आम्ही 'जय केदारनाथ' असा जयजयकार केला आणि आमच्या घोड्यांवर आरूढ झालों. पायीं जाणारे थोडे आधीं निघाले. इतक्या दूर आल्यासारखें उत्तम देवदर्शन घडल्याचें समाधान सर्वांनाच होत होतें. केदारपुरीहून निघतांना मंदाकिनीच्या घाटावर खूपच उतार आहे. तेथें आम्ही खालीं उतरलों आणि पांढरा शुभ्र बर्फ तुडवीत कांहीं अंतर चालत गेलों. घाट संपल्यावर पुनः अश्वारूढ झालों. आतां बर्फ किंवा पाऊस नव्हता. बरेंसें ऊन्ह पडलें होतें. सभोंवतीं उंचच उंच बर्फाच्छादित पर्वत उभे होते. त्यांची शोभा पहात आही झपाट्यानें डोंगर उतरूं लागलों. केदार ते गौरीकुंड या मार्गावर बिकट उतार आहे. रस्ते निसरडे झालेले असतात. त्यामुळें आपण पडतों कीं काय अशी भीति वाटत रहाते. पण घोड्यांच्या कसबामुळें, निसर्गसौंदर्याची शोभा पहात, घोडेवाल्यांचें एकसुरी गाणें ऐकत आणि वाटेंत दिसेल त्या चट्टीवर चहाचे घुटके घेत आम्ही झपाझप पण मौजेनें उतरूं लागलों. रामवाडा ओलांडल्यावर थंडी कमी होऊं लागली, आणि गौरीकुंड आल्यावर तर थंडी सुखद वाटूं लागली. त्या रात्रीं आम्ही गौरीकुंडमध्यें पूर्वीच्याच जागीं मंदाकिनीच्या तीरावरील प्रशस्त धर्मशाळेंत मुक्काम केला. दुसऱ्या दिवशीं गौरीकुंडाहून निघालों आणि फाटाचट्टीस मुक्काम केला.

हें अंतर आठ मैलांचें आहे. चालणाऱ्यांच्या दृष्टीनें एका दिवसांत साधारण एवढेंच अंतर घरणें सोयीचें असतें फाटा चट्टीहून १४ मे रोजीं पहाटे आम्ही निघालों आणि दुपारपर्यंत पुनः गुप्तकाशीला परत आलों. त्या दिवशीं गुप्त काशीला मुक्काम केला. तेथून पुढें थेट बद्रीनारायणपर्यंतचा प्रवास मोटारीनेंच व्हायचा होता.

दुसऱ्या दिवशीं पहांटे दोन मोटारींनीं आम्ही सर्व यात्रिक निघालों. रुद्रप्रयागपर्यंत आल्यावाटेनेंच परतावें लागतें. तेथून मात्र बद्रीनारायणकडे वाट फुटते. रुद्रप्रयागपर्यंत आपण मंदाकिनीच्या कांठानें येतों, पण तेथून पुढें अलकनंदा नदीच्या रम्य कांठानें आपण थेट बद्रीनारायणपर्यंत जातों. रुद्रप्रयाग-पासून एकवीस मैलांवर कर्णप्रयाग आहे. येथें कर्णगंगा ऊर्फ पिंडरगंगा अलक-नंदेस मिळते. नंदाकोट या २३,००० फूट उंचीच्या शिखराजवळ कर्णगंगा ऊर्फ पिंडर ही नदी प्रथम हिमनदी म्हणून निघते व पुढें तिच्या बर्फाचें पाणी होतें. कर्णप्रयाग येथें कर्णाचें व उमादेवीचें अशीं देवालयें आहेत. येथें कर्णानें तपश्चर्या करून सूर्यापासून कवच–कुंडलें मिळविलीं. पण भारतीय युद्ध सुरू होण्यापूर्वी कर्णापासून अर्जुनाला भय आहे असें ओळखून इंद्रानें अर्जुनाला वांचविण्यासाठीं अतिथी ब्राह्मणाचें रूप घेतलें आणि तो कर्णाजवळ गेला. कर्णानें अतिथीस प्रणाम करून 'काय हवें तें मागावें' अशी विनंति केली. कर्णाजवळ प्रत्यक्ष सूर्याचीं कवचकुंडलें असल्यानें तो अजिंक्य होता म्हणून अतिथीच्या रूपांतील इंद्रानें तीं कवचकुंडलें मागितलीं. कर्ण हा इतका उदार होता, कीं त्यानें तीं कवचकुंडलें काढण्यास सुरुवात केली. या क्षणीं सूर्यानें कर्णाला त्या कृतीपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. हा खरा अतिथी नसून अर्जुनाला वांचविणारा इंद्र आहे असें सूर्यानें सांगितलें. पण कर्णाचा निश्चय आढळ होता. कांहींहि झालें, तरी आपण दिलेला शब्द मागें घेणार नाहीं असें सांगून अतिथीला कवचकुंडलें दिलीं. कर्णप्रयागपासून अकरा मैलांवर पंच बद्रींपैकीं 'आदिबद्री' आहे.

कर्णप्रयागपासून पुढें तेरा मैलांवर नंदप्रयाग आहे. तेथें महर्षि कण्वमुनींनीं तपश्चर्या केली. कण्वमुनींच्या आश्रमाजवळच दुष्यंत-शकुंतला यांचा विवाह झाला. कण्वाश्रमाचा अपभ्रंश होऊन कनासू नांव पडलेलें गांव येथेंच होतें. पण पुढें नंद राजानें येथें यज्ञ केला व या गांवास नंदप्रयाग नांव पडलें. येथून

सात मैलांवर असलेल्या शंकराच्या मंदिरांत रावणानें शंकराची आराधना केली होती, म्हणून त्या गांवास दशमौली हें नांव पडलें व त्याचा 'दसौली' हा अपभ्रंश झाला. नंदप्रयागमध्यें चंडिका, वशिष्ठेश्वर महादेव व नंदगोपाळ यांचीं देवालयें आहेत. कूर्माचलांतून आलेली नंदाकिनी व अलकनंदा यांचा संगम येथें होतो. नंदप्रयागपासून सात मैलांवरचमोली हें जिल्ह्याचें मोटें शहर लागतें. चमोलीहून एक रस्ता हरद्वारला जातो व दुसरा केदारकडे जातो. सरळ रस्ता पुढें जोशीमठाकडे जातो. येथें रुग्णालयें, टपाल, तारकचेऱ्या वगैरे सर्व सोयी आहेत. बाबा काळी कमळीवाले यांची व इतर अनेक धर्मशाळाहि आहेत. तेथून दहा मैलांवर पीपल कोटी हें मोठें गांव लागतें. येथें बाजारहाट मोठा आहे. पण धार्मिक महत्त्वाचें असें हें गांव नाहीं. मात्र पीपलकोटीहून तीनचार मैलांवर गरुडगंगा या ठिकाणीं श्रीगणेश आणि गरुड यांच्या मूर्ति आहेत. येथें गरुडगंगा नदी अलकनंदेस मिळते. तेथून साडेतीन मैलांवर पाताळगंगा आहे. या नदीचें पात्र बरेंच विस्तृत असलें तरी पाणी फारसें नाहीं. तेथून चार मैलांवर हेलंग आहे. तेथून पांचसहा मैलांवर कल्पेश्वर महादेव आहे. तें पंच केदारांपैकीं पांचवें केदारस्थान आहे. हेलंगपासून जोशीमठ आठ मैलांवर आहे. हेलंगपासून अर्ध्या मैलावर आदिबदरी आहे. पंचकेदार आहेत, त्याप्रमाणेंच आदिबदरी, विशाल–बदरी, भविष्यबदरी, योगबदरी आणि ध्यान-बदरी अशा पांच बदरी आहे.

गुप्तकाशी ते जोशीमठ हा रस्ता बराच धुळीचा आणि वांकड्या वळणांचा आहे. त्यामुळें आम्ही संध्याकाळीं जोशीमठास पोहोंचलों, तेव्हां अगदीं थकून गेलों होतों. जोशीमठ हें गांव मोठें आहे, तरी चढउताराचें व डोंगरावर पायऱ्यांसारखें वसलें आहे. या ठिकाणीं आद्य शंकराचार्यांना ज्ञानज्योति मिळाली म्हणून याचें नांव ज्योतिर्मठ असें ठेवण्यांत आलें. त्याचाच अपभ्रंश होऊन तें पुढें जोशीमठ असें झालें. येथें उंच टेकडीवर शंकराचार्यांनीं स्थापन केलेला मठ अजूनहि आहे. गांवांत नृसिंह, शारदांबा, दुर्गादेवी, इत्यादि मंदिरें असून दंडधारा ही अखंड वहाणारी व हिमालयांतून आलेली झऱ्या-सारखी धार आहे. इ. स. पूर्वी २५०० वर्षांतील कल्चुरी साम्राज्यांत स्थापन झालेलें वासुदेवाचें प्राचीन मंदिर येथें आहे, असें पंड्ये सांगतात. येथील नृसिंह मंदिराची प्रचलित आख्यायिका अशी आहे कीं, सम्राट वासुदेवाचा

पुत्र शिकारीला गेला असतां, भगवान् विष्णु अतिथीच्या रूपानें राजवाड्यांत आले आणि भोजनोत्तर राजमहालांत जाऊन राजाच्या पलंगावर झोंपले. राजा शिकारीहून आल्यावर त्यानें हें पाहिलें, तेव्हां त्यानें रागानें विष्णूवर तलवारीनें वार केला. पण त्याच्या शरीरांतून रक्ताऐवजीं दूध निघूं लागलें. तेव्हां हा कोणी योगी पुरुष किंवा देव असल्याचें पटून राजा त्यांना शरण गेला. तेव्हां विष्णूंनीं त्याला सांगितलें, " तुझी राजधानी जोशीमठाहून हलवून कत्चुरींत ने. माझ्या हातावरचा घाव नृसिंह मूर्तीवर दिसेल. ही मूर्ति फुटली तर तुझ्या वंशाचा लोप होईल. "

अजूनहि जोशीमठ येथील नृसिंह मंदिरांतील मूर्तीचा एक हात कृश व तुटून पडेल असें वाटण्यासारखा आहे. हा हात तुटून पडेल, तेव्हां नर पर्वत व नारायण पर्वत एक होतील व बद्रीनारायणास जाण्यासाठीं वाट उरणार नाहीं, असा उल्लेख येथील लोककथेंत आढळतो. हिमालयाच्या नर, नारायण, गंधमादन या पर्वतांवर जेव्हां फार बर्फ पडतें, तेव्हां बद्रीनाथपुरी बंद होते. बद्रीनारायणांची उत्सवमूर्ती खाली जोशी मठास आणण्यांत येते व या नृसिंह-मंदिरांत तिची प्रतिष्ठापना होते. उन्हाळ्यांत बर्फ कमी होईपर्यंत पांचसहा महिने मूर्तीची पूजाअर्चा येथेंच होते. जोशीमठास महिषासुरमर्दिनीचें देवालयहि आहे. या गांवचीं सर्व प्रमुख देवालयें पाहून आम्ही धर्मशाळेंत परत आलों.

जोशीमठ हें गांव समुद्रसपाटीपासून ६१०० फूट उंचीवर आहे. बदरी नारायण हें क्षेत्र येथून फक्त १९ मैलांवर आहे. या गांवांत हिमालयांतील औषधी वनस्पतींची बरींच दुकानें दिसलीं. धर्मशाळांची संख्याहि मोठी आहे. कांहीं खासगी घरमालकहि मोसमांत आपल्या घरीं यात्रिकांना राहूं देतात आणि थोडी अर्थप्राप्ति करतात. येथें जेवणखाणाची महागाई आहे. कारण धान्य वगैरे फार लांबून आणावें लागतें. चहाच्या दुकानांची संख्या खूपच मोठी आहे. टपाल–तार कचेऱ्या वगैरे सोयी चांगल्या आहेत. इतक्या उंचावर पाणी अगदीं विपुल प्रमाणांत मिळतें. येथील मुख्य ठिकाण म्हणजे आद्यशंकराचार्यांनीं स्थापन केलेला मठ. गांवाच्या उजव्या हातास उंच टेकडीवर असलेला हा मठ पहाण्यास आम्ही आठदहा जण गेलों. मठांत शंकराचार्यांची गादी आहे. मठ खूपच प्रशस्त आहे. त्याच्या आवारांत सुंदर टपोऱ्या गुलाबाचीं झाडें आहेत. जवळच महादेवाचें देवालय आहे. मठांत दहाबारा मुमुक्षु

विद्याभ्यास करीत होते अशी माहिती मिळाली. शंकराचार्यांच्या गादीजवळ बसलेल्या साधूस मीं बरीच माहिती विचारली. त्याला फार थोडी माहिती होती. त्यानें सांगितलें कीं या गादीचे सध्यांचे शंकराचार्य तूर्त प्रयागला गेले आहेत. या मठांत काय काय वाचन व विद्याभ्यास चालतो असें विचारतां त्यानें सांगितलें कीं, ' मला तें कांहीं माहीत नाहीं. मी गादीची नुसती पूजा करतों आणि येथें मिळालेली दक्षिणा तिजोरींत जमा करतों. ' त्याच्या स्वतःच्या शिक्षणाविषयीं विचारलें तेव्हां आपण निरक्षर असल्याचें त्यानें सांगितलें. आद्य शंकराचार्यांच्या गादीचा पुजारी निरक्षर असावा, याचें मला फार वाईट वाटलें. अर्थात् इतर पुजारी तरी ज्ञानी असतील अशी मी स्वतःची समजूत घातली.

शंकराचार्यांच्या मठानंतर आम्ही नृसिंह मंदिर, दंडधारा वगैरे पाहून धर्मशाळेंत मुक्कामावर आलों तेव्हां सबंध गांव यात्रेकरूंनीं भरून गेल्याचें दिसलें. यात्रा नुकतीच सुरू झाली होती आणि बद्रीनारायणाहून परत आलेले यात्रिक थोडेच होते. बहुतेकजण तिकडे जाणारेच होते. पण महाराष्ट्र, बंगाल, दक्षिण भारत, राजस्थान इत्यादि दूरदूरच्या भागांतून आलेले यात्रेकरू रस्त्यांत, धर्मशाळांत, उपाहारगृहांत, मोटार स्थानकावर सर्वत्र दिसत होते. वर देवस्थानावर बर्फ किती पडतें, रस्ते कसे आहेत याची चौकशी हाच बोलण्याचा मुख्य विषय होता. रस्त्यावर फार बर्फ पडत असल्याच्या बातम्या होत्या. त्यामुळें क्षेत्रापर्यंत प्रवास कसा होईल याची थोडी चिंताहि वाटत होती. जोशी मठापासून बद्रीनारायणापर्यंत सरकारी मोटारींची वाहतूक आहे. या मोटारी इतर मोटारींपेक्षां लांबीनें लहान आहेत. कारण या रस्त्यावर वळणें फार असल्यानें मोटारी वळवितांना लहान मोटारी सोयीच्या असतात.

१८ मे रोजीं सकाळीं सात वाजतां ' जय बद्रीनाथ ' च्या घोषांत आमच्या मोटारी निघाल्या. गांव सोडून आम्ही मैलभर गेलों असूं तोंच चढ्या पहाडांतून जाणारा वांकडातिकडा रस्ता दिसला. हा रस्ता जितका भीतिदायक आहे, तितकाच सुंदरही आहे. या रस्त्यावर झाडी थोडीच आहे, पण कप्प्याकप्प्याचे उंचच उंच पहाड संरक्षक राक्षसासारखे रस्त्याच्या दोन्ही बाजूंना खडे आहेत. सकाळचीं लाल पिवळसर उन्हें त्यांच्या टोंकावर पडलीं, तेव्हां तर तांब्याच्या आणि सुवर्णाच्या प्रचंड राशींसारखे हे पर्वत दिसूं लागले. हा एकोणीस

मैलांचा रस्ता अगदीं अविस्मरणीय आहे. उंच पर्वतावरचा रस्ता हळूहळू उंचावत जातो. तसेंच मोटारींना एकदम चढण लागू नये म्हणून हा रस्ता नागमोडी करावा लागतो. म्हणून उंचावर गेल्यावर खालीं पाहिलें, कीं असा रस्ता पायऱ्यांसारखा दिसूं लागतो. त्या पायऱ्यांवरून खालून वर येणाऱ्या लहान लहान आकाराच्या भासणाऱ्या मोटारी दिसतात. बदरीनारायणाच्या या रस्त्याला एकाखालीं एक असे नऊ रस्ते आहेत. त्यामुळें अगदीं वर गेल्यावर त्यांच्या नागमोडी रेघा मनोहर दिसतात. शेवटच्या पांच सहा मैलांत रस्त्यावर बर्फाचे खच पडलेले होते. कारण हिमालयावरून येणारे पाण्याचे ओघळ रस्त्यांना न जुमानतां एका रस्त्यावरून दुसऱ्या रस्त्यावर असे पर्वतावरून खालीं वहातात आणि अति थंडीमुळें ते गोठतात. त्यामुळें बर्फाचे हे ढीग रस्त्यावरून दूर करणें हें एक मोठेंच काम असतें. त्यासाठीं कांहीं ठिकाणीं बुलडोझर यंत्रें ठेवण्यांत आलीं आहेत. या यंत्रांनीं रस्त्यावरचें बर्फ उचलून बाजूला फेंकून देईपर्यंत मोटारींना थांबावें लागतें. अर्थातच मग त्यांतून यात्रिक खालीं उतरतात आणि बर्फाचे प्रचंड ढपले बाजूला फेंकले जात असतांना ती दुर्लभ मौज पहातात. अशा एका ठिकाणीं आमचा अर्धा पाऊण तास मोडला. पण त्याचें कोणालाच वाईट वाटलें नाहीं. तेवढ्या वेळांत लोकांनीं बर्फावर भरपूर खेळ करून घेतले आणि फोटो काढून घेतले. मोठीं माणसेंहि अशा वेळीं मुलांच्यासारखीं उल्हसित होऊन बर्फावर खेळत बागडत होतीं, तें दृश्य रमणीय दिसत होतें.

जोशीमठानंतर जवळच विष्णुप्रयाग लागतें. तेथें अलकनंदा आणि धौलीगंगा यांचा संगम आहे. पंचप्रयागांपैकीं हें शेवटचें प्रयाग आहे. येथें विष्णूचें मंदिर आहे. येथून एक मैलावर गोविंदघाट आहे. हेमकुंड येथें शिखांचे धर्मगुरु गोविंदसिंह यांनीं तपश्चर्या केली होती. गोविंदघाटला शिखांचें गुरुद्वार आहे. हेमकुंडाला गोविंदघाटपासून रस्ता जातो. पण हेमकुंड हें १५,००० फूट उंचीवर आहे. रस्ता अतिशय बिकट आणि बर्फाच्छादित आहे, म्हणून तेथें जाणारे लोक फार क्वचित् आढळतात. या मार्गावर फुलांची समृद्धि आहे आणि तेथील फुलांची विविधता हा जगांतील एक मोठाच चमत्कार आहे. कांहीं परदेशी तज्ज्ञांनीं तेथें जाऊन हिमालयांतील या फुलांचें संशोधन केलें आहे आणि तेथील कलमें जर्मनींत नेऊन जगविण्याचाही प्रयोग केला आहे.

विष्णुप्रयागच्या पुढें पांडुकेश्वर हें गांव लागतें. अलकनंदेच्या कांठचें हें एक रमणीय गांव आहे. जोशीमठापासून आठ मैलांवरचें हें गांव समुद्रसपाटीपासून सहा हजार फुटांवर आहे. गंधमादनादि पर्वताच्या रांगा येथून दिसतात. पंडु राजानें स्थापन केलेल्या योगबदरीचें मंदिर येथें आहे. पांडवांचीं मंदिरें हें पांडुकेश्वराचें मुख्य आकर्षण आहे. पंडुराजानें दोन राण्यांसह येथें तप केलें. पंडु राजाची ही कथा महाभारतांत अशी आहे : पंडु राजाला कुंती आणि माद्री अशा दोन राण्या होत्या. पण त्याला संतान होणें शक्य नव्हतें. कारण पंडुराजा एकदां मृगयेला गेला असतांना त्यानें एक हरिण व हरिणी एकत्र आलीं असतां त्यांच्यावर बाण मारला. हरिणीला बाण लागल्याचें पाहून हरिण मानववाणीनें व्याकुळ स्वरांत म्हणाला, " अरे, क्रीडा करणाऱ्या हरणयुगुलांवर बाण मारूं नये, असें शास्त्र आहे. मी हरिण नसून किंदम ऋषी आहें. तूं शास्त्रविरुद्ध वर्तन केलेंस म्हणून मी तुला शाप देतों, कीं तूं ज्यावेळीं आपल्या पत्नीशीं रममाण होशील, त्यावेळीं तूं मरण पावशील. " हा शाप ऐकून पंडुराजा पश्चात्तापदग्ध झाला. त्यानें दानधर्म केला आणि ईश्वरचिंतनासाठीं त्यानें कुंती व माद्री यांच्यासह तप करण्यास सुरुवात केली.

पण कुंतीला दुर्वास ऋषींनीं दिलेल्या मंत्रामुळें तिला पतीच्या सहवासाशिवाय पुत्र होणें शक्य होतें. कुंती उपवर असतांना त्रिकालदर्शी दुर्वास मुनी तिच्या पित्याकडे आले. तिनें चातुर्मासांत मुनींची सेवा केली. दुर्वास प्रसन्न झाले, कुंतीला पतीपासून अपत्य होणार नाहीं, हें त्यांनीं आधींच अंतर्ज्ञानानें जाणलें. म्हणून दुर्वासांनीं कुंतीला अत्यंत सामर्थ्यशाली असा मंत्र दिला आणि सांगितलें, " या मंत्रानें तूं ज्या ज्या देवाला आवाहन करशील, तो तुला शरीरसंबंधाशिवाय एक एक पुत्र देईल. त्यावेळीं कुंती लहानच होती. ती एकदां प्रातःकाळीं नदीवर स्नानास गेली. स्नान करतां करतां लाल सूर्यबिंब वर आलें आणि त्याच्या प्रकाशानें ती प्रभावित झाली. दुर्वासांनीं दिलेल्या मंत्राची तिला आठवण झाली आणि मागचा पुढचा विचार न करतां तिनें तो मंत्र म्हणून सूर्याला आवाहन केलें. दुर्वासाचें योगसामर्थ्य एवढें विराट होतें, कीं त्या मंत्रानें प्रत्यक्ष सूर्यनारायण आले. त्यामुळें दिवसा उजेडी सर्वत्र अंधार झाला. कुंती अतिशय घाबरली. पण विचार करायलाही तिला वेळ नव्हता. सूर्यनारायणानें तिला कवच, कुंडलांनीं युक्त असा कर्ण नांवाचा पुत्र दिला

आणि ' तुझें कौमार्य अभंग राहील ' असा आशीर्वाद दिला. पण देवादिकांनीं आशीर्वाद दिला, तरी पृथ्वीवरचे मानव त्यावर विश्वास ठेवतील काय ? कुमारी माता म्हणून आपली बेअब्रू होईल आणि कुळाला कलंक लागेल या विचारानें नुकतेंच जन्मलेलें तें बालक एका होडींत घालून तिनें नदींत सोडून दिलें आणि ' गंगे, गोदे, यमुने, माझा नोहे, तुझाचि हा बाळ ' अशी नदीची प्रार्थना केली.

पंडुराजाला किंदम ऋषींनीं शाप दिल्यावर त्यानें केलेल्या तपाची सांगता झाली, तेव्हा कुंतीनें आपल्याला दुर्वासांनीं दिलेल्या मंत्राची माहिती पतीला सांगितली. मग कुंतीनें विधिपूर्वक देवपूजा केली आणि यमधर्म, वायु आणि इंद्र यांना आवाहन केलें. म्हणून तिला धर्म, भीम आणि अर्जुन हे पुत्र झाले. सवतीला पुत्र आहेत, पण आपल्याला नाहींत, याची खंत माद्रीला वाटू लागली. म्हणून कुंतीनें तिला दुर्वासांचा मंत्र सांगितला. माद्रीनें तो मंत्र म्हटला व अश्विनीकुमारांना आवाहन केलें, तेव्हां तिला नकुल व सहदेव हे पुत्र झाले.

एकदां मांडव्य ऋषि तप करीत ध्यानस्थ बसले असतां कांहीं चोर आले, आणि त्यांनीं जवळच असलेल्या ऋषींच्या कुटींत आसरा घेतला. चोरांनीं राजाचें जडजवाहीर चोरलें होतें. राजाचे सैनिक पाठलाग करीत आले. त्यांनीं कुटीबाहेर ध्यानस्थ असलेल्या मांडव्य ऋषींना, " येथून चोर जातांना आपण पाहिलेत काय ? " असें विचारलें. पण समाधीमुळें त्यांना तो प्रश्न ऐकूंच गेला नाहीं. जवळच्या कुटीचा शोध घेतां सैनिकांना तींत चोर सांपडले. त्यांनीं चोरांना पकडलें आणि मांडव्य ऋषींनाही साथीदार म्हणून पकडून राजापुढें आणलें. राजाला वाटलें कीं हा कोणी चोरच असून त्यानें साधूचें सोंग घेतलें आहे. राजानें मांडव्यांना ठार मारण्याचा हुकूम दिला. पण त्यांच्यावर तलवार चालेना आणि फांसही काम देईना. तेव्हां हे खरोखरच कोणी महर्षि आहेत असें ओळखून राजानें त्यांना प्रणाम केला. मांडव्याचें तप संपलें. त्यांनीं राजाला क्षमा केली आणि ते म्हणाले, " यांत तुझा कांहीं गुन्हा नसून माझ्याच कृतकर्माचें हें फळ आहे." मांडव्य ऋषींनीं जलसाधि घेतली आणि त्यांना विष्णुलोकांत स्थान मिळालें. मग ते यमाकडे गेले आणि त्यांनीं विचारलें, " माझ्या कोणत्या अपराधामुळें राजानें मला फांशी दिलें ? " यमानें सांगितलें " महाराज, आपण चार वर्षांचे असतांना एका फुलपांखराला पकडलेंत आणि

त्याचे पंख तोडून त्याचे हाल केलेत...म्हणून ही शिक्षा आपल्याला भोगावी लागली." त्यावर ते तपस्वी त्वेषानें म्हणाले, "यमधर्मा, तुला न्याय आणि अन्याय कळत नाहीं. जाणून बुजून केलेलें पापकृत्य आणि अजाणपणें हातून घडलेला अपराध यांतला फरक तुला कळत नाहीं. अरे, चार वर्षांच्या मुलाला पाप कोणतें आणि पुण्य कोणतें हें कळतें काय? तूं मला अन्यायानें शासन केलेंस म्हणून मी तुला शाप देतों, कीं तुला पृथ्वीवर दासीच्या पोटीं जन्म घ्यावा लागेल." या शापानें यमधर्म सुनंदेच्या पोटीं विदुर म्हणून जन्माला आले. पण कुंतीला जे धर्मराज झाले, ते मात्र यमधर्मापासून मंत्राच्या आवाहनानें झाले.

पांडुकेश्वराजवळच अलकनंदेच्या किनारीं पहाडावर 'पांडवशिला' आहे. त्या ठिकाणीं पंडुराजानें तप केलें होतें, म्हणून तिला पांडवशिला म्हणतात. पांडुकेश्वरनंतर शेषाची तपोभूमि शेषधारा आणि मरुत्तराजानें जेथें यज्ञ केला तें लामबगड हीं ठिकाणें लागतात. पांडुकेश्वर ते लामबगड हें अंतर अडीच मैलांचें आहे, पण तेवढ्यांत अडीच हजार फुटांची चढण आहे. केदारनाथ-च्या अखेरच्या प्रवासांतहि दर मैल अंतराला एक हजार फूट उंच चढण आहे. पांडुकेश्वरानंतर लागणारें मोठें गांव म्हणजे हनुमान चट्टी. अगदीं रस्त्यावरच हनुमानाचें मोठें मंदिर आहे. हनुमान चट्टी येथें प्राचीनकाळीं वैखानस मुनींचा आश्रम होता व या ठिकाणीं त्यांनीं मोठा यज्ञ केला होता. हनुमानचट्टीपासून बद्रीनारायण चार मैलांवरआहे. पण तें चार मैलांचें अंतर काटण्यास तास सव्वा-तास तरी लागला. बद्रीनाथपुरीच्या विशाल मोटारतळावर आलों, त्यावेळीं एका बाजूला हिमाच्छादित नर पर्वत आणि दुसऱ्या बाजूला हिमाच्छादित नारायण पर्वत दिसला. अलकनंदा नदीच्या पलीकडे बद्रीनारायणाच्या मंदिरावरच घुमट आणि त्यावरील निशाणें पांढऱ्या शुभ्र बर्फाच्या पर्वताच्या पार्श्वभूमीवर अतिशय पवित्र आणि शोभिवंत दिसत होतीं. त्यावेळीं सकाळचे अकरा वाजले होते. थंडी चिकार होती. आम्ही साडेतीन चार तास मोटारींत अवघडून बसलों होतों. त्यामुळें बाहेर पडल्यावर फार मोकळें वाटलें. जोशी मठ ते बद्रीनारायण हें अंतर १९ मैलांचेंच असलें, तरी वळणें, चढण आणि रस्त्यावरचे बर्फाचे अडथळे यांमुळें या लहानशा प्रवासाला चार तास लागले. हा मोटार मार्ग अलीकडेच झाला आहे. पूर्वी जोशीमठापर्यंतच मोटारी होत्या. पुढें लोकांना

चालतच जावें लागे. या रस्त्यावर पहाड असल्यानें निवाऱ्याचीं ठिकाणें अगदीं मोजकींच होतीं. त्यामुळें पूर्वी चालत जाणाऱ्या यात्रिकांना हा रस्ता फार त्रासाचा होता. अजूनहि कांहीं यात्रिक चालत जातात. पण त्यांची संख्या अल्प असते. हनुमानचट्टी व बद्रीनारायण यांच्यामध्यें घोरसिल पूल, रडंगपूल, कांचनगंगा व देवदेखणी हीं स्थळें लागतात. देवदेखणी हें नांव कर्णमधुर आणि देवापासून नजीक असल्यानें सार्थहि आहे.

बद्रीनाथपुरी हें गांव नारायण पर्वताच्या पायथ्याशीं अलकनंदा नदीच्या कांठीं आहे. येथून जवळच कांचनगंगा व अलकनंदा यांचा संगम आहे. आम्ही अलकनंदेवरचा पूल ओलांडून गांवांत शिरलों, तेव्हां एक पाणचक्की दिसली. आंत जाऊन डोकावलें, तों गंमतीचें दृश्य दिसलें. तेथें पिठाच्या गिरणीवर एक गव्हाचें पोतें ठेवलें होतें. त्या पोत्याला एक छिद्र होतें. त्या छिद्रांतून चक्कींत गहूं पडत होते. ही चक्की पाण्याच्या प्रवाहावर फिरत होती. नारायण पर्वतावरून येणाऱ्या एका प्रवाहाचा लहानसा पाट काढून त्याची जोरदार धार एका लोखंडी पात्यांच्या चक्रावर सोडली होती. त्या धारेच्या जोरानें तें चाक फिरत होतें आणि त्या चाकानें दुसरें चाक फिरून चक्की आपोआप चालत होती. त्या चक्कीचा मालक खालीं जमिनीवर कांबळें टाकून खुशाल झोंपला होता. कारण त्याला कांहींच करायचें नव्हतें. पोत्यांत गहूं होते, ते आपोआप पडत होते, त्या गव्हाचें आपोआप पीठ हौत होतें आणि पिंपांत पडत होतें. निसर्गाचा हा उपयोग अगदीं सोयीचा आणि कमी खर्चाचा होता.

आम्ही किंचित् उंचावरच्या आमच्या धर्मशाळेंत गेलों. व्यवस्था चांगली होती. थंडीमुळें पांघरण्यास रजया वगैरे भरपूर होत्या. पण केदारनाथाच्या मानानें बद्रीनारायणपुरींत थंडी कमीच होती. कारण येथील उंची समुद्रसपाटी-पासून १०२४३ फूटच आहे. गांव चांगलें आहे. मागेंच सतत बर्फाच्छादित असणारा नारायण पर्वत आहे आणि त्या उतारावर एकाखालीं एक अशा गल्ल्यांचें हें पांचसहाशें घरांचें गांव आहे. मोसमांतच हें उघडें असतें. पुढें थंडी सुरू झाल्यावर बंद होतें आणि सर्व वस्ती व देवाची उत्सवमूर्ती खालीं जोशीमठला जाते. मेच्या सुरवातीला उन्हाळा सुरू होऊन बर्फाचें प्रमाण कमी होतें, तेव्हा ' कपाट उघडतें, ' म्हणजे बद्रीनारायणपुरींत माणसांची व देवाची

वस्ती पुनः सुरू होते. बद्रीनारायणास दरसाल सुमारें सत्तर हजार यात्रिक येतात. केदारला येणारी यात्रा याहून थोडी कमी असते. कारण तेथें थेटपर्यंत मोटारी जाऊं शकत नाहींत. गांवांत दुकानांची व खाणावळींची संख्या बरीच आहे. देवांचीं छायाचित्रें, रुद्राक्षांच्या माळा, कांकणें, अंगठ्या, पऱ्याच्या मूर्ति किंवा टांक, धार्मिक पुस्तकें इत्यादींची विक्री या दुकानांतून होते. खाणावळींत सांगितल्याबरोबर ताजा माल तयार करून देतात. महागाई असणें साहजिकच आहे, पण उपाहारगृहांत मिळणारा माल चांगला व ताजा असतो. दुकानांच्या या रांगेंतून गेलें, म्हणजे गांवाच्या साधारण मध्यास श्री बद्रीनारायणाचें मंदिर लागतें.

हें मंदिर रस्त्यापासून दहा बारा फूट उंचावर आहे. वर चढण्यासाठीं पायऱ्या आहेत. वर एक मोठा चौथरा आहे. मंदिराचें बाह्यांग रंगीत व नक्षीकाम केलेलें असें सुबक व सुंदर आहे. आंत शिरल्यावर समोरच गरुडाची मूर्ति आहे. डाव्या हाताला देवस्थान मंदिराची कचेरी आणि भक्तांना प्रसाद वाटण्याची जागा आहे. आंतल्या बाजूस सभोंवतीं माडी आहे व मुख्य देवालयाच्या सभोंवतीं अनेक लहान मूर्ति आहेत. त्यांत लक्ष्मी, गणपती, मारुती, घंटाकर्ण, भोगमंडी इत्यादि मूर्ति आहेत. मुख्य देवालयाचे आंतून दोन भाग आहेत. पहिला सभामंडप. त्यांत एका वेळीं सुमारें पाऊणशें लोक मावतात. बद्रीनारायणाचें दर्शन लांबूनच घ्यावें लागतें. मूर्तीला स्पर्श करून किंवा माथा देवचरणीं टेकवून दर्शन घेण्याची परवानगी नाहीं. त्यामुळें आंत गाभाऱ्यांत पुजारी व तेथील कर्मचारी यांच्यावांचून इतरांना जातां येत नाहीं. गाभाऱ्यांत तीन साडेतीन फूट उंचीच्या चौथऱ्यावर मधोमध काळ्या पाषाणाची बद्रीनारायणाची मूर्ति आहे. ती पद्मासनस्थ आहे. चतुर्भुज बद्रीनारायण ध्यानमुद्रा लावून बसलेले दिसतात. मूर्तीचें दोन्ही प्रकारचें दर्शन घेतां येतें. एक अगदीं उघड्या मूर्तीचें निर्वाण दर्शन आणि दुसरें मुकुट, वस्त्रें, अलंकार इत्यादि घातल्यावर होणारें सालंकृत दर्शन. मूर्तीची उंची सुमारें अडीच फूट आहे. चार हातांपैकीं दोन हात जुळलेले असून दुसऱ्या दोन हातांत शंखचक्र आहेत. ही मूर्ति शालिग्राम शिळेची आहे. ती परिसाची आहे असें कांहीं पंड्ये सांगतात. मूर्तीच्या कपाळावर एक अतिशय मूल्यवान हिरा आहे. मूर्तीच्या डाव्या अंगास लक्ष्मी चवरी ढाळीत आहे. तिच्या पलिकडे नरनारा-

यणांच्या शंख, चक्र, गदा–पद्मधारी मूर्ति आहे. मुख्य मूर्तीच्या उजव्या अंगाला कुंवेर व गणपती यांच्या मूर्ति आहेत. त्याखालच्या पायरीवर गरुड, उद्धव व नारद यांच्या मूर्ति आहेत. त्याजवळच अक्षय्य नंदादीप आहे.

असें सांगतात कीं, प्रथम बद्रीनारायणाची ही मूर्ति देवदेवतांनीं अलकनंदेच्या नारायणकुंडांतून काढली व येथें तिची स्थापना केली. त्यावेळी नारद हे स्वतः तिची पूजा–अर्चा करीत होते. पुढें बौद्धांची सत्ता आली, तेव्हां त्यांनीं ही पद्मासनस्थ बुद्धाची मूर्ति आहे असें मानून तिची पूजा केली. पण आद्य शंकराचार्यांनीं बौद्धांवर विजय मिळविला, तेव्हां जातां जातां बौद्धांनीं बद्रीनारायणाची ही मूर्ति अलकनंदेंत टाकून तिबेटांत पलायन केलें. शंकराचार्यांनीं पुनः नदींतून ती मूर्ति वर काढली आणि तिची प्रस्थापना केली. मूर्तीची पूजा केरळांतील नंबुद्री ब्राह्मणांनीं करावी असा शंकराचार्यांनीं आदेश दिला व अद्याप येथील पुजारी नंबुद्री आहेत. या पुजाऱ्यांना रावळ म्हणतात. दर्शनासाठीं गाभारा सकाळीं बारापर्यंत व सायंकाळीं ४ ते ८ पर्यंत खुला असतो. देवस्थानतर्फे निरनिराळ्या पूजा बांधण्याची व्यवस्था होते. दिलेल्या पैशाची पावती मिळते व मग त्या त्या भक्ताच्या नांवानें पूजा होते. अनेकजण देवाला तुळशीचें सुवर्णपत्र किंवा सोन्याचे कांहीं जिन्नस वहातात. त्यांचा नंतर लिलांव करून उत्पन्न देवस्थानकडे जमा होतें.

पूर्वी देवाचे पुजारी रावळ ब्रह्मचारी असावेत असा नियम होता. पण कांहीं पुजारी तो नियम पाळूं शकले नाहींत व पैशाचे गैरव्यवहार झाले म्हणून पंड्यांनीं व भक्तांनीं आंदोलन केलें. त्यामुळें १९३९ सालीं या मंदिराबाबतचा कायदा करण्यांत आला. या कायद्यान्वयें फक्त पूजा रावळांच्याकडे देण्यांत आली. त्यांनीं अविवाहित ब्रह्मचारी रहावें हा नियम शिथिल करण्यांत आला आणि देवस्थानचे आर्थिक व्यवहार पहाण्यासाठीं १२ लोकांची समिति नेमण्यांत आली. ही समिति उत्तर प्रदेश सरकारतर्फें नेमण्यांत येते. बदरीनारायणाचें सध्यांचें मंदिर पंधराव्या शतकांतील आहे. गढवालच्या राजानें तें बांधलें. मंदिरावरील सोन्याचा कळस व छत्री हीं इंदूरच्या राणीसाहेब अहिल्याबाई होळकर यांनीं दिलीं आहेत. देवाला जें पूजेचें ताट न्यायचें असतें, त्यांत तुळशी, हरभऱ्याची डाळ, साखर, फुटाणे, लाह्या, खडीसाखर वगैरे जिनसा असतात. बद्रीनारायणाचा प्रसाद म्हणून भात मिळतो. कोणी

यात्रिक देवस्थानकडे पैसे जमा करतात व मग त्यांच्या नांवें भक्तांना भाताच्या घागरी वांटण्यांत येतात.

या स्थानाला बद्रीनारायण असें नांव पडण्याचें कारण असें कीं, भगवान् विष्णु जगाच्या उद्धारासाठीं येथें तप करीत होते. तेव्हां त्यांच्यावर प्रखर ऊन पडूं लागलें. म्हणून लक्ष्मीनें बोरीच्या झाडाचें रूप घेतलें आणि विष्णूवर छाया धरली. त्यासाठीं या स्थानास बद्रीनारायण म्हणतात. वाराणशी येथील 'विशाल' राजानें देवाला प्रसन्न केलें आणि 'माझें नांव देवाबरोबर कायमचें निगडित व्हावें' असा वर मागितला. तो वर बद्रीनारायणांनीं दिला. म्हणून बद्रीनाथांना 'बद्रीनाथविशाल' असेंहि म्हणतात. मुख्य मंदिराखालोखालचें येथील महत्त्वाचें ठिकाण म्हणजे ब्रह्मकपाल. बद्रीनारायणाच्या मंदिरापासून दोन तीन फर्लांगावर अलकनंदेच्या कांठीं हा प्रशस्त घाट आहे. या ठिकाणीं ब्रह्मदेवानें तप केल्याचा उल्लेख पुराणांत आहे. या नांवाबद्दल पंड्ये अशीहि कथा सांगतात, कीं शंकरानें रागानें आपल्या त्रिशूलानें ब्रह्मदेवाचें शिर कापलें. पण तें शंकराच्या हाताला चिकटलें. तें कांहीं केल्या सुटेना. शंकर सर्व तीर्थांत गेले. अखेर येथें आले, तेव्हां या स्थानमाहात्म्यामुळें ब्रह्मदेवाचें शिर गळून पडलें. म्हणून याला ब्रह्मकपाल म्हणतात.

येथें श्रद्धापूर्वक पितरांचें पिंडदान करून पितृतर्पण केलें, म्हणजे पुनः पिंड-श्राद्ध करण्याची गरज उरत नाहीं. या ठिकाणीं पितरांनाच नव्हे, तर आप्त, इष्ट, मित्र आणि शत्रूलाहि पिंडदान करतां येतें. कारण मृत्यूनंतर शत्रुत्व संपतें असें वचन आहे. जे श्रद्धेनें केलें जातें, तें श्राद्ध. आपल्या मागें कोणी आपलें श्राद्ध करणारें नसेल, तर स्वतःलाहि येथें पिंडदान करतां येतें. माता-पितर, आप्तेष्ट यांच्याविषयीं कृतज्ञता व्यक्त करण्याची ही उत्तम संधि आहे. ब्रह्मकपालीं पिंडदान केल्यानें पितरांना ब्रह्मसायुज्यता मिळते, असें पंड्ये सांगतात. पितरांच्या ऋणांतून मुक्त होण्यासाठीं, त्यांना अक्षयमुक्ति मिळावी यासाठीं, निदान ज्यांनीं आपल्यासाठीं प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष कष्ट घेतले, त्यांची आठवण काढण्यासाठीं येथें सर्वच यात्रिक पिंडदान करतात.

बद्रीनारायणपुरींत पंचशिला आणि पंचतीर्थें आहेत. गरुडशिला, नारदशिला, मार्कंडेय शिला, बराहशिला व नृसिंहशिला अशा या पंचशिला आहेत. नारद-शिला व नृसिंहशिला या देवअम्मा आवारांत आहेत. गरुडशिला गाभाऱ्यांत

आहे आणि वराहशिला व नृसिंहशिला या अलकनंदेच्या पात्रांत आहेत. मार्कंडेयांनीं येथें तप केल्याचा उल्लेख आहे. तसेंच हिरण्यकश्यपूच्या वधानंतर नृसिंह येथें आले होते म्हणून नृसिंहशिला आहे. श्रीवराह येथें शिलेच्या रूपानें आहेत म्हणून वराह शिला येथें आली. पंचतीर्थें म्हणजे ऋषिगंगा, प्रल्हाद धारा, तप्तकुंड ( अग्निकुंड ) आणि नारदकुंड हीं आहेत. बद्रीनाथ मंदिराच्या खालीं बऱ्याच पायऱ्या उतरून आल्यावर तप्तकुंड लागतें. त्यांतील पाणी इतकें कढत असतें कीं त्यांत स्नान करतांना अंगाला चटके बसतात. आसपास इतकी थंडी असते, शेजारच्या पर्वतांवर सतत बर्फ असतें, तरीहि समुद्रसपाटीपासून सुमारें अकरा हजार फूट उंचावर हें जवळजवळ उकळतें पाणी असावें हा निसर्गाचा एक चमत्कारच आहे. याची कथा आमचे पंड्ये धनेशशास्त्री यांनीं सांगितली ती अशी, कीं एकदां अग्नीला अतिशय दुःख झालें. कारण अग्नि ज्याला त्याला जाळतो म्हणून लोक त्याच्याविषयीं प्रेम बाळगीतनासे झाले. उलट, पाणी मात्र लोकांना हवें हवेसें वाटे. म्हणून श्रीविष्णूकडे जाऊन अग्नि म्हणाला, " भगवान, मला जलाची लोकप्रियता मिळेल असा कांहीं वर द्या. " त्यावर विष्णूंनीं सांगितलें कीं, " तू बद्री-नारायणाजवळ जलाच्या रूपानें प्रगट हो. म्हणजे लोकांना तूं प्रिय होशील. " त्याप्रमाणें अग्नि येथें पाण्याच्या रूपानें प्रगट झाला आणि लोक त्याला जवळ करूं लागले. अग्निकुंडाजवळच नदीच्या पात्राला लागून नारदशिला आहे. तेथें नारदमुनींनीं तप केलें होतें, म्हणून त्या शिलेस त्यांचें नांव पडलें.

अग्निकुंडांत स्नान करून आम्ही उभयतांनीं अग्नीची पूजा केली. मग रेशमी वस्त्रें नेसून आम्ही लक्ष्मीची पूँजा केली व मुंबईहून मुद्दाम नेलेली साडी व कपडा अर्पण केला. मग आम्ही जवळच्या इतर थंड पाण्याच्या कुंडांतहि स्नान केलें आणि देवदर्शन घेतलें. त्यानंतर ब्रह्मकपालावर जाऊन आम्ही दोन्ही घरच्या पितरांना पिंडदान करून तर्पण केलें. बद्रीनारायणाच्या दर्शनास वीस पंचवीस जणांच्या गटागटानें आंत सोडतात. प्रत्येक गटास तेथील पुजारी देवाची माहिती सांगतात व चक्र वगैरेंचें लांबून दर्शन घेऊं देतात. या सोयीमुळें प्रत्येक गटास सभामंडपांत दहापंधरा मिनिटांपर्यंत निवांत दर्शन घेतां येतें.

बद्रीपुरीच्या मागें नीलकंठ पर्वतावर ' चरण पादुका ' आहेत. बद्रीपुरीच्या

समोर अलकनंदेच्या तीरावर एक शिला आहे. तीवर शेषाच्या डोळ्याचा आकार दिसतो. म्हणून तिला शेषनेत्र म्हणतात. बदरीपुरी ही पंच बदरींपैकी 'विशाल बदरी' आहे. कर्णप्रयागजवळ अकरा मैलांवर आदिबदरी आहे. पांडुकेश्वर येथें योगबदरी आहे. जोशीमठापासून दोन मैलांवर ध्यानबदरी आहे आणि जोशीमठापासून सात मैलांवर भविष्यबदरी आहे. जेव्हां नर-नारायण पर्वत एक होऊन विशाल बदरी बंद होईल, तेव्हां भविष्य काळांत भविष्यबदरी हीच मुख्य बदरी होईल, असें वचन याबाबतच्या धार्मिक पुस्तकांत आढळतें.

बद्रीनाथ मंदिराच्या पुढें अनेक रमणीय स्थळें आणि धर्मक्षेत्रें आहेत. पण युद्धपरिस्थितीमुळें आणि चीनची सरहद्द तेथून केवळ वीस बावीस मैलांवर असल्यानें गेलीं कांहीं वर्षें बद्रीनारायणपुरीच्या पुढें जाण्यास मनाई आहे. पण या तीर्थांची निदान माहिती घेणें तरी अत्यंत आवश्यक आहे. त्यांपैकीं सर्वांत महत्त्वाचें ठिकाण म्हणजे बद्रीपासून दोन मैलांवर असलेलें माना येथील व्यास गुंफा किंवा गणेशगुंफा. या ठिकाणच्या गुहेंत श्रीव्यास महर्षींनीं श्रीगजाननास महाभारत व भागवत पुराणें सांगितलीं. आद्यशंकराचार्यांनींहि प्रस्थानत्रयी, शांकरभाष्य व इतर ग्रंथ येथेंच लिहिले. रामदास स्वामींना मारुतीचें दर्शन येथेंच झालें आणि लोकजागृतीची स्फूर्ति याच ठिकाणीं मिळाली. रामतीर्थ परमहंस, स्वामी विवेकानंद आणि सुभाषचंद्र बोस यांनींहि येथें वास्तव्य करून धर्मप्रसार व लोकसेवा यांची प्रेरणा येथें घेतली. मध्वाचार्यांनीं येथें समाधी घेतली. हिंदुधर्म आणि भारतीय संस्कृति यांच्या दृष्टीनें हें परमपवित्र व स्फूर्तिदायक असें ठिकाण आहे.

तेथून जवळच मुचकुंद गुंफा आहे. तो देवांचा अधिपति होता. त्यानें एकदां कुबेरावर स्वारी केली, तेव्हां कुबेरानें राक्षसांची मदत घेऊन याचा पराभव केला. म्हणून मुचकुंदानें 'शापादपि शरादपि' या न्यायानें वसिष्ठ ऋषींच्या साहाय्यानें कुबेराला नमविलें. पुढें मुचकुंदानें या गुंफेंत तप करून विष्णुपद मिळविलें. मानागांवाजवळच अलकनंदेच्या कांठी मातामूर्ति हें स्थान आहे. दक्षप्रजापतीची मुलगी मूर्ति हिचे पुत्र म्हणजे नर व नारायण. यांचींच नांवें बद्रीनारायणाच्या जवळच्या पर्वतांना दिलीं आहेत. मानागावाजवळ वसुधारा नांवाचें ठिकाण आहे. तेथें पहाडावरून दोन जलधारा सतत पडत

असतात. तेथें अष्टवसूंनीं तप केल्यामुळें या धारांना वसुधारा म्हणतात. बद्रीनारायणापासून पांच मैलांवर नीलकंठ शिखर आहे. वसुधारेच्या पश्चिमेस केदारनाथ पर्वताची पाठीमागची बाजू दिसते. वास्तविक केदार व बद्रीनारायण यांच्यांतील थेट अंतर अडीच तीन मैलच आहे. पण या दोन्हींतील पर्वत अतिशय उंच, अवघड व नेहमी बर्फाच्छादित असल्यानें यात्रिकांना सुमारें साडेतीनशें मैलांचा फेरा पडतो. बदरीपुरीच्या समोर एक शिला आहे, तिच्यावर शेषाचा डोळा दिसतो, म्हणून तिला शेषनेत्र म्हणतात. नीलकंठ पर्वतावर ‘ चरणपादुका ’ आहेत. बद्रीनारायणपासून बारा मैलांवर सतोपथ आहे. तेथें अतिशय सुंदर सरोवर आहे. सतोपथास राहून पांडवांनीं स्वर्गाकडे गमन केल्याचा उल्लेख आहे.

पांडवांच्या या स्वर्गगमनाची कथा महाभारतांत आहे ती अशी, कीं अखेरच्या दिवसांत पांडव क्षीण झाले, तेव्हां व्यास महर्षींनीं त्यांना सांगितलें, “ तुम्ही कृतकृत्य झालां असून तुमचें कार्य संपलें आहे. आतां तुम्ही इकडील निरवानिरव करून स्वर्गलोकीं जाण्याची तयारी केली पाहिजे. ” ही सूचना शिरसावंद्य मानून पांडवांनीं परीक्षितीला सिंहासनावर बसविलें, दानधर्म केला आणि श्रीकृष्णाचें स्मरण करून ते महाप्रस्थानास निघाले. पांडव, द्रौपदी आणि धर्मराजाचा इमानी कुत्रा हे हिमालयांतून चालले असतांना द्रौपदी भ्रष्ट होऊन खालीं पडली. कारण मनांतून ती अर्जुनाच्या बाजूनें पक्षपात करीत होती. सहदेवाला आपल्या विद्वत्तेचा गर्व होता म्हणून तो पडला. नकुलाला आपल्या सौंदर्याचा अहंकार होता, म्हणून तो पतन पावला. अर्जुन इतर धनुर्धरांना तुच्छ लेखीत असे, म्हणून तो भ्रष्ट झाला आणि भीम खादाडपणामुळें पतन पावला. अखेर धर्मराज व त्याचा कुत्रा स्वर्गाकडे निघाले. तेव्हां स्वतः इंद्र रथ घेऊन आला. पण कुत्र्याला स्वर्गांत प्रवेश मिळणार नाहीं म्हणून इंद्रानें सांगितलें. त्यावर धर्मराज म्हणाले, “ मी या इमानी कुत्र्यास सोडून स्वर्गांत येणार नाहीं. या कुत्र्याचा त्याग करण्यापेक्षां मला स्वर्ग मिळाला नाहीं, तरी चालेल. ” तेव्हां कुत्र्याचें रूप घेऊन आलेला यमधर्म प्रगट झाला. मग सर्वजण स्वर्गास गेले. नंतर इतर पांडवांनाहि स्वर्गवास मिळाला.

बद्रीनारायणापासून अठ्ठावीस मैलांवर मानाखिंड असून तेथून पुढें पूर्वीच्या

तिबेटची म्हणजे आतांच्या चीनची हद्द लागते. तेथून पाऊणशें मैलांवर थोलिंग मठ, दीडशें मैलांवर कैलास शिखर व पुढें सोळा मैलांवर मानससरोवर आहे. वसुधारेपासून कांहीं अंतरावर ' स्वर्गारोहिणी ' हें ठिकाण आहे. त्याचा संबंध पांडवांच्या स्वर्गगमनाकडे असावा. या महत्त्वाच्या ठिकाणांच्याकडे जाणें आम्हांला शक्य नव्हतें, म्हणून त्या दिशेनें नमन करून मनानेंच त्यांचें दर्शन घ्यावें लागलें. बद्रीनारायणपुरींत आम्ही १६ मे रोजीं सकाळीं ११ च्या सुमारास पोहोंचलों. तेथें तीन दिवस मुक्काम करावा असें आमच्यापैकीं कांहीं-जणांचें मत होतें. पण जोशीमठ ते बद्रीनारायण या रस्त्यावर बरेंच बर्फ पडत असल्याच्या बातम्या येत होत्या. थंडीचा कडाका केदारनाथइतका नसला, तरी बराच होता. १७ तारखेस दुपारीं जेवण करून आम्ही निघालों, तरी दोनदां सकाळीं व एकदां सायंकाळीं असें भरपूर देवदर्शन घडत होतें. आणि जोशीमठापर्यंतचा रस्ता अधिक बर्फवृष्टीनें निकामी होण्यापूर्वीच खालीं उतरणें अधिक बरें असें बहुमत पडलें आणि आम्हीं १७ मे रोजीं दुपारीं परतण्याचें ठरविलें. १६ मे रोजीं रात्रीं आमचे पंड्ये श्री. धनेशशास्त्री यांनी बद्री-नारायणाची माहिती सांगितली व आम्ही विचारलेल्या प्रश्नांचीं त्यांनीं उत्तरेंहि दिलीं. हिमालयाच्या या प्रवासांत कोणी ज्ञानी, पंडित, सिद्ध, साधु भेटावेत व त्यांचे विचार ऐकावेत अशी माझी फार इच्छा होती. पण असें कोणी भेटलें नाहीं. त्याबाबत विचारतां धनेशशास्त्री म्हणाले कीं, असे योगी पुरुष यात्रिकांच्या वर्दळींत राहात नाहींत. त्यांचें वास्तव्य वर हिमालयांत बाराहि महिने असतें व ते लोकांच्यांत मिसळत नाहींत, त्यामुळें त्यांचें दर्शनहि दुर्लभच असतें.

आम्ही दुसऱ्या दिवशीं सकाळीं पुनः तप्तकुंडांत स्नान करून देवदर्शन घेतलें व जेवण करून परत येण्यासाठीं निघालों. वाटेंत बराच बर्फ पडला होता. बद्रीनारायणपुरींतील मुक्काम लवकर हलविण्याचा आम्ही घेतलेला निर्णय योग्यच होता, असें नंतर आमचें आम्हांलाच पटलें. कारण दुसऱ्याच दिवशीं बद्रीनारायणहून दीड दोन मैलांवरचा रस्ता बर्फाच्या अतिवृष्टीमुळें खचला आणि कोसळला. त्यामुळें यात्रेकरूंचे फार हाल झाले. वर जाणाऱ्या उतारूंना दीड दोन मैल पावसांतून, बर्फांतून चालत जावें लागलें आणि परत येणारे यात्रेकरू वरच अडकून पडले. वर क्षेत्रांत अन्नधान्याचा तुटवडा पडला, कारण वाहतूकच

चार पांच दिवस बंद होती. खचलेला रस्ता दुरुस्त करून मग चार सहा दिवसांनीं पुनः वाहतूक सुरू झाली. पण या दुर्घटनेपूर्वींच आम्ही जोशीमठास पोंचलों होतों. तेथें एक रात्र राहून आम्ही दुसऱ्या दिवशीं सकाळींच श्रीनगरला जाण्यासाठीं निघालों. तेथें पूर्वींच्याच धर्मशाळेंत राहिलों आणि तेथून हरिद्वाराला आलों. तीन आठवड्यांच्या सतत प्रवासानें आम्ही खूपच थकून गेलों होतों म्हणून हरिद्वाराला एक दिवस पूर्ण विश्रांति घेतली. आमच्या मूळ योजनेपेक्षां आमचा प्रवास दोन दिवस आधींच संपला होता. हे दिवस एकाच गांवांत घालविण्यापेक्षां दिल्ली पहावी म्हणून मी आणि सौ. दिल्लीला आलों. आमचा प्रवासी डबा २३ मे रोजीं दिल्लीला आला. आम्ही त्या डब्यांतून मुंबईला २५ मे रोजीं रात्रीं पोहोंचलों.

हिमालयाच्या या प्रवासांत त्या भागांतील स्थळांचीं कर्णमधुर नांवें चांगलींच लक्षांत रहातात. या नावांना संस्कृत भाषेची उत्तम बैठक आहे. एवढेंच नव्हे, तर भारतीय संस्कृतीचीहि चांगली बैठक आहे. देवदेखणी, विष्णुप्रयाग, कर्णप्रयाग, विद्याकोटी, पिपलाकोटी, उषामठ, सतोपथ, नंदप्रयाग, ज्योतिर्मठ, गुप्तकाशी, सत्यनारायण, चमोली, वसुधारा, हरशीन, नरेंद्रनगर, श्रीनगर, गरुडगंगा, सोनला, कीर्तिनगर, गोचर, हृषीकेश, त्रिजुगीनारायण अशीं अनेक कर्णमधुर नांवें मनावर छाप टाकून जातात. तिकडील अशिक्षित आणि सुशिक्षितहि इंग्रजी महिन्यांचा उल्लेख न करतां भारतीय महिन्यांचाच उल्लेख करतात. डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी असे कर्कश व संस्कृतविरोधी शब्दप्रयोग तिकडे कानावर पडत नाहींत, तर वैशाख, आषाढ, श्रावण, आश्विन असे सुसंस्कृत उच्चार कानावर येतात आणि बरें वाटतें.

आयुष्यांतील ही अवघड आणि दूरची यात्रा संपली आणि सिंहावलोकनाची वेळ आली, तेव्हां कोणी कोणी घेत असलेल्या आक्षेपांची आठवण झाल्यावांचुन राहिली नाहीं' त्यांचें म्हणणें असें, कीं देव सर्वत्र आहे. आपल्या गांवांत देऊळ आहे, लहानशा घरांतहि देवघर किंवा निदान देव्हारा हा असतो. फार काय परमेश्वर हा आपल्या मनांतहि असतोच मग लांब लांब जाऊन तीर्थयात्रा करण्याचें विशेष प्रयोजन काय ? त्याला उत्तर एवढेंच कीं जे खरे साधु किंवा विश्वपुरुष असतात, त्यांना देवाच्या मूर्तीचीसुद्धां आवश्यकता नसते. 'मोक्षाचें आम्हांसी नाही अवघड !


तो असे उघड गांठोळीस ' असें म्हणणारा तुकाराम शेंकडों वर्षातून एखादाच होऊन जातो. किंवा ' जे कैवल्यातें परौतें सर म्हणती ' असे ज्ञानेश्वर हे युगपुरुषच, पण त्यांची सिद्धी आमच्यासारख्या संसारचक्रांतील सर्व सामान्य लोकांना कशी साधणार ? घरांतील देव अपुरा पडतो म्हणून आपण उठून गांवांतील मंदिरांत जातों आणि देवाचिया द्वारीं क्षणभर उभे राहतों. पण तीर्थयात्रा करण्याचें मर्म त्याहून अधिक आणि वेगळें आहे. आपला देह ज्या पंचमहाभूतांतून निर्माण झाला आहे, त्या पंचमहाभूतांचें सान्निध्य या तीर्थयात्रेंत घडतें. निसर्गाचें सुंदर आणि निखळ दर्शन घडून आपल्या मनांतील लहानसहान, क्षुद्र विचार मागें राहतात, किंवा नाहींसे होतात. लक्षावधी वर्षें अंगावर पांढऱ्या शुभ्र बर्फाचीं वस्त्रें लपेटणारा धीरोदात्त हिमालय पाहून स्वतःच्या लहानशा संसारी जीवनाचा क्षणभर का होईना विसर पडतो आणि कळत न कळत आपण त्या विशाल रूपाच्या सहस्रांश भागाशीं तरी एकरूप होतों. भौतिक जगांतला आपला अधिकार आणि समृद्धि हीं किती नगण्य आहेत, याची अशा वेळीं जाणीव होते. आपल्या विशाल धर्मपरंपरेची स्मृति होऊन असें निर्गुणनिरहंकार होणें आणि किंचित् काळ तरी मोक्ष मिळविणें यांत फारसा फरक आहे काय ? गंगा ही मोक्षाला नेते याचाच अर्थ गंगेच्या निर्मल जीवनाप्रमाणें क्षणकाल तरी स्वतःचें जीवन निखळ–निर्मळ करणें आणि विश्व-स्वरूप होणें.

हिमालयाच्या पायथ्याशीं उभा राहून अत्युच्च हिमशिखरांकडे पहातांना मानवजातीच्या इतिहासाचे विचार मनांत आल्यांवाचून रहात नाहींत. मानव-जातीच्या सुरुवातीला सूर्य, तारे, चंद्र, पाणी यांचें केवढें कौतुक वाटलें असेल ? असें सांगतात, कीं सूर्य कोठून येतो, चंद्र–तारे जातात म्हणजे कोठें जातात, नदी कोठून येते आणि कोठें जाते, समुद्राचा शेवट कोठें होतो, यांचीं उत्तरें शोधण्याच्या दुर्दम्य उत्सुकतेपायीं आदिमानव वर्षानुवर्षें भटकत राहिला आणि त्यांतूनच भूगोलशास्त्र घडलें. नाहींतर, सुरुवातीला मानवांची संख्या इतकी कमी होती आणि फळफळावळें आणि खाद्य जनावरें इतकीं होतीं कीं माणसाला पोट भरण्यासाठीं भटकण्याची कांहीं आवश्यकता नव्हती. पण नवें नवें पहावें आणि नवे अनुभव घ्यावेत ही त्याची तीव्र इच्छा त्याला स्वस्थ बसूं देईना. तो भटकत राहिला. भटकण्यांत त्याला कांहीं धोके आले, पण त्या धोक्यांना


तोंड देऊन जीवनाचे ताजे अनुभव घेण्यांतहि त्याला आनंद वाटूं लागला. असा तो प्रवासी बनला. पण मानवजातीला स्थैर्य येऊं लागलें, तशीं तो घरें बांधूं लागला. शेती करूं लागला. नदीच्या कांठीं किंवा अन्य जलाशया-जवळ घरांचे पुंजके करून त्यांना गांव म्हणून संबोधूं लागला. हीं गांवें वाढलीं, त्यांचीं शहरें झालीं. अशारीतीनें गेलीं लाखों वर्षे मानव मुख्यतः घरें करून रहाणारा म्हणजे 'गृहस्थ' म्हणून ओळखला जाऊं लागला. तरी अजून त्याच्यांतला मूळ 'प्रवासी' त्याला स्वस्थ बसूं देत नाहीं. घरांतल्या तोचतोपणाला माणूस कंटाळतो, चाकोरींतून कांहीं काळ तरी निसटूं पहातो. पण हिमालयाच्या प्रवासांत मला जर कशाचा साक्षात्कार झाला असेल, तर तो याचा कीं अशा प्रवासांतहि माणसाचें मन अनेकदां घरांतच रेंगाळत असतें. आपलीं मुलें येथें हवी होतीं, पत्नीला हें फार आवडलें असतें, मित्र यावेळीं येथें असायला हवा होता, मैत्रिणीबरोबर हा प्रवास करायला हवा होता असे विचार वारंवार मनांत येतात. म्हणूनच, या प्रवासवर्णनाच्या सुरुवातीला दिलेला निष्कर्ष मीं काढला. माणूस हा क्षणाचा प्रवासी आणि अनंत काळचा गृहस्थ असतो. दैनंदिन जीवनाच्या चाकोरींत जरी त्याला कधीं कधीं कंटाळा आला, तरी ती चाकोरी सोडून थोडे दिवस प्रवास करायला माणसाला आवडतें. पण महिनेच्या महिने वर्षानुवर्षें सतत प्रवास करणें माणसाला रुचत नाहीं. कारण मानवजातीच्या सुमारें दहा लक्ष वर्षांच्या वयांतील गेलीं कित्येक लक्ष वर्षें माणूस हा मुख्यतः गृहस्थच राहिला आहे. लांबवर गेलेला माणूसहि मनानें घरांतलीं माणसें, घरां-तल्या सुखसोयी, घरांतला जिव्हाळाच शोधीत असतो.

आणि तें साहजिकच नाहीं काय? घर हेंच आपल्या सुखाचें निधान असतें. एखादा पराक्रम करून आपण विजयी झालों, तर घरच्या माणसांना जवळ घेऊन त्यांना हा आनंद सांगावा म्हणून आधीं आपण घराकडे धांवतों. अति श्रमानें थकल्याभागल्यावर विश्रांतीसाठीं आणि जिव्हाळ्यासाठीं आपण घराकडे येतों. फार काय, बाहेर अनुचित प्रसंग घडला, आपल्याला मनस्ताप झाला, बाहेर स्वतःकडे कमीपणा घ्यावा लागला, तरी मन हलकें करून चार अश्रु ढाळण्यासाठीं माणूस घरांतच येतो. सासरीं पाठविलेल्या मुलीच्या आठ-वणीनें पेमळ पिता घराच्या चार भिंतींआड पत्नीजवळ तें दुःख उघडें करतो. नवीन अपत्य झालें तर त्या गोंडस बाळाचें कौतुक करण्यासाठीं आपण स्नेह्या-

सोबत्यांना घरांतच बोलावतों. यश मिळाल्यावर कृतज्ञतेचे पहिले पेढे घरांतल्या देवासमोर जातात. असें हर्षाचें, दुःखाचें, विश्रांतीचें, कर्तृत्वाच्या सफलतेचें एकच प्रतीक आपल्यासमोर असतें आणि तें म्हणजे घर. म्हणूनच मीं म्हटलें कीं आपल्या जीवनांत प्रवास क्षणभर असतो. आणि विशाल अर्थानें पाहिलें, तरी पृथ्वीच्या आणि चंद्र, सूर्य, तारे यांच्या अब्जावधि वर्षांच्या भ्रमणांत सारा मानवच क्षणाचा प्रवासी नाहीं काय ?





हिमालयातील प्रवासाचा नकाशा




नवी दिल्ली येथील लक्ष्मी-नारायण मंदिर (पृष्ठ ७)



हरद्वार येथील 'हरी की पायरी' (पृष्ठ ११)



मुनी की रेती येथें मराठी भाविकांनी बांधलेले विठ्ठलाचे मंदिर ( पृष्ठ २७ )



हृषीकेशनजीकचें परमात्मनिकेतन ( पृष्ठ ३० )

पुस्तक ...... प्राप्ती ... प्र ... १०१




मराठी ग्रंथ संग्रहालय
१७२८


हरद्वार येथील महादेवाचा पुतळा (पृष्ठ १०)

मुनी की रेती येथील
विठ्ठलाश्रमातील
विठोबाची मूर्ति
(पृष्ठ २६)







कनखल येथील दक्षेश्वर महादेवाचे मंदिर ( पृष्ठ १८ )



मुनी की रेती येथील लक्ष्मणझूला (पृष्ठ २९)



देवप्रयागाचें लांबून दिसणारें दृश्य (पृष्ठ ३५)




गुप्तकाशी येथील विश्वेश्वराचें मंदिर ( पृष्ठ ४० )




त्रिजुगी नारायण गांव – मागें मंदिराचें शिखर दिसत आहे.

(पृष्ठ ५५)



• त्रिजुगी नारायण मंदिरातील मूर्ति-लक्ष्मी, त्रिजुगी नारायण, सरस्वती ( पृष्ठ ५६ )



केदारनाथाचें निर्वाण दर्शन (पृष्ठ ६५)



आद्य शंकराचार्य (पृष्ठ ६९)




पांडुकेश्वर येथील पांडवांची मंदिरे (पृष्ठ ८२)



बद्रीनारायणाचे मंदिर (पृष्ठ ८६)

91928



बद्रीनारायणाची मूर्ति (पृष्ठ ८७)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम

REFBK 0018124

REFBK-0018124